स्त्री/३३६
औ/५५
२१६
८२८
मराठी

वाङ्मयभूषणग्रंथावलि

१

संसारशास्त्र

अथवा

मानवी जीविताचीं सूत्रें

प्रकाशक
थि प्रिंटिंग एजन्सी
बुधवार पेठ, पुणें.

वे. शिवरामशास्त्री गोरे ह्यांनीं लिहिलेली

वैदिकविवाहपद्धति

विवाह म्हणजे काय, त्यांत काय सांगितलें आहे, पूर्वी हा विधि कसा करीत असत, रूपान्तर होत होत सांप्रत त्याला केवळ लौकिक उत्सवाचें स्वरूप कसें आलें आणि त्याचे अनिष्ट परिणाम कसकसे होत आहेत, हें ह्यांत स्पष्ट करून दाखविलें आहे. सुशिक्षित समाजाचें ह्या विषयाकडे लक्ष्य वळावें, अव्युत्पन्न पुरोहितांना प्रयोगाचा अर्थ समजावा, त्यांनीं तो यजमान व वधूवर ह्यांना समजून द्यावा हा मुख्य उद्देश आहे; तो साधला तर खऱ्या धर्माकडे त्यांचें लक्ष्य वेधेल, श्रद्धा वाढेल आणि सांप्रत जो बाष्कळ प्रकारांना ऊत आला आहे त्याला थोडा तरी आळा बसेल. नारायणभट्टीच्या क्रमानें प्रयोग, खालीं सरळ अर्थ त्याच्या खालीं विशेष समजुतीच्या टीपा व त्यांतच मंत्रार्थ अशी रचना आहे. घटित, वधूलक्षणपरीक्षा, सापिंड्यनिर्णय, गोत्रप्रवरनिर्णय, मुहूर्तगुरुबल हे उपयुक्त विषय व सूत्रोक्त विवाहविधि देऊन शेवटीं परिशिष्टरूपानें विवाहोपयुक्त मंत्र व विवाहकाल हा निबंध जोडला आहे; आणि आरंभीं पूर्वपीठिकेंत ह्या विषयाचा मार्मिक व सप्रमाण ऊहापोह केला आहे. तात्पर्य, सर्व बाजूंनीं पुस्तक उपयुक्त होईल अशी रचना केली आहे. एक वेळ पुस्तक वाचल्यानेंच प्रत्यय येईल. किं. दहा आणे.

सन्ध्या

सन्ध्या म्हणजे काय, तींत काय सांगितलें आहे, सन्ध्येचा खरा उद्देश काय, तांत्रिकादि बहिर्मुखांनीं सन्ध्येंत किती घोंटाळा केला आहे, अवश्य कर्तव्य काय, अनवश्यक भाग किती मिसळला आहे, हें यांत वरील ग्रंथाच्या कर्त्यांनीं सप्रमाण व निर्भीडपणानें स्पष्ट दाखविलें आहे. आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालेल्या सन्ध्येच्या पुस्तकांपेक्षां हें विशेष उपयुक्त आहे किंवा नाहीं, हें एक वेळ पुस्तक वाचून वाचकांनींच सांगावें. किं. दीड आणा.

इ ६४०९ ओ/५५

जगांतील क्रान्तिकारक लढाया

" युद्धस्य कथा रम्या " हें वचन प्रसिद्धच आहे. प्रस्तुतचा ग्रंथ हा मूळ इंग्रजींत सीलोनचे माजी चीफ जज्ज सर एडवर्ड क्रीसी ह्यांनीं लिहिला. त्याचें हें रूपांतर रा. रा. जनार्दन सखाराम करंदीकर बी. ए. एलएल्. बी. यांनीं केलें आहे. ह्या ग्रंथांत क्रीसीसाहेबांनीं वर्णिलेल्या मेरेथॉनपासून (इ० सनापूर्वी ४९०) वाटर्लूपर्यंतच्या (इ० सन १८१५) पंधरा क्रांतिकारक लढायांशिवाय परवांच्या रुसो–जपानी युद्धांतील सुशिमाच्या लढाईचें वर्णन रा. करंदीकर यांनीं नवीन घातलें आहे. एकंदर ग्रंथाची भाषा विषयानुरूप असल्यामुळें ग्रंथ वाचनीय व संग्रहणीय झाला आहे. किं. २८१२; सवलतीची किं. १८८;

योगवासिष्ठ

हा ग्रंथ रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर, बी. ए. एलएल् बी. ह्यांनीं टीपा देऊन तयार केला आहे. ज्ञानेश्वरांनीं योगवासिष्ठ ग्रंथ रचिल्याचा कांहीं संतांनीं केलेला उल्लेखच आजपर्यंत वाचावा लागत असे. पण आतां प्रत्यक्ष ग्रंथ उपलब्ध होऊन तो विकत मिळतो हें ऐकून श्रीज्ञानेश्वरांच्या असंख्य भक्तजनांस आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं. किं.८१२. सवलतीची किंमत ८८.

शेतकी आणि बागाईत

हें पुस्तक पैसाफंडाचे उत्पादक रा. अं. दा. काळे यांनीं स्वानुभव व इतर माहिती ह्यांच्या आधारें लिहिलें असून पुणें येथील सरकारी शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ. मॅन यांसारख्या तज्ज्ञ लोकांनीं तें नांवाजलें आहे. घरगुती बागबगीच्याचा शोक असलेल्यांना तर हें पुस्तक मार्गदर्शकच होईल. किं. ८८.

वे. शिवरामशास्त्री गोरे ह्यांनीं लिहिलेली

वैदिकविवाहपद्धति

विवाह म्हणजे काय, त्यांत काय सांगितलें आहे, पूर्वी हा विधि कसा करीत असत, रूपान्तर होत होत सांप्रत त्याला केवळ लौकिक उत्सवाचें स्वरूप कसें आलें आणि त्याचे अनिष्ट परिणाम कसकसे होत आहेत, हें ह्यांत स्पष्ट करून दाखविलें आहे. सुशिक्षित समाजाचें ह्या विषयाकडे लक्ष्य वळावें, अव्युत्पन्न पुरोहितांना प्रयोगाचा अर्थ समजावा, त्यांनीं तो यजमान व वधूवर ह्यांना समजून द्यावा हा मुख्य उद्देश आहे; तो साधला तर खऱ्या धर्माकडे त्यांचें लक्ष्य वेधेल, श्रद्धा वाढेल आणि सांप्रत जो बाष्कळ प्रकारांना ऊत आला आहे त्याला थोडा तरी आळा बसेल. नारायणभट्टीच्या क्रमानें प्रयोग, खालीं सरळ अर्थ त्याच्या खालीं विशेष समजुतीच्या टीपा व त्यांतच मंत्रार्थ अशी रचना आहे. घटित, वधूलक्षणपरीक्षा, सापिंड्यनिर्णय, गोत्रप्रवरनिर्णय, मुहूर्तगुरुबल हे उपयुक्त विषय व सूत्रोक्त विवाहविधि देऊन शेवटीं परिशिष्टरूपानें विवाहोपयुक्त मंत्र व विवाहकाल हा निबंध जोडला आहे; आणि आरंभीं पूर्वपीठिकेंत ह्या विषयाचा मार्मिक व सप्रमाण ऊहापोह केला आहे. तात्पर्य, सर्व बाजूंनीं पुस्तक उपयुक्त होईल अशी रचना केली आहे. एक वेळ पुस्तक वाचल्यानेंच प्रत्यय येईल. किं. दहा आणे.

सन्ध्या

सन्ध्या म्हणजे काय, तींत काय सांगितलें आहे, सन्ध्येचा खरा उद्देश काय, तांत्रिकादि बहिर्मुखांनीं सन्ध्येंत किती घोंटाळा केला आहे, अवश्य कर्तव्य काय, अनवश्यक भाग किती मिसळला आहे, हें यांत वरील ग्रंथाच्या कर्त्यांनीं सप्रमाण व निर्भीडपणानें स्पष्ट दाखविलें आहे. आजपर्यंत छापून प्रसिद्ध झालेल्या सन्ध्येच्या पुस्तकांपेक्षां हें विशेष उपयुक्त आहे किंवा नाहीं, हें एक वेळ पुस्तक वाचून वाचकांनीं च सांगावें. किं. दीड आणा.

ऱ ७४० ओ/५

जगांतील क्रान्तिकारक लढाया

" युद्धस्य कथा रम्या " हें वचन प्रसिद्धच आहे. प्रस्तुतचा ग्रंथ हा मूळ इंग्रजींत सीलोनचे माजी चीफ जज्ज सर एडवर्ड क्रीसी ह्यांनीं लिहिला. त्याचें हें रूपांतर रा. रा. जनार्दन सखाराम करंदीकर बी. ए. एलएल्. बी. यांनीं केलें आहे. ह्या ग्रंथांत क्रीसीसाहेबांनीं वर्णिलेल्या मेरेथॉनपासून (इ० सनापूर्वी ४९०) वाटर्लूपर्यंतच्या (इ० सन १८१५) पंधरा क्रांतिकारक लढायांशिवाय परवांच्या रुसो–जपानी युद्धांतील सुशिमाच्या लढाईचें वर्णन रा. करंदीकर यांनीं नवीन घातलें आहे. एकंदर ग्रंथाची भाषा विषयानुरूप असल्यामुळें ग्रंथ वाचनीय व संग्रहणीय झाला आहे. किं. २७१२; सवलतीची किं. १७८;

योगवासिष्ठ

हा ग्रंथ रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर, बी. ए. एल्एल् बी. ह्यांनीं टीपा देऊन तयार केला आहे. ज्ञानेश्वरांनीं योगवासिष्ठ ग्रंथ रचिल्याचा कांहीं संतांनीं केलेला उल्लेखच आजपर्यंत वाचावा लागत असे. पण आतां प्रत्यक्ष ग्रंथ उपलब्ध होऊन तो विकत मिळतो हें ऐकून श्रीज्ञानेश्वरांच्या असंख्य भक्तजनांस आनंद झाल्यावांचून रहाणार नाहीं. किं.७१२. सवलतीची किंमत ७८.

शेतकी आणि बागाईत

हें पुस्तक पैसाफंडाचे उत्पादक रा. अं. दा. काळे यांनीं स्वानुभव व इतर माहिती ह्यांच्या आधारें लिहिलें असून पुणें येथील सरकारी शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपाल डॉ. मॅन यांसारख्या तज्ज्ञ लोकांनीं तें नांवाजलें आहे. घरगुती बागबगीच्याचा शोक असलेल्यांना तर हें पुस्तक मार्गदर्शकच होईल. किं. ७८.

रा. रा. वा. दा. मुंडले यांनीं लिहिलेलीं पुस्तकें

बालमनुस्मृति

सोप्या भाषेंत आर्यसंस्कृति व धर्मशास्त्र यांची ओळख पटवून शील बनविण्यास सहाय्य करणारें हें छोटें पुस्तक प्रत्येक आईबापांनीं आपल्या मुलांचे हातीं अवश्य द्यावें, असें विद्वानांचें मत आहे. किंमत ८४.

महिलाक्लेशनिवारण

विनयसंपन्न अशा आर्य स्त्रियांना आपल्या शारीरिक [नाजुक] वेदनांचा उच्चार करण्यास संकोच वाटत असल्यामुळें अनेक वेळां त्यांना उपचारावांचून तसेंच खितपत पडावें लागतें. त्यांची ही शोचनीय स्थिति प्रस्तुत पुस्तक दूर करील. यांत रजोदर्शन, गर्भसंभव, बाळंतपण, अपत्य-संगोपन, या अवस्थेंतील विकृति व सामान्य उपचार यासंबंधानें शास्त्रोक्त माहिती दिली आहे. त्याचें परिशीलन केल्यास कोणत्याहि स्त्रीस बहुधा कुचमत पडावें लागणार नाहीं. अनेक डॉक्टर व वैद्य यांचे उत्तम अभिप्राय आहेत. किंमत ८१०.

फ्रेंच वाङ्मय-रत्नमाला

फ्रेंच राष्ट्रांतील उज्ज्वल वाङ्मयाचें स्थूल स्वरूप त्यांतील सात प्रमुख तत्त्ववेत्त्यांचीं त्रोटक चरित्रें व त्यांचे मननीय विचार, यांचा या पुस्तकांत समावेश केला आहे. किंमत ८८.

चीन देशाची संक्षिप्त माहिती

यांत चिनी राष्ट्राच्या दोन हजार वर्षांतील घडामोडींचा वृत्तान्त थोडक्यांत सांगितला असून त्याच्या भावी स्थितीचेंहि भविष्य वर्तविलें आहे. ह्या देशासंबंधीं इतकी संकलित व व्यवस्थित माहिती देणारें मराठींत हें एवढेंच पुस्तक आहे. किंमत ८६.

पत्ता:—धि प्रिंटिंग एजन्सी, बुधवार पेठ, पुणें.

स्वीकार ता. १ जून १९५२
रजिष्टर नं. ८ अ. १५१५१९१६

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY
डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्स्लेशन सोसाइटी, पुणे.
POONA. 1894

वाङ्मयभूषणग्रंथावलि

१

संसारशास्त्र

अथवा

मानवी जीविताचीं सूत्रें

लेखक

सदाशिव कृष्ण वैशंपायन

बी. ए. एल्एल् बी.

प्रकाशक

धि प्रिंटिंग एजन्सी

बुधवार पेठ पुणें

१९१४

किंमत बारा आणे

Printed by Achut chintaman Bhat at his "Yashawant" Press 1483 Kasaba, Poona, and published by N. K. Phadke for the proprietor of the Printing Agency 456 Budhwar, Poona.

(All rights reserved by the Agency)

अर्पणपत्रिका

तीर्थरूप

कृष्णराव महादेव वैशंपायन

यांचे चरणीं

त्यांनीं अविश्रान्त परिश्रम घेऊन दिलेल्या

विद्यामृताचें च फल असा हा ग्रंथ

अर्पिला आहे.

स. कृ. वैशंपायन



रा. रा. कृष्णराव महादेव वैशंपायन

जन्मः— श्रावण शु॥ ८ शके १७७९

ता. ५।८।१८५७ इ०

उपोद्घात

'**संसारशास्त्र** अथवा **मानवी जीविताचीं सूत्रें**' हा ग्रंथ मराठी वाचकवर्गापुढें मीं मांडावा, अशी रा. वैशंपायन यांनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून मीं तें काम मोठ्या आनंदानें पत्करिलें. सदर ग्रंथाचें महत्त्व केवळ आंतील मौल्यवान् मजकुरावरून कोणाच्या हि ध्यानीं येईल च; आणि कोणत्या हि ग्रंथाचें स्वारस्य समजण्यास किंवा त्याचे गुण घेण्यास ग्रंथाविषयीं किंवा ग्रंथकाराविषयीं अवांतर बाह्य स्वरूपाची माहिती नसली म्हणून कांहीं अडत नाहीं. पण अशा प्रकारची माहिती कळली असतां ती वाचकांस प्रिय च वाटते. रा. वैशंपायन यांच्या प्रस्तावनेंत मूळ ग्रंथ व ग्रंथकार यांच्याविषयीं जी माहिती आली आहे, ती ग्रंथाविषयीं एरवीं हि वाटणारी आदरबुद्धि अधिक च दृढ करिते. आणि कोणा एका हिंदी ब्राह्मणानें लिहिलेला हा ग्रंथ शेंकडोंशें वर्षांनीं फिरून हिंदुस्थानास परत मिळाला, या विचारानें त्याविषयींचें कौतुक शतपट वाढतें यांत शंका नाहीं. कोणच्या हि कोशांत किंवा शरीरांत असला तरी आत्मा हा सुरक्षित व शुद्ध च राहतो, त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथांतील बोध चिनी इंग्रजी किंवा मराठी कोणत्या हि भाषेंत असला तरी वाचकांस एकसारखा च रम्य व आनंदकारक होणार यांत शंका नाहीं.

प्रस्तुत ग्रंथ जर खरोखर हिंदी ब्राह्मणानें लिहिलेला असेल तर तो वेदान्तमताचा प्रसार होण्यापूर्वी लिहिला असावा, व म्हणून च त्यामध्यें धर्म व परमार्थ यांना द्यावयाचें तें महत्त्व देऊन हि संसारशास्त्राचा इतका सूक्ष्म विचार केलेला आहे असें दिसतें. जी गोष्ट रागतः प्राप्त तिचा उपदेश करण्याचें कारण नाहीं, व जी गोष्ट रागतः प्राप्त नाहीं तिचा च काय तो उपदेश करणें जरूर आहे, या तत्त्वावर आपल्याइकडे निवृत्तिपर वाङ्मयाची रेलचेल झालेली आढळते. पण संसार रागतः प्राप्त असला तरी तो सशास्त्र करणें हें कर्म महा कठिण आहे; याकरितां केवळ संसारयात्रेला अनुलक्षून ऐहिक गोष्टींविषयीं मनुष्याला जितका उपदेश करावा तितका थोडा च असतो. संसार हा निःसार आहे असें जन्मभर तोंडानें म्हणत पण संसारांत आसक्ति ठेवून पावलोपावलीं आपल्या च कृतीनें आपल्या शब्दाचें खंडन करीत जन्म घालविणारे लोक इतर कोणत्या हि देशापेक्षां हिंदुस्थानांत अधिक भरतील असें मला तरी वाटतें. पण ईश्वरसृष्टींत जर खरोखर माया म्हणून कोठें असेल तर ती संसार मायामय आहे असें नुसतें तोंडानें म्हणण्यांत च आहे. पण तें कसें हि असलें तरी संसारांत राहून आचरण कसें ठेवावें, याविषयीं प्रवृत्तिपर असे ग्रंथ आपणांस आज जरूर पाहिजे आहेत, व रा. वैशंपायन यांनीं अशा प्रकारचा एक ग्रंथ मराठी वाचकांस मिळवून दिला, याबद्दल मीं त्यांचें

अभिनंदन करितों. त्यांनीं वडिलार्जित ज्ञानद्रव्याचा एक मौल्यवान् निधि परत मिळविल्यानें, एका प्राचीन पूर्वजाच्या कृतीचा उद्धार करून आपल्या अर्वाचीन बांधवांना मोठा लाभ घडविला, आणि अशा रीतीनें दुहेरी श्रेय मिळविलें यांत शंका नाहीं.

पुणें,
ता० २।१२।१९१४. } नरसिंह चिंतामण केळकर.

भाषांतरकर्त्यांची प्रस्तावना

जें पुस्तक अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून पाश्चात्यांस अत्यंत प्रिय वाटत आहे, व ज्या पुस्तकांतील उपदेशामृतप्राशनानें फ्रेंच, जर्मन, इटालियन, इंग्लिश वगैरे लोकांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत, त्याची मराठी वाचकांस नुसती गंधवार्ता देखील असूं नये, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय. प्रथम हें पुस्तक ल्हासा येथें एका चिनी पंडिताच्या अवलोकनांत आलें व त्यानें त्याचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. नंतर तत्कालीन चिनांत राहणाऱ्या एका आंग्ल पंडितानें "The Economy of Human Life" या मथळ्याखालीं इंग्रजींत त्याचें रूपांतर केलें; व तें प्रथम इ. स. १७५१ सालीं इंग्लंडांत प्रसिद्ध झालें.

हें पुस्तक मूळ कोणत्या भाषेंत लिहिलें, केव्हां, कधीं व कोणीं लिहिलें याबद्दल खात्रीलायक अशी कांहीं च माहिती उपलब्ध नाहीं. इंग्रजींत रूपांतर करणाऱ्या आंग्ल पंडितानें पेकीनहून इंग्लंडांत आपल्या आश्रयदात्यास पाठविलेल्या पत्रांत या पुस्तकासंबंधीं कांहीं त्रोटक माहिती मिळते. त्या पत्राशिवाय अन्य माहिती उपलब्ध नसल्यानें त्यांपैकीं पहिलें पत्र जसेंचें तसें भाषांतररूपानें पुढें दिलें आहे: —

मुक्काम पेकीन

ता. १२ मे, सन १७४९.

चेस्टरफील्डचे अर्लसाहेब यांस—

सरदारसाहेब !

आपल्याला मीं जें ता. २३ डिसेंबर १७४८ रोजीं पत्र लिहिलें, त्यांत या अफाट देशाच्या स्थावरजंगम शास्त्राची व स्थानवर्णनाची जी कांहीं माहिती मला मिळवितां आली, ती दिली च आहे. यापुढील कांहीं पत्रांत, या देशांतील कायदे-कानू, राज्यव्यवस्था, धर्म व लोकांचे रीतिरिवाज यांविषयीं लिहिण्याचा माझा विचार होता; परंतु एक अशी अद्भुत गोष्ट घडून आली आहे कीं, तिच्यामुळें इकडील सर्व विचारी पुरुषांचें लक्ष तिकडे वेधून राहिलें आहे; व कदाचित् पुढेंमागें युरोपांतील विद्वानांचें हि लक्ष तिजकडे लागेल. ती गोष्ट आपल्यासारख्या स्वभावाच्या पुरुषाला आवडून कांहीं करमणूक होईल असें वाटल्यावरून, मला जी कांहीं माहिती मिळवितां आली तितकी सर्व शक्य तितकी स्पष्ट व व्यवस्थितपणानें आपल्यापुढें मांडीत आहें.

चीन देशाला लागूनच पश्चिमेस तिबेट नांवाचा एक देश आहे; त्याला कोणी 'बॅरानटोला' असें हि म्हणतात. या देशाच्या ल्हासानामक प्रांतांत या मूर्तिपूजकांचा वर्णगुरु—अर्थात् दलाईलामा—राहतो. त्याला आसपासच्या देशांतील सर्व

लोक पूज्य समजून देवाप्रमाणें मानितात. त्याच्या धार्मिक वृत्ती-बद्दल लोकांचें अत्यंत पूज्य मत असल्यानें, लाखों धार्मिक लोक त्याचा आशीर्वाद घेण्यासाठीं ल्हासा येथें जाऊन त्याचें दर्शन घेऊन त्याच्यापुढें नजरनजराणे ठेवितात. त्याचें निवासमंदिर अत्यंत शोभायमान असून पाऊताला नांवाच्या पहाडावर बांधलेलें आहे. या पहाडाच्या पायथ्याशीं व सर्व ल्हासा प्रांतभर निर-निराळ्या दर्जाचे इतके लामा (धर्मगुरु) राहतात कीं, त्यांची संख्या सांगितली असतां ती कोणास खरी सुद्धां वाटणार नाहीं. त्यांपैकीं कित्येकांना राहण्यासाठीं अत्यंत सुंदर व भव्य मंदिरें बांधलेलीं आहेत. यांना हि लोक फार पूज्य—पण दलाईलामापेक्षां किंचित् कमी—मानितात. इटालीप्रमाणें साऱ्या देशभर धर्मोपदेशक दिसतात. तार्तरी, मोंगलांचा प्रदेश व इतर पौर्वात्य देश यांतून मिळत असलेल्या नजर-नजराण्यांवर यांचा निर्वाह होतो. जेव्हां दलाईलामाची लोक पूजा करितात, तेव्हां ते त्याला एका भव्य व सुंदर सिंहासनावर बसवितात. या सिंहासनावर एका मूल्यवान् गालिच्यावर तो मांडी घालून बसतो. त्याचे पूजक त्याच्या-पुढें अत्यंत नम्रतेनें साष्टांग दंडवत घालितात; परंतु तो स्वत: त्यांचा मुळींच सत्कार करीत नाहीं; इतकेंच नव्हे, तर तो मोठमोठ्या राजांशीं देखील एक शब्द बोलत नाहीं. तो केवळ आपल्या हातानें त्यांच्या मस्तकांना स्पर्श करतो; व ते हि असें समजतात कीं, त्यामुळें आपल्या सर्व पापांबद्दल क्षमा

मिळते. त्याच्याबद्दल त्यांची इतकी पूज्यबुद्धि आहे कीं, तो सर्वज्ञ असून लोकांच्या मनांतल्या गुह्य गोष्टी जाणतो असें ते समजतात. सुमारें दोनशें मोठाले लामा त्याचे पट्ट-शिष्य आहेत, व ते लोकांना असें भासवितात कीं, तो अमर आहे, व जेव्हां जेव्हां तो मरतोसा दिसतो तेव्हां तेव्हां फक्त एक शरीर टाकून दुसरें धारण करितो.

चिनांतील विद्वानांचें फार दिवसांपासून असें मत आहे कीं, या दलाईलामाच्या निवासमंदिरांतील ग्रंथरक्षागारांत पुष्कळ जुने ग्रंथ फार पुरातनकाळापासून ठेविलेले आहेत. हल्लींचा जो बादशहा आहे त्याला पुरातन ग्रंथांचा शोध लावण्याचा फार नाद आहे. वरील मताबद्दल त्याला इतकी खात्री वाटली कीं, त्यावरून या गोष्टींत कितपत सत्य आहे याचा तपास लावण्याचा त्यानें निश्चय केला. यासाठीं अगोदर प्राचीन भाषा व लिपी जाणणाऱ्या कोणा विद्वानाचा त्यानें शोध केला. शेवटीं त्याला आपल्या मनासारखा गृहस्थ आढळला. त्याचें नांव "काउत्सू" होय. हा गृहस्थ पहिल्या प्रतीचा विद्वान् असून दिसण्यांत फार गंभीर व उदात्त होता. त्याचें वय पन्नास वर्षांचें असून तो उत्तम वक्ता होता. फार वर्षें पेकीनमध्यें राहिलेल्या एका लामाशीं त्याचा दाट स्नेह असल्यानें तिबेटांतील लामाची भाषा त्याला चांगली अवगत होती.

वरीलप्रमाणें गुणी असलेला काउत्सू आपल्या कामागिरी-

वर निघाला, आणि त्याचें चांगलें वजन पडावें म्हणून बादशहानें त्याला "कोलोआ" म्हणून मुख्य प्रधानाची पदवी बहुमानानें अर्पण केली, व त्याच्या योग्यतेला साजेल असा लवाजमा, आणि दलाईलामासाठीं व इतर लामांसाठीं अत्यंत मूल्यवान् नजराणे देऊन, बरोबर खालील आशयाचें एक पत्र हि दिलें.

"ईश्वराचे माननीय प्रतिनिधी, महान् श्रेष्ठ, अति पवित्र व पूजार्ह आचार्यांचे पदकमलीं—

आम्हीं चीन देशचे बादशहा व पृथ्वीवरील सर्व राजांचे राजे, आमचे अत्यंत माननीय मुख्य प्रधान काउत्सू यांचे द्वारें, अत्यंत नम्रतेनें व आदरानें आपल्या पूज्य चरणकमलीं अनंत प्रणिपात करून, आमच्यासाठीं, आमच्या आप्तबांधवांसाठीं व आमच्या राष्ट्रासाठीं आपल्या अत्यंत ओजस्वी व श्रेयस्कर आशीर्वादाची याचना करून विज्ञप्ति करितों कीं,—

प्राचीन ग्रंथांचा शोध लावण्याची व पुरातनकालीन ज्ञानाचें पुनरुज्जीवन करून त्याचें ग्रहण करण्याची आम्हांस प्रबल लालसा आहे. आम्हांस असा शोध लागला आहे कीं, आपल्या अत्यंत प्राचीन व पूज्य ग्रंथरक्षागारांत कांहीं उपयुक्त ग्रंथ आहेत, व ते फार प्राचीन असल्यामुळें मोठमोठ्या विद्वानांस हि दुर्बोध आहेत. त्यांचा समूळ नाश न व्हावा म्हणून शक्य तितके प्रयत्न करण्याच्या विचारानें आम्हीं

आपल्या काउत्सू नामक अत्यंत विद्वान् व माननीय मंत्र्यास पूर्णाधिकार देऊन आपल्या पूज्य पदपद्मांपाशीं पाठविलें आहे. त्याचा उक्त ग्रंथरक्षागारांत प्रवेश होऊन, त्याला लिहिण्या-वाचण्याची मोकळीक असावी, अशी आमची प्रार्थना आहे. प्राचीन भाषांत अत्यंत निपुण असल्यामुळें तो अतिशय जुनाट ग्रंथांची हि माहिती करून घेईल, असा आम्हांला पूर्ण भरंवसा आहे; आणि आपल्या पदारविंदीं मिलिंदायमान होऊन, आमच्या मनांतील पूज्यभाव आचार्यांस सांगून, इच्छित कार्यसिद्धीसाठीं भगवंताची अनुज्ञा मिळविण्याबद्दल त्यास आम्हीं ताकीद केली आहे. ''

त्यानें (काउत्सूनें) आपल्या प्रवासवर्णनांत बऱ्याच चमत्कारिक गोष्टींची माहिती दिली आहे; पण ती सविस्तर सांगून मी आपला वेळ घेऊं इच्छीत नाहीं. ती समग्र हकीगत इंग्लंडांत परत आल्यावर छापून प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे. सध्यां एवढें च सांगतों कीं, तो त्या पवित्र प्रांतांत जाऊन पोहोंचला, आणि त्यानें बरोबर नेलेल्या मूल्यवान् नजरनजराण्यामुळें इच्छित स्थळीं त्याचा सहज प्रवेश झाला. तेथील पवित्र विद्यालयांत त्याला एक स्वतंत्र जागा देण्यांत आली; आणि त्याच्या ग्रंथशोधनाच्या मदतीला एक अत्यंत विद्वान् लामा मिळाला. तो तेथें सुमारें सहा महिने राहिला, व या अवधींत तेथें असलेल्या कांहीं प्राचीन उपयुक्त ग्रंथांचा त्यानें शोध लाविला.

त्याच्या वाचनांत आलेल्या पुस्तकांपैकीं कांहींतून त्यानें बरेच विचित्र उतारे घेतले आहेत; आणि त्यांवरून त्यांच्या लेखकांविषयीं, लेखनकालाविषयीं, व तसेंच ते जेथें लिहिले गेलें त्या स्थळांविषयीं अनुमानें काढिलीं आहेत. यावरून काउत्सू किती विचारी, तीक्ष्ण बुद्धीचा व व्यापक अध्ययनाचा पुरुष होता याची परीक्षा होते.

त्यानें शोधून काढिलेल्या ग्रंथांत एक अत्यत जुनाट ग्रंथ आहे. कित्येक वर्षेपर्यंत मोठमोठ्या लामांस हि तो दुर्बोध होता. त्यांत अल्पशी अशी एक नीतिपद्धति, जुने गिमनॉसोफिस्टस–अर्थात् ब्राह्मण–यांच्या भाषेंत व लिपींत लिहिलेली आहे. पण ती केव्हां व कोणीं लिहिली याविषयीं काउत्सू कांहीं च बोलत नाहीं. त्यानें तिचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. पण मुळांतील शब्दसामर्थ्य अथवा अर्थगांभीर्य यांपैकीं कांहीं च चिनी भाषांतरांत उतरविण्याइतकी आपल्या अंगीं विद्वत्ता नाहीं, असें तो स्वतः च कबूल करितो. त्या पुस्तकासंबंधीं बॉन्झीज व इतर विद्वानांचें मतभिन्नत्व आहे. जे त्या पुस्तकाची अत्यंत स्तुति करितात त्यांचें, अतिशय श्रेष्ठ तत्त्ववेत्ता कॉन्फ्यूशस यानें तें लिहिलें असावें असें मत आहे. तें पुस्तक मूळ ब्राह्मणी भाषेंत व लिपींत लिहिलें गेलें नसून कॉन्फ्यूशसनें लिहिलेल्या मुळाचें भाषांतर आहे; व कॉन्फ्यूशसनें लिहिलेली मूळ प्रत अजीबात कोठें नाहींशी झाली असें त्यांचें म्हणणें आहे. कॉन्-

फ्यूशसचा समकालीन आणि टेओसी पंथाचा संस्थापक—दुसरा चिनी तत्त्ववेत्ता—ल्याओकियून यानें प्रणीत केलेल्या नियमांची ती संहिता आहे असें हि कित्येक मानितात. पण पुस्तकाच्या भाषेसंबंधीं उभयपक्षांस हि सारखी च अडचण आहे. पुस्तकांतील कांहीं विशिष्ट खुणांवरून व मजकुरावरून तें पुस्तक डॅडमिस (आर्य चाणक्य ?) नामक ब्राह्मणानें लिहिलें असावें असा कित्येकांचा अंदाज चालतो. त्या ब्राह्मणानें सिकंदर बादशहास पाठविलेलें एक पत्र कांहीं युरोपियन लोकांस माहीत आहे. काउत्सूचें हि मत वरील मताशीं च जुळतें. तो हि असें म्हणतो कीं, ते कोणा प्राचीन ब्राह्मणानें लिहिलेलें—भाषांतर नसून—मूळ च आहे. एकंदरीनें पाहतां, त्या पुस्तकाविषयीं एका गोष्टीची शंका वाटते; व ती ही कीं, त्याची योजना पौर्वात्यांना अगदीं च नवीन व अदृष्टपूर्व अशी आहे. पण त्यांतील विशेषेंकरून पौर्वात्यांची च असलेली भाषासरणी, आणि तें ह्या च जुन्या भाषेंत कां लिहिलें याच्याविषयीं कांहीं विश्वसनीय पुराव्याचा अभाव, या दोन गोष्टी जर नसत्या तर तें कोणा युरोपियनानें लिहिलें असावें असें हि कित्येक समजते. पण तें कोणीं जरी लिहिलें असलें तरी या शहरांत व सर्व देशभर त्याचा दुमदुमत असलेला जयघोष, सर्व प्रकारच्या लोकांची तें वाचण्याविषयीं आवड व उत्सुकता, आणि लोकांनीं केलेली त्याची प्रशंसा, या सर्वांवरून, व विशेषतः तें आपणांस एक चांग-

लाभ नजराणा होईल असें वाटल्यावरून, त्याचें इंग्रजींत भाषांतर करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. आणि मुळांतील म्हणजे चिनी भाषेंतील स्वारस्य या माझ्या कृतींत कितपत उतरलें आहे हें समजण्याचें आपणांस कांहीं च साधन नाहीं हें लक्षांत येतां च तर भाषांतर करण्याचा माझा विचार मीं कायम केला. हें भाषांतर करितांना मीं कोणत्या लेखन-पद्धतीचा स्वीकार केला आहे, याविषयीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. हल्लीं जसें हें लिहिलें आहे, तशा तऱ्हेनें लिहिण्याचा पूर्वी माझा मुळीं च विचार नव्हता. पण त्याच्या उपोद्घातांतील भाषाप्रौढी, त्यांतील वाक्यें हीं सर्व पाहतां, आहे त्याच लेखनपद्धतीचा मला अवलंब करावा लागला; आणि हें भाषांतर करितांना मला जॉब, साम्स, सॉलोमन आणि प्रोफेट्स ह्यांच्या ग्रंथांचा चांगला च उपयोग झाला.

असल्या ह्या पुस्तकानें आपलें थोडें जरी मनरंजन झालें तरी त्यापासून मला फार आनंद होईल. येथील लोकांविषयीं व त्यांच्या राष्ट्राविषयीं मागें दिली त्यापुढील हकीगत पुढील पत्रीं देईन. "आपला..."

पण जरी या पुस्तकाविषयीं अवांतर माहिती स्पष्ट व पुरेशी नसली, तरी त्यांतील सुबोध मजकुराविषयीं कोणास हि शंका नाहीं. जेव्हां तें प्रथम प्रसिद्ध झालें, तेव्हां त्या च वर्षी त्याच्या अनेक आवृत्त्या खपल्या व पुढें थोडक्या च अवधींत म्हणजे इ. स. १८१२ पावेतों त्याच्या पन्नास

आवृत्त्या निघाल्या. शिवाय फ्रेंच, इटालियन, जर्मन, वेल्श वगैरे अनेक भाषांतून त्याचीं भाषांतरें झालीं. त्याचें कवितेंत हि रूपांतर झालें. नामांकित चित्रकारांनीं व कुशल शिल्पज्ञांनीं तत्संबंधीं चित्रें काढून व पुतळे बनवून त्याचा गौरव केला. यावरून तें किती लोकप्रिय झालें हें सहज ध्यानांत येईल. इतकें लोकप्रिय झालेलें हें पुस्तक सर्वकाळीं सर्व देशांतील लोकांच्या डोळ्यांपुढें सतत असलें पाहिजे. म्हणून च मराठी वाचकांस हि त्यांतील रसास्वाद घेतां यावा या हेतूनें त्याचें मराठी भाषांतर केलें आहे.

या पुस्तकांतील मुख्य गुण म्हटला म्हणजे त्यांतील **जागृति** हा होय. यांत मानवी जीवनयात्रा शक्य तितक्या सौकर्यानें पण अति उत्कृष्ट रीतीनें कशी पार पाडितां येईल या प्रश्नाचा विचार करून त्यासंबंधींचे नियम अगदीं सोप्या रीतीनें, यथार्थ व संक्षिप्त असे दिले आहेत. स्वतः लेखकासंबंधीं गोष्टींचा–परिस्थितीचा–त्यानें लिहिलेल्या ग्रंथावर थोडा तरी परिणाम होतो; पण तसला कांहीं प्रकार प्रस्तुत पुस्तकासंबंधीं नसून देखील, त्यांतील प्रवचनांचा–तात्पुरता कां होईना–मनावर किती हितावह परिणाम होतो, हें प्रस्तुत पुस्तक वाचतांना वाचकांच्या सहज लक्षांत येईल. हें पुस्तक लिहिणाऱ्या तत्त्ववेत्त्याचीं तत्त्वें जरी विश्लिष्ट व सूत्ररूपानें सांगितलेलीं असलीं, तरी तीं व्यवहारांत आणिलीं असतां, त्यांतील वरवर दिसणारी विसंगतता नाहींशी च होऊन जाते.

आतां हें खरें कीं, मानवी जीविताचे सर्व च सिद्धान्त या अल्प पुस्तकांत असणें शक्य नाहीं. कारण, मानवी बुद्धीची मजल कांहीं एका विवक्षित मर्यादेपर्यंतच जाऊं शकते व या मर्यादेपुढें जाण्याची इच्छा असली तरी तिची कुवत नाहीं. असें असून हि या पुस्तकांत मानवी जीविताचा शक्य तितक्या बाजूंनीं विचार झाला आहे. महर्षिव्यासप्रणीत श्रीमद्भगवद्गीतेंतील उपदेशाप्रमाणें च या "संसारशास्त्र" ग्रंथांतील विषयांची जुळणी, त्यांतील हेतूला अनुसरून राखलेली विचारांची सुसंगति, आणि त्यांला अनुरूप अशी च त्यांतील इंद्रियविषयक घटना, हीं सर्व मिळून आपल्या विचारांना एक विवक्षित दिशा दाखवितात. त्यांत प्रणीत केलेल्या व्यक्तिशः व पृथक् सिद्धान्तांविषयीं आदर तर वाटतो च; पण सर्व मिळून जो कांहीं आपल्या मनावर परिणाम होतो तो अनुभवावांचून कळणें नाहीं.

प्रस्तुत काळांत माजलेल्या विचारांच्या घोंटाळ्यांत खरें कोणतें व खोटें कोणतें, याची निवड करणें फार कठिण झालें आहे. म्हणून आपलें हिताहित कशांत आहे, कर्तव्याकर्तव्य कोणतें, समाजोन्नति कशानें होईल, वगैरे गोष्टी शिकविण्यास एखाद्या अधिकारयुक्त पुस्तकाची फार गरज आहे असें वाटल्यावरून हा माझा अल्प प्रयत्न विद्वज्जनांपुढें निर्णयार्थ मांडला आहे.

ज्या काळीं हें पुस्तक लिहिलें गेलें, त्या काळीं ज्ञानार्जन

म्हणजे च सद्गुण असें मानीत. त्या वेळीं शास्त्रांच्या परंपरेंत नीतिशास्त्राची पायरी उच्च होती, व नैसर्गिक अशा सर्व गोष्टींचा अभ्यास ईश्वराचें ज्ञान होण्यासाठीं होत होता. पण हल्लीं उद्योगाची व श्रमाची विभागणी झाल्यामुळें प्रत्येकाला आपल्या नियमांची एकेक निराळीच कलमबंदी लागूं लागली; आणि म्हणून संसारशास्त्रांसारख्या पुस्तकांचा उपयोग व्यवहारापेक्षां खाजगी अभ्यासाकडेच अधिक होऊं लागला आहे.

जरी हे सिद्धान्त उच्च दर्जाचे आहेत, तरी त्यांचा उपयोग प्रपंचांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याकडे कितीसा होईल तें सांगतां येणें कठिण आहे. पण भगवान् श्रीकृष्णानें आपल्या प्रिय अर्जुनास केलेला उपदेश जसा त्याच्या वाचकांस सदैव तुष्टिप्रद होत असतो, त्याचप्रमाणें या प्राचीन तत्त्ववेत्त्याचा विचारसंग्रह संसारांतील अनेक अडचणींमुळें भांबावून गेलेल्या, परंतु स्वतःच्या कर्तबगारीनें व कष्टानें त्यांतून पार पडण्याचा प्रयत्न करणाऱ्यांस तितका च उपयोगी होईल अशी आशा आहे.

हें पुस्तक मराठी भाषेंत आणतांना शक्य तेवढी काळजी घेतली आहे. तथापि मूळ ग्रंथ अनेक भाषाप्रांत ओलांडून मराठींत येत आहे हें वाचकांनीं विसरूं नये. कांहीं थोड्या ठिकाणीं मराठी भाषेच्या सोयीसाठीं फेरबदल केला असून, कांहीं क्लिष्ट सूत्रें समजण्यास सुलभ

जावीं म्हणून अंमळ विस्तारानें सांगितलीं आहेत. ही ढवळाढवळ अपरिहार्य वाटली; तथापि मुळांतील एक हि महत्त्वाचा विचार अगर शब्द न सुटण्याची योग्य खबरदारी घेतली आहे. हा माझा प्रयत्न कितपत फलद्रूप झाला आहे, हें ठरविणें वाचकांवरच सोंपवितों. या कृतींत माझें स्वतःचें असें कांहीं च नाहीं. मूळ आकृतीवर मीं केवळ मराठी पोषाख चढविला आहे. गुणांचा अधिकारी मूळ लेखक आहे, व दोषांबद्दल जबाबदार मी आहें. पर्यायानें साधु श्रीतुकाराममहाराजांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—

फोडिलें भांडार । धन्याचा हा माल ।
मी तंव हमाल । भारवाही ॥

खांडवा,
ता० ७।६।१९१३. } सदाशिव कृष्ण वैशंपायन.

वाङ्मयभूषणग्रंथावलि

पृथ्वीच्या पाठीवरील सुधारलेल्या राष्ट्रांतील वाङ्मयसंपत्ति व आपल्या देशांतील वाङ्मयसंपत्ति यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. ह्या स्थितीला भाषांची विविधता, परिस्थितीची प्रतिकूलता वगैरे कांहीं जरी कारणें असलीं तरी अशी स्थिति असणें हें दूषणीय किंबहुना अपायकारक आहे. अडचणी अपरिहार्य आहेत, ही सबब प्रगमनेच्छु लोकांना शोभणारी नाहीं. कोणत्या हि देशाच्या वाङ्मयावरून च त्या देशाच्या सुधारणेचें मोजमाप केलें जातें. ह्यासाठीं आपण हि आपलें वाङ्मय समृद्ध व सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीचें करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हें काम एखाददुसऱ्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या हातून पार पडण्याजोगें नाहीं, व तशी हाव धरणें हि हास्यास्पद आहे हें आम्हीं जाणून आहों. तथापि आपल्या हातून एखादें इष्ट कार्य सर्वांशीं सिद्धीस जाणें शक्य नसलें म्हणून त्याचा जेवढा अल्पस्वल्प भाग आटोपिला जाईल तेवढा हि आटोपण्याचा प्रयत्न करूं नये असें होत नाहीं. अशा दृष्टीनें व वरील ध्येयाला अनुसरून कांहीं वाङ्मयसेवा करण्यासाठीं आम्ही ही **वाङ्मयभूषणग्रंथावलि** चालू करित आहों. ह्या ग्रंथावलीमध्यें अमुक एका च प्रकारचे—म्हणजे केवळ धार्मिक, केवळ राजकीय, केवळ सामाजिक, किंवा केवळ ऐतिहासिक—ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस नसून, आपल्या मराठी वाङ्मयाला भूषणास्पद होतील अशा कोणत्या हि ग्रंथांचा तिच्यामध्यें समावेश होईल. अर्थात् ग्रंथप्रसिद्धीला मुदतीचें बंधन घालितां येण्यासारखें नाहीं. कारण, निव्वळ भाषांतरवजा नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी वगैरेशिवाय इतर महत्त्वाच्या विषयांकडे लेखकांच्या लेखणीचा मोर्चा फिरणें सध्यां तरी बरें च अडचणीचें

झालें आहे. तथापि ह्याचा दोष लेखक व वाचक यांपैकीं कोणाच्या च माथीं सर्वस्वीं मारितां येत नाहीं. लेखकांनीं धीटपणें वाचकांच्या नजरेला त्यांची दिशाभूल आणून दिली व वाचकवर्गानें हि नाटकें, कादंबऱ्या यांशिवाय इतर विषयांवर लेखकांनें केलेल्या श्रमाचें थोडेंफार चीज करण्याचें मनावर घेतलें, तर ही आपत्ति टळेल. सारांश, ग्रंथप्रसिद्धीला मुदतीचें बंधन घालणें सध्यां जरी शक्य नसलें तरी लेखक व वाचक (अर्थात् ग्राहक वाचक) ह्यांच्या अनुकूलतेनें तसें बंधन घालणें पुढेंमागें शक्य होईल अशी उमेद आहे. आम्हीं आमचें धोरण वर व्यक्त केलें च आहे. तथापि त्या धोरणाला अनुसरून आमच्या हातून कामगिरी घडविण्याचें व कांहीं चूकभूल झाल्यास किंवा होत असल्यास ती मोकळ्या मनानें व सद्बुद्धीनें आमच्या नजरेस आणण्याचें काम आमच्या भाषाबंधूंचें आहे, व तें करण्याचा अधिकार त्यांनीं योग्य वेळीं अमलांत आणण्यास अनमान करूं नये अशी आमची अपेक्षा व विनंति आहे.

पहिला ग्रंथ **संसारशास्त्र** अथवा **मानवी जीविताचीं सूत्रें** हा लोकांपुढें आहे च. याच्यानंतर

“ प्लूटार्क्स् लाइव्हस् ”

अथवा

प्लूटार्कनें लिहिलेलीं प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें

या ग्रंथांतील चरित्रांपैकीं कांहीं प्रमुख चरित्रांचीं भाषांतरें आम्ही प्रसिद्ध करणार आहों. “ प्लूटार्क्स् लाइव्हस् ” हा मूळ ग्रंथ किती महत्त्वाचा आणि किती योग्यतेचा आहे, याच्याविषयीं आम्हीं लिहावयाला पाहिजे आहे असें नाहीं. त्यांतील बहुतेक चरित्रें अतिशय बोधप्रद आहेत; व ग्रीक आणि रोमन इतिहासांतील माहितीच्या दृष्टीनें त्यांची

किंमत फार मोठी आहे. पाश्चात्य राष्ट्रांतील सर्व भाषांमधून या ग्रंथाचीं भाषांतरें झालेलीं आहेत. इतकी ज्याची योग्यता आहे, त्या ग्रंथांतील चरित्रांचीं भाषांतरें आपल्या महाराष्ट्र-वाङ्मयामध्यें होणें अवश्यक आहे. म्हणून आपल्या समाजाला विशेष उपयुक्त होतील अशीं त्यांतील चांगलीं चांगलीं चरित्रें निवडून काढून तीं प्रथमतः आमच्या आश्रय-दात्यांना अर्पण करण्याचा आम्हीं विचार योजिलेला आहे. यथार्थ भाषांतर करण्याचें काम मूळ ग्रंथलेखनापेक्षां हि अधिक कुशलतेचें आहे असें कित्येक वेळां म्हणावें लागतें. "प्लूटार्क्स लाइव्हस्" ह्या जगमान्य ग्रंथाची गोष्ट हि अशी च आहे. तथापि ह्या ग्रंथाचें वर लिहिल्याप्रमाणें भाषां-तर करण्याचें काम प्रो० शिवराम महादेव परांजपे एम्. ए. हे करणार आहेत इतकें सांगितलें म्हणजे, भाषांतर कसें काय होईल हें मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांना निराळें सांगण्याची जरूर नाहीं. ह्या ग्रंथावलीमध्यें

कै० विष्णुशास्त्री चिपळुणकरकृत
निबंधमाला

हा ग्रंथ हि लवकर च प्रसिद्ध करण्याचें आम्हीं योजिलें आहे. शास्त्री-बुवांच्या निबंधमालेला आधुनिक मराठी गद्य वाङ्मयाची गंगोत्री असें पुष्कळजण मानितात. ही उपमा कित्येकांस कदाचित् अयोग्य वाटत असली—म्हणजे मराठी गद्य वाङ्मयाची स्थापना निबंधमालेपूर्वीं झाली होती, असें त्यांचें मत असलें—तरी निबंधमाला हा ग्रंथ सर्वोत्कृष्ट मराठी गद्यग्रंथांत मोडतो, व त्यानें मराठी भाषेस एक नवीन वळण लाविलें, ही गोष्ट ते नाकबूल करीत नाहींत. असा हा ग्रंथ आज वाचकांस उपलब्ध नसावा ही शोचनीय गोष्ट होय. पण हा दोष वाचकांचा आहे

असें म्हणतां येणार नाहीं. कारण, निबंधमाला आज मिळाली तर ती घेऊन वाचण्याची त्यांची तयारी च आहे. तथापि निबंधमाला आज अनेक कारणांनीं पूर्वीच्या च समग्र स्वरूपांत प्रसिद्ध करितां येत नाहीं. शिवाय मालेंतील कित्येक लेखांस तात्पुरतें महत्त्व होतें ही हि गोष्ट नाकबूल करितां येणार नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, जरूर ते निबंध किंवा निबंधांचे भाग वगळून पण एरवीं एक काना, मात्रा, अनुस्वार हि इकडचा इकडे न करितां निबंधमालेची ही नवीन आवृत्ति काढावयाची असून, त्या धोरणानें ह्या नवीन आवृत्तीचें काम रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर** यांच्या देखरेखीखालीं होणार आहे.

सरतेशेवटीं मराठी भाषेच्या अभिमान्यांना आमची एवढी च विनंति आहे कीं, उपयुक्त ग्रंथांचा संग्रह ही आपल्याला व आपल्या मुलांबाळांना कायमची उपयोगीं पडणारी धनदौलत च आहे हें लक्षांत ठेवून त्यांनीं आमच्या प्रयत्नास उत्तेजन द्यावें.

ह्या ग्रंथावलीच्या कायम ग्राहकांना प्रवेश फी वगैरे आगाऊ कांहीं भरावें लागत नाहीं; तर पुढचा ग्रंथ प्रसिद्ध झाला म्हणजे त्याच्या किंमतींतून मागच्या ग्रंथाची चतुर्थांश किंमत वजा करून तो देण्यांत येतो.

नांवें नोंदण्याचा पत्ता:—

म्यानेजर **धि प्रिंटिंग एजन्सी**, बुधवार पेठ, पुणें.

विषयानुक्रमणिका

पूर्वार्ध

खण्ड पहिला

व्यक्तिगत मानवी कार्यें

खण्ड दुसरा

मनोधर्म

विषय | पृष्ठांक

खण्ड तिसरा

खण्ड चवथा

कौटुंबिक संबंध

खण्ड पांचवा

ईश्वरी नेमानेम

अथवा

मनुष्यांतील दैवोपगत अंतर

खण्ड सहावा

सामाजिक कर्तव्यें

विषय पृष्ठांक

खण्ड तिसरा

स्वपरविघातक मानवी मनोधर्म

खण्ड चवथा

मनुष्यास स्वजातीयांवर मिळवितां येण्याजोगे लाभ

खण्ड पांचवा

स्वाभाविक योगायोग.

श्रीः

संसारशास्त्र

अथवा

मानवी जीवितार्चीं सूत्रें.

उपोद्घात.

हे मर्त्यांनो! विनीतशिर होऊन, उपरिष्टात् प्राप्त झालेल्या या उपदेशामृताचें आनंदानें पान करा.

जेथें जेथें सूर्य प्रकाशतो, जेथें जेथें वायूचा प्रवेश होतो, जेथे जेथें म्हणून श्रवण करून मनन करण्या-साठीं कोणी तरी आहे, तेथें तेथें जीवनाचे नियम प्रसिद्ध होऊं द्या व सत्याच्या सिद्धांतांचा गौरव होऊन त्यांचें पालन होऊं द्या.

प्रत्येक गोष्टीचें निदान परमेश्वर आहे. त्याची सत्ता अमर्याद आहे, त्याचें ज्ञान अनादि आहे, आणि त्याचें वात्सल्य व सौजन्य हीं नित्य आहेत.

तो मध्यभागीं सिंहासनारूढ असून, त्याचा उच्छ्वास साऱ्या विश्वाला चेतना देतो.

त्याच्या अंगुलिस्पर्शानें नक्षत्रांना गति मिळून तीं आपापल्या कक्षेंत आनंदानें फिरतात.

तो वायूवर आरूढ होऊन सर्वत्र भ्रमण करतो, व अनंत विश्वांत इच्छेनुरूप कार्यें घडवून आणतो.

नियमपरंपरा, प्रसाद व सौंदर्य त्याच्या च पासून उद्भवतात.

प्रत्येक व्यापारांत त्याचें ज्ञान दृग्गोचर होतें; परंतु मानवी बुद्धीला त्या ज्ञानाचें आकलन होत नाहीं.

मनुष्याच्या मनाला ज्ञानाची छटा स्वप्नाप्रमाणें अल्पकाल भासते; एरवीं तो अज्ञानांधकारांत चांचपत असतो; तो जरी फार विचार करतो तरी पण फसतो च.

परंतु परमेश्वराचें ज्ञान स्वर्गीय दिव्य ज्योतीप्रमाणें आहे; त्याला विचार करण्याची गरज च नाहीं. त्याचें मन सत्याचा झरा च होय.

न्याय व दया त्याच्यासमोर हात जोडून उभ्या असतात; परोपकार आणि प्रेम [ह्यांचें तेज] त्याच्या मुखावर सतत झळकत असतें.

ईश्वराप्रमाणें महौजस कोण आहे? ईश्वराच्या शक्तीची बरोबरी कोण करूं शकेल? ज्ञानांत त्याच्या जोडीचा कोणी तरी आहे काय? सौजन्यांत त्याच्याशीं कोणाची तरी तुलना करतां येईल काय?

अशा सर्वशक्तिमान्, सर्वव्यापी व सर्वसाक्षी परमेश्वरानें मनुष्याला निर्माण केलें आहे. पृथ्वीवरील त्याच्या कार्याची दिशा त्यानें च ठरविली आहे. त्याची मानसिक शक्ति हि त्या ईश्वराच्या च सौजन्याचा प्रसाद होय; व मानवी शरीररचनेचे चमत्कार त्याच्या च हातचे खेळ होत.

एवढ्यासाठीं, त्याचें वचन श्रवण करावें; कारण, तें श्रेयस्कर आहे; आणि जो त्याप्रमाणें आचरण करील, त्याच्या आत्म्याला निःसंशय शांति मिळेल.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

खण्ड पहिला.

व्यक्तिगत मानवी कार्यें.

प्रकरण पहिलें.

कार्याकार्यविचार.

परमेश्वरानें आपल्या सर्व सृष्टींत मानवी प्राण्याला अग्रस्थान दिलें आहे. " आहार-निद्रा-भय-मैथुनं च । सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् । " परंतु मानवी प्राण्याला विचारशक्ति देऊन, त्यानें त्याला आपल्या कृपेला विशेष पात्र करून ठेविलें आहे. या च देणग्यांमुळें मनुष्याला इतर सर्व प्राण्यांवर अधिकार चालवितां येऊन आपली पदवी कायम राखतां येते. या आपल्या अमूल्य साधनांचा जर त्यानें योग्य उपयोग केला नाहीं, तर त्याला पशूंत काढण्यास कांहीं च हरकत नाहीं.

जर आपल्याला बुद्धि व विचारशक्ति मिळाली आहे तर तिचा उपयोग करून घेतला पाहिजे. त्यांच्या च साह्यानें, त्या आपल्याला कां मिळाल्या, त्या कोणीं

दिल्या, व त्या देण्यांत देणाऱ्याचा उद्देश काय, याचा तपास लावला पाहिजे. परमेश्वरानें त्या आपणास दिल्या व त्या देण्याचा हेतु म्हणजे, आपणास त्याचे कायदे योग्य प्रकारें पाळतां येऊन, आपली संसारयात्रा सुगम व सुखकर व्हावी हा होय, हें आजपावेतों पुष्कळ भवति न भवति होऊन अखेर निश्चित झालें आहे.

सहज चारदोन कोसांचा प्रवास करावयाचा असला तरी आपण आधीं, रस्ता कसा काय आहे, कोणी सोबत आहे किंवा नाहीं, खाण्यापिण्याची काय व्यवस्था होईल, खर्च किती लागेल, इत्यादि गोष्टींची चौकशी करतों; तेव्हां हा मोठाथोरला प्रवास, ही भयंकर संसारयात्रा करायची म्हणजे प्रथम च किती तरी तरतूद करावयाला हवी !

ही खुषीनें अगर नाखुषीनें प्रत्येकाला करावी लागणारी यात्रा सुगम व्हावी, म्हणून आधीं आपण आपल्या सामर्थ्याचा विचार, आपल्या अपेक्षांचा व आप्तविषयांचा अंदाज केला, तर आपल्याला संसारांतील कर्तव्याकर्तव्य समजून प्रत्येक कार्यांत आपली दिशा स्पष्टपणें कळेल.

आपल्या शब्दांचा नीट विचार केल्यावांचून कांहीं हि बोलूं नये, व परिणामाचें सूक्ष्म निरीक्षण केल्याशिवाय कोणती हि गोष्ट करूं नये. असें केल्यानें अपकीर्तीचें भय नाहीं, लाज वाटण्याची गरज नाहीं व पश्चात्तापाचें अगर चिंतेचें हि कारण नाहीं.

अविचारी मनुष्य आपल्या जिभेला आळा घालीत नाहीं. तो तोंडास येईल तें बडबडत सुटतो व यामुळें आपल्या च शब्दांत बांधला जाऊन फजीत होतो.

कुंपणाच्या पलीकडे काय आहे, हें आधीं नीट न बघतां घाईघाईनें धांवत जाऊन जर त्यावरून उडी मारली, तर दुसऱ्या बाजूस असलेल्या खळग्यांत पडून हातपाय मोडण्याचा संभव असतो; परिणामाचा नीट विचार केल्याशिवाय कोणत्या हि कृत्यांत अकस्मात् उडी घालणारा मनुष्य असा च तोंडघशीं पडतो.

म्हणून आधीं कार्याकार्यविचार करावा, बुद्धीची व विचारशक्तीची मदत घ्यावी, म्हणजे संसारयात्रेंतील दिशा कळून, खऱ्या व सुरक्षित मुक्कामावर पोहोंचतां येईल.

प्रकरण दुसरें.

विनय.

अखिल ब्रह्मांड केवढें आहे याची नुसती कल्पना च जरी करायचा प्रयत्न केला, तरी सुद्धां मानवी प्राणी किती क्षुद्र, किती यःकश्चित् आहे, याची सहज साक्ष पटेल. असें असून, आपल्या शहाणपणाचा तोरा मिरविण्यास, आपल्या ज्ञानाचा गर्व वाहण्यास, मनुष्य झोंपेंत सुद्धां अगदीं एका पायावर तयार असतो! येवढा ताठा बाळगण्यास आपण कोणत्या सागरांतील खसखस आहोंत हें त्याला सांगतां येईल काय?

आपल्या अज्ञपणाची जाणीव ही च ज्ञानवान् होण्याची पहिली पायरी होय; आणि आपल्याला दुसऱ्यांनीं मूर्ख समजूं नये अशी जर इच्छा असेल तर स्वतः च आपल्याला शहाणे म्हणविण्याचा वेडेपणा करूं नये.

ज्याप्रमाणें साधें च वस्त्र एखाद्या सुंदरीला उत्तम प्रकारें शोभा देते, त्याचप्रमाणें योग्य, प्रशस्त व साधी वागणूक ही शहाणपणाचा अत्युत्तम अलंकार होय.

विनययुक्त भाषणानें सत्याला हि तेज चढतें. नेहमीं आपल्या शब्दाचा संकोच—अविश्वास—वाटत असावा.

कोणती हि गोष्ट छातीला हात लावून खात्रीनें सांगूं नये. कारण, प्रत्येक गोष्टींत खरें काय आहे, हें मानवी बुद्धीला कळूं शकत नाहीं.

आपल्या च शहाणपणावर भिस्त ठेवूं नये; आपल्या च अकलेचा भरंवसा धरूं नये; तर आपल्या इष्टमित्रांच्या –हितचिंतकांच्या–सल्लामसलतीचा विचार करून तिचा फायदा घ्यावा.

स्वस्तुतीचें पान करूं नये व तिच्यावर विश्वास हि ठेवूं नये; कारण, ती मदिरेपेक्षां हि घातक आहे. परमेश्वराशिवाय अन्य कोणी हि निर्दोष, अव्यंग नाहीं. तथापि आपण निर्दोष आहोंत हें आपणांस सर्वांच्या मागून कळलेलें च बरें.

ज्याप्रमाणें बुरखा एखाद्या तरुणीचें सौंदर्य वाढवितो, त्याचप्रमाणें विनयाची छाया मनुष्याच्या सद्गुणाला अधिक शोभिवंत करते.

परंतु गर्विष्ठ माणसाकडे पहावें, मगरुराकडे लक्ष द्यावें, तर तो उंची भपकेदार पोषाख करून भररस्त्यांतून इकडे तिकडे बघत हिंडताना दिसतो. लोकांनीं आपलेकडे बघावें, आपलें कौतुक करावें, आपल्याला लवून अदबीनें मुजरा करावा, असें त्याला

वाटत असतें. तो आपली मान ताठ ठेवतो, गरीब-गुरीबांकडे लक्ष देत नाहीं; आपल्यापेक्षां कमी दर्ज्याच्या लोकांशीं उद्धटपणानें वागतो; आणि यामुळें त्याच्यापेक्षां उच्च दर्ज्याचे लोक त्याच्या गर्वाचा व मूर्खपणाचा साहजिक च हंसून उपहास करतात.

घमेंडखोर मनुष्य दुसऱ्याच्या मताचा अवमान करतो. तो आपल्या च मतावर भिस्त ठेवतो. आपल्या च अकलेवर विसंबून राहतो, आणि शेवटीं घोटाळ्यांत पडतो. आपल्या कल्पनांच्या भरांत तो फुशारून जातो, व सदासर्वदां स्वतःविषयीं बोलण्यांत व ऐकण्यांत त्याला आनंद वाटतो; पण इकडे तो आत्मस्तुतीचें अधाशाप्रमाणें पान करीत असतां तिकडे हांजीहांजी करणारे–खुशामते–त्याच्या न कळत त्याला पार गिळून सुद्धां टाकतात.

प्रकरण तिसरें.

उद्योग.

ज्याअर्थीं गेलेले दिवस पुन्हां परत येत नाहींत, व पुढें येणारे दिवस दिसतील च असा कांहीं भरंवसा

नाहीं, त्याअर्थीं भूतकाळ गमविल्याबद्दल खेद न करतां, अगर भविष्यकाळावर फारशी भिस्त न ठेवतां वर्तमानकाळाचा च उपयोग करून घ्यावा, हें उचित आहे. हा क्षण आपला आहे हें खरें आहे. पुढचा भविष्याच्या उदरांत असल्यानें त्यांत काय होईल हें सांगतां येणार नाहीं; म्हणून जें कांहीं करावयाचें असेल तें तावडतोब करावें; सकाळीं होण्यासारखें काम सायंकाळपर्यंत लांबणीवर टाकूं नये.

आळसामुळें अवश्यक वस्तूंची देखील वाण पडून दुःखास कारण होतें; परंतु उद्योगापासून—सत्कृत्यांत केलेल्या उद्योगापासून—आनंदीआनंद होतो. उद्योग व दक्षता कोणच्या हि गोष्टीची कमतरता पडूं देत नाहींत; कारण, उन्नति व जय हे उद्योगाचे अनुचर होत.

जो कधीं हि रिकामा बसत नाहीं व आळसाला शत्रूप्रमाणें लेखतो, तो धनवान्, अधिकारसंपन्न व सन्मान्य होतो; आणि मोठमोठे राजेमहाराजे हि त्याच्या सल्लामसलतीची अपेक्षा करतात.

उद्योगी मनुष्य पहाटेस लवकर उठतो व रात्रीं उशिरां निजतो; तो आपल्या मनाला मननानें व शरी-

राला कृतीनें व्यायाम देऊन, उभयतांस हि सशक्त व तरतरीत ठेवतो.

परंतु आळशी मनुष्य पृथ्वीला च काय पण स्वतः-स हि भारभूत होतो; कारण, त्याचा वेळ जातां जात नाहीं. तो रिकामटेकडा भटकतो, व काय करावें याचा च त्याला उमज पडत नाहीं. ढगाच्या सावली-प्रमाणें त्याचें आयुष्य निघून जातें, व मागें लोकांनीं आठवण करण्यासारखी कांहीं हि खूण ठेवून तो जात नाहीं. व्यायामाच्या अभावानें त्याचें शरीर रोगी असतें. कांहीं हालचाल करावीशी त्याला वाटते; पण ती करण्याचें त्याच्यांत सामर्थ्य नसतें. त्याच्या मना-वर अंधकारपटल आलेलें असून त्याच्या विचारांचा गोंधळ उडून गेलेला असतो. त्याला ज्ञानप्राप्तीची लालसा असते; पण त्याच्या अंगांत उद्योग करण्या-चा तकवा नसतो. त्याला बदाम तर खावासा वाटतो; पण त्याची कवची फोडण्याचा त्रास तो घेऊं इच्छित नाहीं.

आळशाच्या घरांत अव्यवस्था असते. त्याचे नोकर-चाकर नासधूस करणारे व बेपर्वा असतात, आणि तो विनाशाकडे धांव घेत असतो. त्याला (विना-

शाला) तो डोळ्यांनीं बघतो, कानांनीं त्याचा शब्द ऐकतो व त्यापासून वांचण्याची इच्छा करतो; पण त्याच्यांत निश्चय नसतो. निदानला विनाश त्याच्यावर वावटळीप्रमाणें येऊन आदळतो, आणि मरेपर्यंत त्याला लाज वाटत असते व पश्चात्ताप होत असतो. परंतु वेळ निघून गेल्यावर या सर्वांचा उपयोग काय ?

प्रकरण चवथें.

ईर्षा.

ज्याच्या मनाला सन्मानाची तळमळ लागली असेल, ज्याचे कान स्वस्तुतीचें पान करण्यास हापापले असतील, त्यानें–ज्यापासून आपली उत्पत्ति झाली आहे त्या–जडत्वाला टाकून, उंच भरारी मारून, एखाद्या स्तुत्य गोष्टीस आपलें ध्येय बनविलें पाहिजे.

मेघमंडलाचें चुंबन घेणारा हा वृक्ष पहा ! हा एका काळीं पृथ्वीच्या गर्भांत असलेलें क्षुद्र बीज होता !

आपला जो कांहीं धंदा असेल त्यांत अगदीं वरच्या पायरीवर चढण्याचा प्रयत्न करावा; सत्कृत्यांत कोणाला हि आपल्या पुढें जाऊं देऊं नये. परंतु दुस-

त्याच्या गुणांचा–योग्यतेचा–हेवा करूं नये; तर आपल्या गुणांची–आपल्या योग्यतेची–उन्नति, वृद्धि करावी. आपल्या प्रतिस्पर्ध्यास अप्रामाणिकपणानें अगर अयोग्य मार्गाचें अवलंबन करून दडपूं नये; तर त्याच्यावर ताण करून च त्याच्यापेक्षां श्रेष्ठ होण्याचा प्रयत्न करावा; आणि जरी मग श्रेष्ठ होण्याचा हा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं तरी निदान तो सन्मान्य तरी होईल.

सात्त्विक ईर्षेनें मनुष्याचा आत्मा उन्नत होतो; त्याला कीर्तीची तळमळ लागून राहते; आणि आपली मजल मारण्यांत च त्याला आनंद होतो. प्रतिकाराला न जुमानतां तालवृक्षाप्रमाणें तो वाढत जातो व गरुडाप्रमाणें उंच भराऱ्या मारतो. रात्रीं स्वप्नांत सुद्धां त्याला श्रेष्ठ व थोर पुरुषांचीं च उदाहरणें दृष्टीस पडतात; आणि मग साऱ्या दिवसभर त्यांचें अनुकरण करण्यांत च त्याला आनंद होतो. तो मोठमोठाले बेत करून नेटानें व हौशीनें ते पार पाडतो, आणि मग त्याची कीर्ति साऱ्या जगभर पसरते.

परंतु मत्सरी मनुष्याचें अंतःकरण कुटकीप्रमाणें कडू असतें. त्याच्या शब्दाबरोबर विष बाहेर येतें.

शेजाऱ्यापाजाऱ्यांचा उत्कर्ष त्याला चैन पडूं देत नाहीं. तो आपल्या खोपटींत झुरत पडतो व दुसऱ्याच्या बऱ्याला आपलें वाईट मानतो. तिरस्कार व द्वेष त्याच्या हृदयाला पोखरून टाकतात; आणि त्याच्या मनाला शांति अशी मुळीं च मिळत नाहीं.

मत्सरी माणसाच्या मनांत भलेपणाविषयीं प्रेमभाव वसत नाहीं; व म्हणून च इतरांना हि तो आपल्या-प्रमाणें च लेखतो. आपल्यापेक्षां श्रेष्ठ लोकांची किंमत कमी करण्याचा तो नेहमीं यत्न करीत असतो, व त्यांच्या प्रत्येक कृतीचा वाईट अर्थ करण्याच्या खट-पटींत असतो. अपकार करण्यासाठीं प्रसंगाची वाट पहात तो टपून बसला असतो. पण लोकांचा तिर-स्कार त्याचा पिच्छा सोडीत नाहीं, आणि शेवटीं कोळ्याप्रमाणें स्वतः पसरलेल्या जाळ्यांत तो गुरफ-टला जातो.

प्रकरण पांचवें.

तारतम्य.

तारतम्य ही एक अजब चीज आहे. ज्याला तार-तम्य नाहीं तो मनुष्य काय? ही कांहीं विकत मिळ-

णारी वस्तु नव्हे. थोड्याबहुत प्रमाणानें मनुष्यांत हें निसर्गतः च असतें. परंतु अधिक मिळविण्यासाठीं सूक्ष्म निरीक्षणाचें व अनुभवाचें साहाय्य घ्यावें लागतें. याच्या आश्रयानें अनेक सद्गुण वास करतात. संसार-यात्रा सुगम व सुखकर होण्यास तारतम्याची अत्यंत आवश्यकता आहे. तारतम्य हें मानवी जीविताचा नेता व स्वामी होय.

आपल्या जिभेला आळा घालावा. तोंडास येईल तें बडबडत सुटूं नये. कांहीं तरी बोलायचें म्हणून बोलूं नये. आपल्या सुखाची माती होऊं नये, शांततेचा भंग होऊं नये, म्हणून ओंठावर जडसें दडपण ठेवावें.

पांगळ्याला जो हंसतो, त्यानें स्वतःला वाटेंत मुक्काम करण्याचा प्रसंग न येईल याबद्दल खबरदारी बाळगली पाहिजे. दुसऱ्यांच्या दोषांचें, दुसऱ्यांच्या व्यंगांचें, जो आनंदानें वर्णन करीत असतो, त्याला आपल्या स्वतःच्या दोषांचें व व्यंगांचें वर्णन ऐकण्याचा दुःखद प्रसंग येतो. कारण, आपण म्हणजे च जग. मनुष्यस्वभाव येथून तेथून बहुतकरून सारखा च. आपण जसें करूं तसें लोक हि पण करणार च.

वाचाळतेमुळें पश्चात्तापाचा प्रसंग येतो. मौनांत मात्र सुरक्षितपणा आहे.

वाचाळापासून समाजाला उपाधि होते. त्याच्या बडबडीनें कान किटून जातात व दुसऱ्यास बोलण्याचा अवसर मिळत नाहीं, आणि संभाषणांत व्यत्यय येऊन विरस होतो.

स्वतःची बढाई करूं नये; कारण, त्यामुळें लोक आपला तिरस्कार करतात. कोणाचा उपहास हि करूं नये; कारण, त्यापासून धोका आहे. कडू वाटणारी थट्टा मैत्रींत विष कालविते. ज्याला आपली जीभ ताब्यांत ठेवतां येत नाहीं, तो संकटांत पडतो.

आपल्या स्थितीला, योग्यतेला साजेल असा सरंजाम जमवावा. परंतु तारुण्यांत राखलेल्या शिलकीनें वृद्धापकाळीं सुख व्हावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें ऐपत असेल तेवढें सगळें खर्चून टाकूं नये. द्रव्यतृष्णा फार वाईट. ती अनेक पापकर्में व अनर्थ करायला प्रवृत्त करते. पण काटकसरीमुळें सद्गुणांना अवसर मिळतो. कारण, मग लपंडाव करायची गरज च उरत नाहीं. श्रीमान होण्याचा, द्रव्य मिळवणें, हा

कांहीं खरा मार्ग नव्हे; तर काटकसर–मितव्यय–हा च खरा मार्ग होय.

आपल्या कामावर लक्ष ठेवावें; रिकामी दुसऱ्याची उठाठेव करूं नये. अव्यापारेषुव्यापाराचा परिणाम कांहीं भलता च होतो. सगळ्या जगाची चिंता करणें वेडेपणाचें होय.

आपल्या करमणुकीचे प्रकार फार खर्चाचे असूं नयेत; कारण, त्यांपासून होणाऱ्या आनंदापेक्षां त्यांना प्राप्त करण्यासाठीं क्लेश च अधिक होतात. मग ज्यापासून आनंद तर अगदीं थोडा पण त्रास च फार, त्याचा काय फायदा ?

उत्कर्ष झाला तरी सावधपणा सोडूं नये; अथवा विपुलता असली म्हणून काटकसरीला फांटा देऊन उधळमाधळ करूं नये. फाजील–निरुपयोगी–गोष्टींकडे अधिक प्रवृत्ति असली म्हणजे संसारांत लागणाऱ्या आवश्यक गोष्टींसाठीं देखील शोक करण्याची पाळी येते.

दुसऱ्याच्या अनुभवाचा फायदा घ्यावा, त्यापासून शहाणपणा शिकावा. अनुभव हा फार कष्टानें–फार श्रमानें–मिळतो; मग तो जर फुकट मिळत असला तर

उत्तम च. मेल्यावांचून जर स्वर्ग दिसत असला तर मरण्याची काय आवश्यकता? चार लोक अमकी गोष्ट वाईट आहे असें सांगतील तर तिचा स्वतः च अनुभव घेण्यांत काय हंशील आहे? लोकांच्या अपयशाकडे बघून च आपल्या दोषांची सुधारणा करावी.

आधीं नीट परीक्षा केल्याशिवाय कोणाचा हि विश्वास धरूं नये; तथापि कारणावांचून अविश्वास हि दाखवूं नये. कारण, हें अनुदारपणाचें लक्षण आहे. तेव्हां नीट परीक्षा होईपर्यंत तटस्थ राहून वाट बघणें च चांगलें. परंतु एखाद्याच्या प्रामाणिकपणाबद्दल खात्री झाल्यावर त्याला आपल्या हृदयांत सांठवून ठेवावें; डोळ्यांतल्या बाहुलीप्रमाणें त्याला जपावें.

लोभ्याच्या उपकाराचा स्वीकार करूं नये; कारण, तो उपकार च आपला पाश होतो. त्याची फेड कधीं हि होणार नाहीं. हो! लोभी च तो. आपला उपकार—मग तो किती हि क्षुल्लक असो—फिटला असें त्याला कधीं च वाटणार नाहीं. मोठमोठाले प्रत्युपकार विसरून तो आपली च टिमकी वाजवीत राहील.

उद्यां ज्याची गरज लागेल तें आज च खर्चून टाकूं नये, आणि दूरदृष्टीनें ज्या गोष्टीची तरतूद करतां

येईल, अगर दक्षतेनें प्रतिकार करतां येईल, तिला कधीं हि भवितव्याच्या स्वाधीन करूं नये. कारण,— " यद्भविष्यो विनश्यति ! "

तत्रापि तारतम्यापासून—दूरदृष्टीपासून—दक्षतेपासून नेहमीं च जयाची अपेक्षा करूं नये; कारण, पुढल्या क्षणांत काय होईल हें कोणास सांगतां येणार नाहीं. आपल्याकडून काळजी घ्यावी; होणेंजाणें हें ईश्वराधीन आहे.

मूर्ख मनुष्य नेहमीं च अभागी असतो व शहाणा मनुष्य नेहमीं च विजयी होतो असें नाहीं. तत्रापि मूर्खाला पूर्णानंद कधीं हि लाधला नाहीं अगर शहाणा व दक्ष मनुष्य कधीं हि पूर्णपणें दुःखी झाला नाहीं.

प्रकरण सहावें.

धैर्य.

जे जे म्हणून या मृत्युलोकांत जन्मास येतात, त्यांपैकीं प्रत्येकाच्या वांट्यास संकटें व दुर्दैव आणि वाण व दुःख तशी च इजा हीं थोड्याबहुत प्रमाणानें येतात च; हें अपरिहार्य म्हणून मानवी दुःखाच्या

आपल्या वांट्याला योग्य निश्चयानें व धैर्यानें तोंड देतां यावें, एतदर्थ प्रथमपासून च आपल्या मनाला धैर्याचें व सहनशीलतेचें कवच घालणें उचित होय. कारण, ज्याप्रमाणें उंट मरुस्थलांत श्रम, ऊन, भूक व तहान सोसून हि ढिला पडत नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्याचें धैर्य त्याला संकटसमयीं सांवरून धरतें.

तेजस्वी पुरुष दैवाच्या वक्रदृष्टीला तुच्छ मानतो. त्याचा आत्मा आपल्या श्रेष्ठत्वापासून किंचित् हि ढळत नाहीं. तो आपल्या सुखाला दैवाच्या कृपा-दृष्टीवर अवलंबून राहूं देत नाहीं, आणि म्हणून च त्याच्या वक्रदृष्टीमुळें तो निरुत्साह होत नाहीं. ठीक च आहे; खडकावर गोड्या पाण्याच्या लाटा आदळल्या काय, अगर खाऱ्या पाण्याच्या आदळल्या काय, एक च !

तो संकटसमयीं पर्वताप्रमाणें अचल असतो. दुर्दैवाचे तीक्ष्ण शर त्याच्या पायाशीं च पडतात. संकट-समयीं त्याचें धैर्य त्याला सांवरून धरतें व त्याचा मनोनिग्रह त्यांतून त्याला निभावून नेतो. रणांगणीं जाणाऱ्या वीराप्रमाणें तो या संसारांतील अरिष्टांना तोंड देतो व विजयी होऊन परत येतो. त्याचें स्थैर्य

दुर्दैवाच्या भाराला हलकें करितें आणि त्याची चिकाटी त्या भाराला दूर झुगारून देते !

परंतु भेंकड माणसाचा नामर्दपणा त्याला लाज आणितो. दारिद्र्याच्या दाबाखालीं तो नीचपणा करण्यास प्रवृत्त होतो, व मग मुकाट्यानें अपमान सोसून विनाशाला आमंत्रण करितो. ज्याप्रमाणें गवताची काडी वाऱ्याच्या झुळकेनें हलूं लागते, त्याप्रमाणें अरिष्टाची नुसती कल्पना देखील त्याला कांपवून सोडते. संकटसमयीं त्याचा घोंटाळा उडतो; त्याला कांहीं च सुचेनासें होतें; निराशा त्याला ग्रासून टाकते, आणि हें सगळें कां? तर त्याच्यांत धैर्य नाहीं म्हणून.

प्रकरण सातवें.

संतोष.

परमेश्वर सर्वसाक्षी आहे. त्याला प्रत्येकाच्या मनांत काय आहे हें ठाऊक आहे. केवळ दयेमुळें च तो आपल्या कांहीं इच्छा पुरवीत नाहीं. प्रत्येकाला वाटतें कीं, देवाचा आपल्यावर कटाक्ष आहे, तो जुलमी आहे, त्याच्या घरीं न्याय नाहीं. आम्ही इतके चांगले

असून आमची अशी दशा काय म्हणून? पण हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें कीं, प्रत्येकाला आपापल्या योग्यतेनुरूप या जगांत स्थान मिळत असतें, आणि ईश्वर जरी वैषम्य–नैर्घृण्य–युक्त दिसतो, तरी त्यानें सर्व योग्य इच्छा तृप्त होण्याची, सर्व प्रामाणिकपणांत यश मिळण्याची, निसर्गतः च व्यवस्था करून ठेवली आहे, हें विसरूं नये.

आपल्या अस्वस्थतेचें, ज्याबद्दल आपण खेद करितों त्या दुर्दैवाचें, त्याचप्रमाणें स्वतःच्या वेडेपणाचें, गर्वाचें व रोगट कल्पनांचें मूळ शोधून काढावें. ईश्वरी योजनेबद्दल व्यर्थ कुरकूर करूं नये. तर प्रथम स्वतःची अंतःकरणशुद्धि करावी.

माझ्याजवळ जर संपत्ति असती, अगर मला अधिकार असता, किंवा मागें पोटाचा धंदा नसून रिकामपण असतें, तर मी सुखी असतों, असें नुसतें मनांत देखील आणूं नये. कारण, या गोष्टी ज्यांचे जवळ आहेत, त्यांना कांहीं विशेष अडचणी असतात, हें आपण विसरतों. गरीबाला श्रीमंतांची चिंता व त्रास कळत नाहींत; सत्तेच्या मागें किती गैरसोयी व किती लचांडें असतात, हें त्याला समजत नाहीं; त्याचप्रमाणें

रिकामपण किती कंटाळवाणें असतें, हें त्याला ठाऊक नसतें; आणि म्हणून च आपल्या स्थितीबद्दल तो मनांत कुढतो. दुसरा सुखी दिसतो म्हणून त्याचा हेवा करूं नये; कारण, त्याला अंतस्थ काय दुःख आहे, हें आपल्याला कळत नसतें. दुसऱ्याच्या पानांतला भात पुष्कळ दिसतो, दुरून डोंगर साजरे दिसतात, एवढें च काय तें.

थोडक्यांत संतोष मानणें यांत च खरा शहाणपणा आहे. जो आपल्या धनाची वृद्धि करतो, तो आपल्यामागें चिंता हि अधिक लावून घेतो. परंतु संतोष हें गुप्त धन आहे व तें चिंतेला सांपडत नाहीं. तात्पर्य, लोभी तो दरिद्री व संतोषी तो च धनवान. "गजधन, हयधन, कनकधन, रतनखान बहुखान। जब आवत संतोषधन, सबधन धूलसमान." गुरूनें शिष्याला हें च सार सांगून सुखाची किल्ली दाखविली.

'कोण दरिद्री?' 'ज्याच्या हृदयीं तृष्णा सदा विशाल वसे'।
'श्रीमान् कोण म्हणावा?' 'जो नर संतुष्टचित्त नित्य असे.' ॥

यावरून पैसा मिळवणें, धनाचा संचय करणें वाईट असें मात्र कोणीं समजूं नये. संपत्तीचा जर योग्य उपयोग केला तर तिच्यापासून हि अनेक पुरुषार्थ

साधतां येतील. संपत्तीच्या मोहानें—मदानें—जर न्याय, नेमस्तपणा, परहितबुद्धि, विनय, इत्यादिकांस आपण फांटा दिला नाहीं, तर संपत्तीपासून हि आपणांस सुख होईल. संपत्ति स्वतः कांहीं वाईट नाहीं. तिच्यापासून उत्पन्न होणारा मद मात्र फार वाईट. इतर पुष्कळ गोष्टी सहज करतां येतील; परंतु संपत्तीचा मद जिरविणें हें कर्म फार कठिण आहे. या मदाला दडपून टाकलें तर मग काय पाहिजे? पण हें क्वचित च साधतें, म्हणून अल्पसंतोषीपणा च बरा.

प्रकरण आठवें.

नेमस्तपणा.

ईश्वरदत्त बुद्धि व आरोग्य यांचा उपभोग घेण्यापलीकडे या मर्त्यलोकांत आपण सुखाच्या समीप पोहचूं शकत नाहीं. ज्याला हे प्रसाद मिळाले असतील, व ते शेवटपर्यंत टिकावे अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें विषयाच्या मोहाला टाळा दिला पाहिजे. त्याच्या आमिषापासून दूर राहिलें पाहिजे. जेव्हां तो (विषय) आपले स्वादिष्ट पदार्थ समोर मांडील व आनंदी आणि सुखी होण्याबद्दल प्रोत्साहन देईल,

ती च वेळ धोक्याची आहे; त्या च वेळीं बुद्धीला हुषारीनें सावध ठेविलें पाहिजे. कारण, अशा वेळीं जर तिच्या— बुद्धीच्या—प्रतिस्पर्ध्याचें म्हणणें ऐकलें, तर फशीं पडावें लागून घात होईल. विषयानें आमिष म्हणून दाखविलेल्या आनंदाचें पर्यवसान दुःखांत होतें व त्याचे विलास आपणांस रोगी बनवून अखेर मृत्यु-मुखांत लोटतात.

विषयाच्या मेजवानीकडे बघा; त्याच्या निमंत्रित पाहुण्याकडे लक्ष्य द्या; त्याच्या आमिषांचा ज्यांना मोह पडला आहे त्यांच्याकडे नजर फेंका; म्हणजे ते रोडके, रोगी व निरुत्साही दिसून येतील. विलासाच्या थोडक्याशा घटकांनंतर त्यांना दुःख व विषाद यांची क्लेशकारक वर्षेंचीं वर्षें काढावीं लागतात. विषयानें त्यांच्या भुकेला भ्रष्ट व बेचव केल्यामुळें त्याच्या अत्युत्तम पदार्थांचें हि सेवन करण्याची त्यांना इच्छा होत नाहीं. कारण, त्यांच्यांत मग कुवत च नसते. ते आपल्या आराध्य देवतेला बळी पडतात. आणि यांत कांहीं च आश्चर्य नाहीं; कारण, हा अगदीं योग्य व स्वाभाविक परिणाम आहे. आपण दिलेल्या देणग्यांचा जे दुरुपयोग करितात, त्यांना शिक्षा लावण्यासाठीं,

ईश्वरानें वस्तूंच्या मागें असे परिणाम निसर्गतः च लावून दिलेले आहेत.

आतां त्या डौलदार गतीच्या व आनंदी मुद्रेच्या रमणीकडे नजर फेंका. तिच्या गालांवर गुलाबी छटा पसरलेली तुम्हांला दिसेल. प्रभातकालची मोहकता जणूं काय तिच्या उच्छ्वासाबरोबर बाहेर पडत आहे. निर्मल व विनययुक्त आनंद तिच्या डोळयांत चमकत आहे व प्रसन्न अन्तःकरणानें ती कोमल गीत गात आहे.

ती कोण, काय, हें तुम्हांला माहीत आहे काय? नसेल तर सांगतों. तिचें नांव "आरोग्यसुंदरी" हें असून ती नेमस्तदेवीच्या पोटीं उत्पन्न झालेली व्यायामाची मुलगी होय. तिचे भाऊ मोकळ्या हवेंत रहातात. ते शूर, निरलस व आनंदी असून त्यांच्यांत आपल्या बहिणीचें सर्व सौंदर्य व गुण वास करितात. त्यांचे स्नायु जोमदार आहेत; त्यांच्या हाडांत शक्ति आहे; व साऱ्या दिवसभर मेहनत करण्यांत च त्यांना आनंद होतो. पित्यासाठीं केलेल्या उद्योगापासून त्यांना चांगली भूक लागते; व आईनें वाढलेल्या जेवणापासून त्यांना हुषारी वाटते. मनोविकारांशीं झुंजण्यांत त्यांना हर्ष वाटतो. दुर्व्यसनांचा पराजय करण्यांत च

त्यांना भूषण वाटतें. त्यांचे विलास मर्यादित असल्यामुळें ते दीर्घकालपर्यंत टिकतात. त्यांना विश्रांति जरी थोडी च मिळते, तरी पण ती अव्यंग व स्वस्थतेची असते. त्यांचें मन प्रशांत आहे, त्यांचें रक्त शुद्ध आहे, व वैद्याला तर त्यांच्या घराचा मार्ग हि माहीत नाहीं.

परंतु मानवी प्राणी सुरक्षित नसतो. त्याच्यावर रोज नवीं नवीं संकटें ओढवतात. बाहेरील या शत्रूंशिवाय आंतून हि त्याचा घात करण्यास एक फितूर नेहमीं तयार असतो. त्याचें आरोग्य, त्याचें सौंदर्य, त्याची शक्ति व निरलसता इत्यादि "विषयप्रीती-" च्या मनांत कामेच्छा उत्पन्न करतात. ती "विषयप्रीति" आपल्या लताकुंजांत उभी राहून आपलें मोहजाल पसरते व त्याचें मन आकर्षण करून घेते. तिचे अवयव मृदु व कोमल असून तिचा पेहेराव मनोहर असतो. ती त्याला बोलावते, आपल्या सकामदृष्टीनें त्याला भारून टाकते व भूल पाडणाऱ्या वाणीनें त्याला आपल्या जाळ्यांत अडकविण्याचा प्रयत्न करिते.

पण सावध असा; तिच्या मोहजालापासून दूर रहा. तिचें भुरळ पाडणारें भाषण ऐकू नका. जर का

एकदां तिच्याशीं तुमची दृष्टादृष्ट झाली, तिचें मोहक भाषण तुम्हीं श्रवण केलेंत, तिच्या बाहुपाशांत तुम्ही अडकलांत, तर ती तुम्हांस आपले कायमचे गुलाम खास करील. तुम्हांला लाज वाटेल, अनेक रोग जडतील व आवश्यक वस्तु देखील मिळण्याची तुम्हांस मारामार पडेल. चिंता तुम्हांला झोंप घेऊं देणार नाहीं व पश्चात्ताप तुम्हांस जाळून भस्म करील. विषयसुखांत लोळून निःसत्व झाल्यामुळें, चैनबाजींत गर्क झाल्यामुळें, व आळसानें मऊपणा आल्यामुळें शक्ति तुमच्या गात्रांना सोडून जाईल; तुमचें आरोग्य नाहींसें होईल; तुमचें आयुष्य क्षीण व गर्हणीय होईल; तुम्हांला अनेक दुःखें होतील—क्लेश होतील; तथापि तुमची कोणाला दया येणार नाहीं. तेव्हां हे सगळे भोग भोगण्यापेक्षां प्रथमपासून च व्यवस्थेनें वागलेलें बरें नव्हे काय? आमिषांचा प्रतिकार करणें कठिण खरें; तथापि दृढनिश्चयाला अशक्य असें कांहीं च नाहीं. कोणती हि गोष्ट पहिल्यांदा जितकी अवघड वाटते, तितकी दुसऱ्या खेपेस करितांना जड जात नाहीं, हें लक्षांत ठेवून त्याचा अनुभव घेऊन पहा.

खण्ड दुसरा.

मनोधर्म.

प्रकरण पहिलें.

आशा आणि भय.

आशा ही कमलकुड्मलापेक्षां हि मधुर असून मनाला अत्यंत उल्हास देणारी आहे; परंतु भयाची नुसती कल्पना देखील भयप्रद असते. तथापि आशेला भुलून व भयाला भिऊन योग्य तें करण्यास माघार घेऊं नये, म्हणजे सर्व प्रसंगांना समचित्तानें तोंड देतां येईल.

भल्यांना मृत्यूचें भय वाटत नाहीं; व जो कोणतें च वाईट कर्म करीत नाहीं त्याला कशाचें हि भय नाहीं. प्रत्येक कार्यांत योग्य विश्वासानें आपल्या प्रयत्नांना उत्तेजन द्यावें. जयाबद्दल विश्वास नसल्यास कार्यसिद्धि होणार नाहीं. लटकें भय दाखवून मनाला भिववूं नये. तसें च कल्पनाजन्य भ्रमामुळें त्याला कचरूं देऊं नये. भयापासून दुर्दैव ओढवतें; परंतु उमेद धरणें म्हणजे स्वतःला साह्य करणें होय. तात्पर्य, जय अथवा अप-

जय हा आपल्या च विश्वासावर व दृढनिश्चयावर अवलंबून असतो. भगवंतांनीं म्हटलें च आहे:—" आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः । "

जर एकादी गोष्ट अशक्य वाटली तर आपल्या आशाशून्यत्वामुळें च ती तशी वाटेल; पण चिकाटी धरली तर प्रत्येक संकटावर जय अवश्य मिळवितां येईल. तथापि वस्तुस्थितीकडे व आपल्या सामर्थ्याकडे दुर्लक्ष्य करितां कामा नये. पोकळ आशेनें मूर्खाला आनंद होतो; पण शहाणा तिच्या मागें कधीं हि लागत नाहीं.

मनांत कोणती हि इच्छा धरण्यापूर्वीं नीट विचार करावा, आणि आपल्या आशा–आपल्या उमेदी–शक्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊं देऊं नयेत; या योगानें आपल्या कार्यांत यश मिळून अंतःकरणाला कधीं हि निराशेची व्यथा होणार नाहीं. जें मिळण्यासारखें असेल त्याची च आशा बाळगावी–त्याची च इच्छा करावी–म्हणजे ती आशा सफल होते. एरवीं, दुर्लभ वस्तूच्या मागें लागून ती मिळाली नाहीं म्हणजे निराशेनें ऊर बडविण्यांत काय फायदा ?

प्रकरण दुसरें.

आनंद व दुःख.

मनाला क्षुब्ध करण्याइतका आपल्या आनंदाचा अतिरेक होऊं देऊं नये, अगर अंतःकरणाला दडपून टाकण्याइतका दुःखाचा हि भर होऊं देऊं नये. या जगांत पराकाष्ठेचें सुख अगर परमावधीचें दुःख कोठें च नाहीं. नेहमीं च सारखे दिवस नसतात. जशी दिवसामागून रात्र व रात्रीमागून पुन्हां दिवस, तसें च सुखामागून दुःख व दुःखांतीं सुख हें आहे; आणि म्हणून च कविकुलगुरु म्हणतातः—" कस्यैकांतं सुखमुपगतं दुःखमेकांततो वा । नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण."

तो आनंदाश्रम बघा! बाहेरून रंग दिल्यामुळें तो कसा सुरेख दिसत आहे. त्यांतून निघणाऱ्या आनंदाच्या किलकिलाटावरून तो आपणांस तेव्हां च ओळखतां येईल. घरधनीण गात व हंसत दारांत उभी असून, येणाऱ्याजाणाऱ्यांना संसारसुखाचा आस्वाद अन्यत्र मिळणार नाहीं, असें सांगून आंत येण्याविषयीं आमंत्रण करीत आहे.

परंतु तिच्या उंबऱ्यांत पाऊल ठेवूं नका; व ज्यांचें तिच्या घरीं येणेंजाणें आहे, त्यांच्याशीं मुळीं च संबध ठेवूं नका. ते आपल्याला आनंदी म्हणवितात; ते हंसतात, खिदळतात, चैन करतात; परंतु त्यांचीं सर्व कृत्यें वेडेपणाचीं असतात. त्यांच्या अंगांत खोडसाळपणा सदैव भरलेला असतो; भय त्यांना चोहोंकडून वेढून टाकतें; व विनाशाची गर्ता त्यांच्या पायाशीं च 'आ' पसरून बसलेली असते.

आतां दुसरीकडे नजर फेंका; आणि वृक्षांनीं झांकलेल्या व मनुष्यांच्या दृष्टीपासून लपून असलेल्या दरींतील तें दुःखाचें वसतिस्थान पहा. त्या घराच्या मालकिणीकडे बघा. उसाशांनीं तिचें ऊर कसें उडत आहे व ती कसा आक्रोश करीत आहे तें पहा. मानवी दुःखांचा विचार करण्यांत च तिला आनंद वाटतो. जीवितांतील साधारण योगायोगांकडे बघून च ती रडते, मानवी दौर्बल्य व दुष्टपणा हे च तिच्या चर्चेचे विषय असतात. सर्व संसार तिला पापमय वाटतो. ती जें जें कांहीं बघते, तें सर्व आपल्यासारखें च उदास आहे असें तिला वाटतें, आणि या कुरकुरीमुळें तिचें वसतिस्थान नेहमीं उदास भासतें; म्हणून तिच्या आश्रमाजवळ

जाऊं नका; कारण, तेथील हवा सांसर्गिक आहे. ती जीवनवाटिकेला सुशोभित करणाऱ्या फळांचा नाश करील व फुलांला सुकवून टाकील.

पूर्वीं सांगितलेल्या आनंदाश्रमाला टाळा देण्यांत या उदास वसतिस्थानाकडे न जाण्याची खबरदारी ठेवा; आणि त्यामधला मार्ग काळजीपूर्वक आक्रमण करा. हा मार्ग तुम्हांला सावकाश उतरणीनें शांतिदेवीच्या कुंजांत नेऊन सोडील. तेथें शांति राहते, सुरक्षितता व समाधान हीं हि तिच्यापाशीं च राहतात. ती उल्हास-वृत्तीची आहे, परंतु विलासी नाहीं; गंभीर आहे, पण खोल मनाची नाहीं. ती या जीवितांतील सुखदुःखा-कडे समदृष्टीनें व धिम्मेपणानें पाहते.

एखाद्या उंच पर्वतावर चढलें म्हणजे आसपासचा देखावा कित्येक मैलपर्यंत जसा स्पष्टपणें दिसतो, तसें च शांतिदेवीच्या या कुंजांतून हि तुम्हांला, जे विलासी स्वभावामुळें चैनी व रंगेल सोबत्यांबरोबर फिरत असतात, किंवा औदासिन्याच्या व निरुत्साहाच्या तावडींत सांपडून मानवी जीवितांतील दुःखांबद्दल व संकटांबद्दल साऱ्या जन्मभर कुरकुरत असतात त्यांचा मूर्खपणा व दुःख स्पष्ट दिसून येईल.

प्रकरण तिसरें.

क्रोध.

ज्याप्रमाणें वावटळ आपल्या वेगानें मोठमोठालीं झाडें उलथून पाडते व निसर्गदेवतेस विद्रूप करून टाकते, किंवा भूकंप आपल्या क्षोभानें शहरेंचीं शहरें जमीनदोस्त करतो, त्याप्रमाणें रागावलेल्या मनुष्याचा क्रोध आपल्या आसमंतात् विध्वंस करितो. भय व नाश क्रोधी मनुष्यापाशीं हात जोडून उभे असतात. म्हणून आपल्या दौर्बल्याचा विचार करावा, आपल्या कुंवतेचा विसर पडूं देऊं नये, व दुसऱ्यांना त्यांच्या चुकीबद्दल नेहमीं क्षमा करावी.

क्रोधाला जवळ येऊं देऊं नये. त्याला जवळ येऊं देणें म्हणजे आपल्याला इजा करणाऱ्या किंवा आपल्या मित्राचा प्राण घेणाऱ्या तरवारीला पाणी देण्यासारखें आहे. क्रोध आणण्यासारख्या–चीड वाटण्यासारख्या–लहानसहान गोष्टी जर आपण सहन केल्या, तर लोक आपल्याला शहाणे म्हणतील, व जर त्यांना आपल्या स्मरणांतून घालवून लावल्या तर आपलें मन आपल्याला खाणार नाहीं.

क्रोधी मनुष्याची बुद्धि भ्रष्ट होते हें आपण बघत नाहीं काय? जोंपर्यंत आपण स्वतः चांगले शुद्धीवर आहोंत तोंपर्यंत दुसऱ्याच्या क्रोधाकडे पाहून धडा शिकावा. मनोविकारांच्या अधीन होऊन कोणतें हि काम करूं नये. भयंकर वादळ होत असतांना आपली नाव समुद्रांत काय म्हणून ढकलावी?

जर राग आवरणें कठिण वाटत असेल, तर तो येऊं न देणें हा च शहाणपणाचा मार्ग आहे; म्हणून राग आणणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला टाळा द्यावा. उर्मट भाषणानें मूर्ख मनुष्य चिडून रागावतो; परंतु शहाणा नुसतें हंसून त्याचा तिरस्कार मात्र करतो.

सूडाला आपल्या हृदयांत स्थान देऊं नये; कारण, तो अंतःकरणाला पीडा देऊन त्यांतील उत्तम आकांक्षांना विरूप करून टाकील. अपकाराची फेड अपकारानें च करण्याऐवजीं त्याबद्दल क्षमा करण्यास च नेहमीं तयार असलें पाहिजे.

"सोसुनि अपकारातें, उपकारातें चि साधु आठविती;
ते साहतां न सा विति, न साहतां वपु न होय आठ बिती."

याचा भाव तरी हा च. जो सूड घेण्याची वाट बघत असतो, तो आपला च घात करण्याची तजवीज करतो,

व स्वतःवर आपत्ति ओढून आणीत असतो हें लक्षांत ठेवावें.

क्रोध आलेल्या माणसाशीं तोंडाला तोंड देऊन कठोर भाषण करूं नये. यायोगें त्याचा क्रोध कधीं हि शांत होणार नाहीं. त्याच्याशीं जर मृदु भाषण केलें तर—पाण्यानें विस्तवाप्रमाणें—तो शांत होईल; आणि जर तो आपला शत्रु असला तर मित्र बनेल.

राग आणण्यास किती थोड्या गोष्टी योग्य आहेत याचा विचार केला म्हणजे मूर्खांशिवाय इतरांना राग कसा येतो याचें च आश्चर्य वाटेल. मूर्ख व अशक्त माणसांत क्रोध आरंभापासून च असतो. पण हें लक्षांत ठेवावें—ही खात्री असूं द्यावी—कीं, त्याचा अंत पश्चात्तापाशिवाय क्वचित च होतो. मूर्खपणाच्या मागें लाज व क्रोधाच्या मागें पश्चात्ताप हात जोडून उभा असतो.

क्रोधाच्या नांवानें प्रत्येकजण ओरडत आहे. मोठमोठ्या विद्वानांचें—साधुसंतांचें—हें च म्हणणें आहे कीं, क्रोध फार वाईट आहे, क्रोध चांडाल आहे, त्याचा स्पर्श झाल्याबरोबर सचैल स्नान करावें, क्रोधी माणसाचें मुखावलोकन हि करूं नये, क्रोधापासून फार अनर्थ होतात, तो स्वहिताच्या आड येतो.

" व्याघ्र, व्याल क्रूर, क्रूरतर क्रोध बोधरोधक हा,
क्रोधवशासि विलोकुनि बहु म्हणति स्वहिततत्वशोधक 'हा!' "

प्रकरण चवथें.

दया.

ज्याप्रमाणें वसंत या पृथ्वीवर फुलें व मंजिऱ्या पसरतो, व मेघ जलसिंचन करून तिला शस्यसंपूर्ण करतो, त्याचप्रमाणें दयेचें स्मित दुर्दैवी प्राण्यांवर कल्याणाचा वर्षाव करितें.

जो दुसऱ्यावर दया करतो तो स्वतःची शिफारस करतो; पण ज्याला दया नाहीं तो तिला पात्र नाहीं.

मेंढराचें बेंबावणें ऐकून ज्याप्रमाणें खाटकाला वाईट वाटत नाहीं, त्याचप्रमाणें परदुःखानें निर्दयाचें हृदय द्रवत नाहीं.

दयेचे अश्रू कमलावरील हिमकणांपेक्षां हि मोहक असतात; म्हणून दीनांच्या आर्त स्वराला बधिर होऊं नये, आणि निर्मल अंतःकरण असणाऱ्यांच्या आपत्ती पाहून आपलें मन कठोर करूं नये.

जेव्हां पोरकीं अर्भकें आपल्याजवळ धावून येतील, जेव्हां गतभर्तृकेचें धैर्य खचून ती साह्य मागेल, त्या

वेळीं त्यांचें दुःख लक्षांत घ्यावें, आणि जे निराश्रित असतील त्यांना मदत करावी. जेव्हां रस्त्यांतून भटकणारा, वस्त्रहीन व थंडीनें कांकडलेला निराधार प्राणी दिसेल, तेव्हां आपल्या औदार्याला जागृत ठेवून त्याच्यावर आपल्या दानरूपी पंखांची सावली केली असतां आत्म्याला खात्रीनें शांति मिळेल.

गरीब रोगी व्यथेमुळें आक्रोश करीत असतांना, अभागी प्राणी दुःखद कारागृहांत खितपत पडले असतांना, एखादा जरुख म्हातारा आपल्या दयेची अपेक्षा करीत असतांना, त्यांच्या गरजांची पर्वा न करितां, त्यांच्या दुःखाबद्दल कांहीं च न वाटतां आपल्याला फाजील ऐषआरामांत सुख वाटावें काय?

प्रकरण पांचवें.

वासना व प्रेम.

संभाळून असा! हे तरुणांनो! संभाळून असा, व विषयवासनेच्या आमिषांकडे ढुंकून देखील पाहूं नका. विश्वयोषितांच्या मोहाला भुलूं नका. वासनेच्या वेडेपणामुळें ती साध्य तर होणार नाहीं च; परंतु तिच्या क्षोभानें अंध झाल्यामुळें विनाशकाल मात्र आपल्या

जवळ कराल. म्हणून तिच्या मोहक मोहाच्या अधीन होऊन आपल्या आत्म्याचा बळी देऊं नका.

नाहीं तर, सुखसागरांत भर टाकणारा आरोग्याचा ओहोळ लवकर च आटून जाईल; आणि आनंदाचे झरे सुकून जातील. तारुण्याच्या ऐन भरांत च जरा आपलें साम्राज्य गाजवील, आणि जीविताच्या प्रभात-कालीं च आयुःसूर्य अस्तंगत होईल.

पण जेव्हां सद्गुण व विनय एखाद्या सुंदरीच्या सौंदर्याला वाढवितात, तेव्हां तिची प्रभा आकाशस्थ ताऱ्यांपेक्षां हि उज्वल असते. तिचें स्मित कमलसमुदायापेक्षां हि मोहक असतें; तिचें अंतःकरण निष्कपट, शुद्ध व सत्यपूर्ण असतें; तिच्या उच्छ्वासाचा सुगंध सर्वत्र दरवळत असतो; आणि मग तिनें पसरलेल्या मोहाला दूर सारणें केवळ अशक्य होय.

अशा प्रकारच्या मृदु प्रेमाला हृदयांत जागा द्यावयाला कांहीं हरकत नाहीं. कारण, त्या प्रेमाची पवित्र व उज्ज्वल ज्योति अंतःकरणाला उदार करून उत्तमोत्तम ठसे उमटावे म्हणून त्याला मृदु करून टाकील.

खण्ड तिसरा.

स्त्री.

ऐक, हे सुंदरि! शहाणपणाची गोष्ट लक्ष लावून ऐक, व सत्याचीं विधानें तुझ्या मनावर ठसूं देत; म्हणजे आपल्या मनःसौंदर्यानें तुझी शरीरकांति वृद्धिंगत होईल, आणि कमलाप्रमाणें असणारी तुझी मोहकता पहिला भर ओसरल्यावर हि तशी च कायम राहील.

तुझ्या तारुण्याच्या भरांत–तुझ्या जीविताच्या प्रभातकालीं–जेव्हां पुरुषांचे डोळे तुझ्याकडे आनंदानें वळतील व निसर्गदेवता या त्यांच्या दृष्टिक्षेपाचा अर्थ तुला सांगेल, त्या वेळीं त्यांचें मोह पाडणारें भाषण फार सावधगिरीनें श्रवण कर; आपलें मन नीट ताब्यांत ठेव, व त्यांच्या फुसलावणीच्या गोष्टी ऐकूं नकोस.

तूं पुरुषाची लायक व सज्ञान सोबतीण आहेस; केवळ त्याच्या मनोविकारांची बटीक नाहींस, हें लक्षांत ठेव. त्याच्या आचरट वासना तृप्त करणें ही च तुझ्या जीविताची इतिकर्तव्यता नसून, या आयुष्यांतील कष्टमय दशेंत त्याला साह्य करणें व त्याच्या श्रमाचा–

त्याच्या काळजीचा—मधुर भाषणानें मोबदला देणें हें च संसारांतील तुझें ठरींव कार्य आहे.

सुगृहिणीचें मन निष्कपट असून तिच्या गालांवर विनय शोभत असतो. ती नेहमीं उद्योगांत असते; कधीं हि रिकामी बसून रहात नाहीं, व रिकाम्या उठाठेवी करणें तिला आवडत नाहीं. तिचा पोषाख नीटनेटका असून ती मिताहारी, नम्र व सौम्य असते.

तिची जिह्वा रसाळ असून, तिच्या मुखावाटें मधुर व मर्यादेचे शब्द बाहेर पडतात. तिच्या उत्तरांत सत्यता व सात्विकपणा भरलेला असतो. शरण जाणें व आज्ञा पाळणें यांत च तिला आनंद वाटतो; आणि याबद्दल तिला शांति व सुख हें बक्षीस मिळतें.

विवेक तिच्या पुढें पुढें चालत असतो. समंजसपणा तिच्या अगदीं उजव्या हाताशीं च असतो; आणि तिच्या डोळ्यांत ममता व प्रीति असते. तिच्या सद्गुणांच्या दराऱ्यानें दुराचारी मनुष्याची जिह्वा तिच्यासमोर वळत नाहीं.

निंदक जेव्हां शेजाऱ्यापाजाऱ्यांचीं वर्मे काढून निंदा करण्यांत गुंतले असतात, तेव्हां तिचें औदार्य तिला बोलूं देत नाहीं. तिचें अंतःकरण चांगुलपणाचें

मंदीर असल्यानें, तिला दुसऱ्यांतील दुर्गुण दिसत च नाहींत.

ती जेथें राहते तेथें शांति वास करते. तिनें निश्चयानें केलेला हुकूम पाळला जातो. ती सकाळीं उठून आपल्या कामाचा विचार करते व प्रत्येकावर त्याच्या योग्यतेनुसार काम सोंपविते. आपल्या कुटुंबाची काळजी वाहण्यांत च तिला आनंद वाटतो. तिचा सर्व उद्योग त्या च दिशेनें होत असतो. तिच्या वाड्यांत सुशोभितपणा व काटकसर दिसून येते. तिच्या व्यवस्थेंतील तारतम्य तिच्या पतीचें भूषण होय. तिची स्तुति ऐकून त्याला आंतल्या आंत आनंद होतो.

आपल्या मुलांच्या मनांत ती शहाणपणाच्या गोष्टी ठसविते, व आपल्या स्वतःच्या चांगुलपणाच्या उदाहरणानें ती त्यांच्या वागणुकीला रीत लावते. त्यांच्या लहानपणीं तिच्या तोंडचा शब्द म्हणजे एक कायदा च असतो व तिच्या डोळ्याची नुसती खूण त्यांना आज्ञाधारकपणा शिकविते.

तिच्या तोंडांतून शब्द निघतांक्षणीं च तिचे सेवक तो झेलण्यास तत्पर असतात. काम सांगण्याचा अव-

काश, कीं तें पूर्ण झालें च म्हणून समजावें. कारण, ते प्रेमरज्जूंनीं बद्ध असतात. तिच्या दयाळूपणानें त्यांच्या तत्परतेला स्फुरण चढतें.

ऐश्वर्याच्या मदानें ती फुगत नाहीं. विपत्तीला ती धैर्यानें तोंड देते. पतीचें दुःख तिच्या साहाय्यानें हलकें होऊन त्याची तीव्रता कमी होते. तो आपलें हृदय तिच्या हृदयांत सांठवितो व असें केल्यानें त्याच्या मनाचें सांत्वन होतें.

अशा स्त्रीनें जर पुरुषाचें मन वश करून घेतलें, त्याला प्रीति करायला भाग पाडलें व त्याच्या हृदयावर स्वामित्व गाजविलें तर त्यांत आश्चर्य काय? अशा साध्वीला ज्यानें आपली भार्या केली आहे तो खरोखर सुखी होय. अशा साध्वीला जें 'आई!' म्हणून हांक मारील तें मूल धन्य होय.

खण्ड चवथा.

कौटुंबिक संबंध.

प्रकरण पहिलें.

पति.

हे तरुणा! ईश्वराचा कायदा पाळ, आणि विवाह कर. विवाह करून समाजांतील एक विश्वासू व्यक्ति होऊन रहा. पण परीक्षा करावयाची ती मात्र काळजीपूर्वक कर आणि ठरविण्यांत घाई करूं नकोस; कारण, तुझ्या इल्लींच्या पसंतीवर च तुझें भावी सुख अवलंबून राहील.

जर कोणी वधू आपला बहुतेक वेळ पोषाख व नट्टीपट्टी करण्यांत घालवीत असेल, जर ती आपल्या च सौंदर्या-वर भुलत असेल व आत्मश्लाघेंत च तिला आनंद वाटेल असेल, जर ती फार हंसणारी व मोठ्यानें बोलणारी असेल, जर तिचा पाय बापाच्या घरीं टिकून रहात नसेल, व तिची दृष्टि इतर पुरुषांच्या चेहऱ्यावर भटकत असेल, तर–जरी तिची कांति आकाशांतील नक्षत्रांसारखी तेजःपुंज असली तरी–तूं आपली दृष्टि

तिच्या मोहकपणावरून काढून घे; ती ज्या मार्गानें जाईल तिकडे आपल्या पायांना जाऊं देऊं नकोस व कल्पनाजन्य आमिषांना भुलून आपल्यास तिच्या जाळ्यांत अडकवून घेऊं नकोस.

पण जेव्हां अंतरंगांतील सावधपणा व वागणुकीचा सौम्यपणा तिच्यांत एकवटलेला दिसेल, जेव्हां तिचें मन सुशिक्षित असून तिचें रूप मनाला आवडणारें असेल, तेव्हां तिचें घर तें आपलें च घर समज. ती तुझी मैत्रीण होण्यास–जीवितयात्रेंतील तुझी सोबतीण होण्यास–तुझ्या हृदयाची स्वामिनी होण्यास–योग्य होय. तिला ईश्वरदत्त प्रसाद समजून तिचें पालन कर व आपल्या मायाळू वागणुकीनें तिच्या हृदयाचा प्रिय-कर होऊन रहा.

ती तुझ्या घराची मालकीण आहे, तेव्हां तिचा योग्य तो मानमरातब ठेवीत जा, म्हणजे तुझे सेवक तिच्या आज्ञेंत वागतील. तिच्या मनाच्या आकांक्षांना विनाकारण आळा घालूं नकोस; तुझ्या चिंतेची ती वांटेकरीण आहे, तेव्हां तिला आपल्या सुखाची हि वांटेकरीण कर.

तिचे अपराध सौम्यपणानें तिच्या पदरांत घाल. आपल्या आज्ञेचें पालन तिच्याकडून कठोर उपायांनीं करवून घेऊं नकोस. आपल्या गुह्य गोष्टी तिच्या हृदयांत सांठीव; तिची सल्लामसलत निष्कपट असल्यानें तिच्यापासून तुला धोका येणार नाहीं. तिच्या शेजेशीं इमानानें वाग; कारण, ती तुझ्या लेकरांची आई आहे.

जेव्हां ती आजारी होऊन तिला शारीरिक व्यथा होईल, तेव्हां आपल्या मायाळूपणानें तिचें दुःख हलकें कर. जर तूं एकदां च तिच्याकडे दयेनें व प्रेमानें पाहिलेंस तर तिचें दुःख ओसरेल, तिची व्यथा कमी होईल, आणि ती तुझी दृष्टि च दहा वैद्यांपेक्षां हि अधिक गुण करील.

स्त्रीजातीचा कोमलपणा लक्षांत आण; तिच्या शरीरयष्टीच्या नाजुकपणाचा विचार कर. ती अबला असल्यानें तिच्याशीं कठोरपणानें वागूं नकोस; परंतु आपल्या स्वतःतील व्यंगांची मात्र आठवण ठेव.

प्रकरण दुसरें.

पिता.

पिता या दृष्टीनें आपल्या कर्तव्याच्या महत्वाकडे लक्ष दे. तूं ज्या प्राण्यांना उत्पन्न केलेंस त्यांचें पोषण करणें--त्यांना सुशिक्षित करणें–हें तुझें कर्तव्यकर्म आहे. तुझें अपत्य पुढें तुझें कल्याण करील, तुझ्या नांवाला कलंक लावील अगर तें देखील तुझ्यावर च अवलंबून राहील.

तें लहान असतां च त्याला उपदेशाच्या गोष्टी सांगून, सत्याचे सिद्धांत त्याचे मनावर ठशीव. त्याच्या मनाच्या कलाकडे लक्ष असूं दे. लहानपणीं च त्याला सन्मार्गाला लाव; व त्यास जर एखादी वाईट संवय जडली असेल तर तिला दृढ होऊं न देण्याची खबरदारी ठेव. असें केल्यानें तें पर्वतावरील एखाद्या विस्तीर्ण वृक्षाप्रमाणें वाढून, त्याचें डोकें इतर सर्व वृक्षांपेक्षां उंचराहील.

दुष्ट पुत्र पित्याच्या निंदेस कारण होतो; पण सन्मार्गवर्ती पुत्र पित्याच्या म्हातारपणीं त्याला भूषणास्पद होतो. जमीन तुझी आहे, तिला पडित टाकूं नकोस; तूं जसें बीं पेरशील तसें च फळ तुला मिळेल.

चांगल्या फलाची इच्छा असेल तर त्याला आज्ञाधारकपणा शिकीव, म्हणजे तो तुझे गुण गाईल; त्याला विनयाची तालीम दे, म्हणजे त्याला लज्जा वाटणार नाहीं; त्याला कृतज्ञतेचें शिक्षण दे, म्हणजे त्यापासून त्याचा फायदा होईल; त्याला दानाची ओळख करून दे, म्हणजे तो लोकांचें प्रेम संपादील; त्याला नेमस्तपणा शिकीव, म्हणजे तो निरोगी होईल; त्याचा तारतम्याशीं परिचय करून दे, म्हणजे दैव त्याला अनुकूल होईल; त्याला न्यायाची गोडी दाखीव, म्हणजे सगळें जग त्याला मान देईल; त्याला निष्कपट बनीव, म्हणजे त्याचें मन त्याला खाणार नाहीं; त्याला उद्योगी कर, म्हणजे त्याचें ऐश्वर्य वाढेल; त्याला परहितबुद्धीचा पाठ दे, म्हणजे तो मनाचा मोठा होईल; त्याला शास्त्र शिकीव, म्हणजे त्याचें जीवित सफल होईल; त्याला धर्माची संथा दे, म्हणजे त्याला सुखानें मरण येईल; आणि हें इतकें सगळें करणें कांहीं फारसें अवघड नाहीं. स्वतःचा अशा प्रकारचा कित्ता जरी पुढें ठेवला तरी बराचसा कार्यभाग होईल.

प्रकरण तिसरें.

पुत्र.

ईश्वरानें उत्पन्न केलेल्या इतर प्राण्यांपासून मनुष्यानें शहाणपणा शिकावा, व त्यांचें आचरण पुढें ठेवून धडा घ्यावा. हे पुत्रा ! अंमळ अरण्यांत जा आणि तेथील कर्कोंच पक्ष्याकडे नीट लक्ष लावून बघ, व त्याचें आपल्या आत्म्याशीं संभाषण होऊं दे. तें पहा, तो आपल्या वृद्ध पित्याला कसा पंखावर घेऊन जात आहे आणि त्याला सुरक्षित ठिकाणीं ठेवून त्याच्या दाणापाण्याची कशी तजवीज करीत आहे! अज्ञान पक्ष्यांत जर आपल्या पितरांविषयीं इतका कृतज्ञपणा दिसून येतो, तर तो सज्ञान मनुष्यांत किती तरी पटीनें अधिक असायला हवा! विद्येचा उपदेश करितांना प्रथम "मातृदेवो भव। पितृदेवो भव।" असें च म्हटलें आहे.

अहाहा ! पितृभक्ति सूर्याला अर्पण केलेल्या इराण देशांतील धुपाप्रमाणें मधुर आहे. पश्चिमेकडील वाऱ्याच्या झुळकेबरोबर वाहत येणाऱ्या कमलांच्या सुगंधापेक्षां हि आनंददायक आहे.

म्हणून आपल्या पित्याविषयीं कृतज्ञ रहा; कारण, त्यानें तुला जन्म दिला आहे. आपल्या मातेचे उपकार स्मर; कारण, गर्भावस्थेंत तिनें तुझें ओझें वाहिलें आहे. तुझ्या भल्याविषयीं ते सदैव जागृत राहिले आहेत, तुझ्या सुखासाठीं त्यांनीं फार परिश्रम केले आहेत, म्हणून त्यांच्या वयाला मान दे; त्यांच्या पांढऱ्या केसांचा अवमान करूं नकोस.

आपली दुर्बळ बाल्यावस्था विसरूं नकोस, आपल्या तारुण्यांतील उर्मटपणाच्या गोष्टी स्मरणांतून घालवूं नकोस, व आपल्या वृद्ध पितरांचीं व्यंगें ध्यानांत घेऊं नकोस. त्यांच्या वृद्धापकाळीं त्यांचें पोषण कर, त्यांना सर्वप्रकारें साह्य कर.

यायोगानें त्यांचा अंत सुखानें होईल, आणि तुझीं अपत्यें हा तुझा सन्मान्य कित्ता पुढें ठेवून तुझ्या पुत्रधर्माची आपल्या पितृभक्तीनें फेड करतील. दुसऱ्यानें आपणाशीं जसें वागावें अशी आपली इच्छा असेल, तसें च आपण दुसऱ्याशीं वागलें पाहिजे.

प्रकरण चवथें.

सहोदर.

हे भावंडांनों ! तुम्हीं एका बापाचीं लेंकरें आहांत; त्यानें काळजीपूर्वक तुमचें संगोपन केलें आहे, आणि एका च आईच्या दुधापासून तुमचें पोषण झालें आहे.

आपल्या पित्याच्या घरांत शांति नांदावी म्हणून, प्रेमरज्जूंनीं तुम्हीं एकमेकांशीं बद्ध व्हा; आणि जेव्हां तुम्ही संसारांत वेगळे व्हाल, तेव्हां तुम्ही आपल्या प्रेमाच्या व ऐक्याच्या बंधनांना विसरूं नका. स्वकीयांना दूर लोटून तिऱ्हाइतांना जवळ करूं नका.

जर तुमचा बंधु अडचणींत असेल तर त्याला साह्य करा; जर तुमची बहीण संकटांत असेल तर तिचा त्याग करूं नका. असें केल्यानें तुमच्या पितरांची संपत्ति त्यांच्या सर्व वंशजांच्या साह्याला कारणीभूत होईल, आणि त्यांच्या आस्थेची परंपरा तुमच्या परस्पर प्रेमांत दिसून येईल.

खण्ड पांचवा.

ईश्वरी नेमानेम

अथवा

मनुष्यांतील दैवोपगत अंतर.

प्रकरण पहिलें.

शहाणा व मूर्ख.

भाऊबंदकी करून जगाच्या उत्पत्तीपासून आजपावेतों कोणाचें भलें झालें आहे?

बुद्धि ही ईश्वरी देणगी आहे, व ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप ती प्रत्येकास मिळत असते. ज्याला ईश्वरानें शहाणपण दिलें असेल, ज्याच्या हृदयांत त्यानें ज्ञानाचा प्रकाश पाडला असेल, त्यानें आपल्या शहाणपणाचा मूर्खाला उपदेश करावा, व स्वतःच्या उन्नतीसाठीं आपलें ज्ञान अज्ञाला सांगावें.

खऱ्या ज्ञान्याला अज्ञान्यापेक्षां आढ्यता कमी असते. शहाण्याला वारंवार शंका उत्पन्न होत असते व तदनुसार तो आपले बेत बदलीत असतो. मूर्ख

मनुष्य हट्टी असल्यामुळें त्याला कसली च शंका येत नाहीं, आणि स्वतःच्या अज्ञानाखेरीज त्याला इतर सर्व गोष्टींचें ज्ञान असतें.

पोकळ डौल—शुष्क आढ्यता—निंद्य होय. वाचाळता मूर्खपणाचें लक्षण आहे; तथापि मूर्खाचा उद्धटपणा शांततेनें सहन करणें व त्याच्या असमंजसपणाची कींव करणें हा शहाणपणाचा च एक भाग आहे.

स्वतःच्या मिजाशीनें फुगून जाऊं नये, अगर आपल्या श्रेष्ठ बुद्धीची घमेंड बाळगूं नये. कारण, खरें मानवी ज्ञान हें देखील केवळ अज्ञान व मौर्ख्य होय.

शहाण्याला आपला उणेपणा ठाऊक असल्यानें तो नम्र असतो, आणि स्वतःच्या पसंतीस उतरावें म्हणून तो फार श्रम करीत असतो. परंतु जो मूर्ख आहे तो आपल्या उथळ मनःप्रवाहाच्या तळाशीं असलेल्या गारगोट्यांकडे च बघून संतोष मानतो. तो त्यांना बाहेर काढून मोतीं म्हणून दाखवितो, आणि आपल्या बांधवांच्या स्तुतीनें त्याला समाधान होतें. निरुपयोगी गोष्टी संपादन केल्याबद्दल तो बढाई मारतो. परंतु आपल्या मूर्खपणाबद्दल कोठें लाज वाटायला पाहिजे हें देखील त्याला कळत नाहीं; आणि त्याच्या या व्यर्थ

श्रमाबद्दल त्याला काय बक्षीस मिळतें म्हणाल, तर निंदा व निराशा !

परंतु शहाणा मनुष्य आपल्या मनाला ज्ञानानें सुसंस्कृत करतो; कलाकौशल्याची उन्नति करण्यांत, त्याला उत्तेजन देण्यांत त्याला फार आनंद होतो; आणि समाजास त्याचा उपयोग झाल्यानें त्याला मान मिळतो. सद्गुणाची जोड म्हणजे च श्रेष्ठ ज्ञान असें त्याला वाटतें, आणि जन्मभर तो सौख्यशास्त्राचें च अध्ययन करीत असतो, जगाचें कल्याण कशानें होईल याचा च तो नेहमीं विचार करीत असतो.

प्रकरण दुसरें.

श्रीमंत व दरिद्री.

ज्याला ईश्वरानें संपत्ति दिली आहे व तिचा योग्य उपयोग करण्याची बुद्धि दिली आहे, त्याला च त्याचा विशेष लाडका म्हटलें पाहिजे.

तो आपली संपत्ति पाहून आनंद मानतो; कारण, तिच्याचमुळें त्याला सत्कृत्यें करायला सांपडतात. तो पीडितांचें संरक्षण करतो व बलवंतांस बलहीनांवर

जुलुम करूं देत नाहीं. दयेला जे पात्र असतील त्यांचा शोध करून, त्यांच्या गरजांची तो चौकशी करतो व दिमाख न दाखवितां–टिमकी न वाजवितां–शहाणपणानें त्यांना साहाय्य करतो. तो प्रामाणिक माणसांना बक्षिस देतो, गुणी जनांना उत्तेजन देतो, व प्रत्येक उपयुक्त कल्पनेची उदारपणानें उन्नति करतो.

अशा व यासारख्या दुसऱ्या उद्योगांनीं त्याचा देश धनसंपन्न होऊन मजुरांना मजुरी मिळते. तो नव्या नव्या क्लृप्त्या काढतो आणि त्यामुळें कलांची वृद्धि होते. आपल्या भोजनांतील फाजील पदार्थ आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचे आहेत असें समजून तो ते त्यांना देतो.

ऐश्वर्यामुळें त्याच्या मनाचें औदार्य कमी होत नाहीं, म्हणून च तो आपल्या संपत्तीचा आनंद मानतो; आणि हा त्याचा आनंद केवळ निर्दोष होय.

परंतु जो अलोट संपत्तीचा संग्रह करून ती नुसती जवळ बाळगण्यांत च आनंद मानतो त्याला धिक्कार असो! जो गोरगरीबांच्या श्रमाचा–कष्टाचा–विचार न करतां त्यांना पिळून काढतो, त्याला शतशः धिक्कार असो!!

जोरजबरीनें आपली भरभराट करण्यांत त्याला किंचित् देखील खेद होत नाहीं. आपल्या बांधवांचा, आप्तेष्टांचा समूळ नाश झाला तरी त्याला त्याचें कांहीं च वाटत नाहीं; अनाथांचे अश्रू पाहून त्याला वाईट वाटत नाहीं; गतभर्तृकेचा आक्रोश ऐकून हि त्याच्या मनाला द्रव येत नाहीं. धनलोभानें त्याचें हृदय कठोर होतें आणि म्हणून परदुःख—दुसऱ्याची पीडा—पाहून त्याच्यावर कांहीं च परिणाम होत नाहीं.

परंतु या पापाचें पिशाच्च हात धुऊन त्याच्या पाठीस लागलेलें असतें; तें त्याला कधीं च चैन पडूं देत नाहीं. तसें च दुसऱ्यावर आणलेल्या संकटाबद्दल मानसिक चिंता व परापहाराचें दुर्व्यसन त्याचा चांगला सूड घेतें.

असल्या मनुष्याच्या अंतःकरणाला होणाऱ्या डांचणीपुढें दारिद्र्यदुःख कांहीं च नव्हे.

गरीबानें समाधान—नव्हे आनंद—मानावा; कारण, त्याला अनेक कारणें आहेत.

त्याच्याभोंवतीं खुशामत्यांची व खादाड भोजनभाऊंची गर्दी नसल्यानें त्याला आपली मीठभाकरी सुखसंतोषानें खातां येते. चाकरानोकरांच्या गर्दीनें त्याचा घोंटाळा उडत नाहीं; अगर याचना

करून त्याला कोणी त्रास हि देत नाहीं. श्रीमंतांचें मिष्टान्न व फाजील पदार्थ न मिळाल्यामुळें त्यांना होणाऱ्या रोगांपासून हि तो बचावतो. तो जी मीठभाकरी खातो ती च त्याला गोड लागते. नुसत्या पाण्यानें च त्याची तहान भागते. तें साधें च पाणी त्याला श्रीमंतांच्या अत्युत्तम पेयांपेक्षां देखील मधुर वाटतें. श्रमामुळें–उदरनिर्वाहासाठीं कराव्या लागणाऱ्या कष्टामुळें–त्याचें आरोग्य कायम राहून श्रीमंतांना पराच्या गाद्यांवर हि जिची कधीं ओळख होत नसेल, अशा प्रकारची विश्रांति त्याला मिळते. संपत्तीच्या लाभापेक्षां तृप्तीमुळें वाटणारी शांतता च त्याला अधिक सुखी करते.

एवढ्याकरतां धनवानानें आपल्या संपत्तीनें फुगून जाऊं नये, अगर गरिबानें हि आपल्या दारिद्र्यामुळें निराश होऊं नये; कारण, ईश्वराची दूरदृष्टि त्या दोघांना हि सुख देते.

प्रकरण तिसरें.

स्वामी व सेवक.

परवशतेबद्दल काय म्हणून कुरकूर करावी ? तिला परमेश्वराची योजना कां समजूं नये ? तिच्यापासून

अनेक फायदे आहेत. तिच्यामुळें जीवितांतील चिंतांपासून दूर राहतां येतें.

स्वामिनिष्ठा ही च सेवकाची प्रतिष्ठा होय. आज्ञाधारकपणा हा च त्याचा सर्वश्रेष्ठ गुण होय. म्हणून धन्याचा वाक्प्रहार शांतपणें सहन करावा. जेव्हां तो कांहीं बोलेल तेव्हां उलटून उत्तर देऊं नये. स्वामीला या सहनशीलतेचा विसर पडणार नाहीं. त्याच्या भल्याबद्दल नेहमीं दक्ष असावें; त्याचें काम काळजीपूर्वक करावें, आणि त्याचा विश्वासघात करूं नये. सेवकाचा वेळ व सेवकाचे श्रम हे स्वामीचे च आहेत, म्हणून हे त्याचे त्यास देण्यांत चुकारपणा करूं नये; कारण, त्याबद्दल सेवकाला वेतन मिळतें.

आणि ज्याला स्वामिनिष्ठा हवी असेल त्यानें आपल्या सेवकांशीं न्यायानें वागावें, व ज्याला आज्ञाधारकपणा पाहिजे असेल, त्यानें आपले हुकूम वाजवी असल्याबद्दल खबरदारी घ्यावी. स्वामीप्रमाणें सेवक हि मनुष्य असल्यानें त्याच्यांत हि तेज असणार च. कडकपणा व उग्रता कदाचित् भय उत्पन्न करतील; परंतु प्रेम कधीं हि उत्पन्न करणार नाहींत. म्हणून सेवकाला कांहीं बोलणें झालें तरी तें मायाळूपणानें बोलावें आणि

अधिकाराची व विवेकाची ताटातूट करूं नये. यामुळें शिकवणीच्या गोष्टी–उपदेश–सेवकाच्या मनांत ठसून आपलें कर्तव्यकर्म करण्यांत त्याला आनंद वाटेल.

सेवकानें कृतज्ञतेमुळें स्वामीची प्रामाणिकपणें चाकरी केली व प्रेमामुळें आनंदानें आज्ञा पाळली, तर स्वामीनें हि सेवकाच्या या प्रामाणिकपणाबद्दल व या तत्परतेबद्दल योग्य बक्षीस देण्यास कधीं हि चुकूं नये.

प्रकरण चवथें.

शास्ता व शासित.

ज्याला मानवी प्राणी राज्यपदावर चढवितात व आपल्यावर राज्य करण्यास नेमतात, त्याला ईश्वराचा लाडका कां म्हणूं नये? अशा मनुष्यानें आपल्या पदाच्या ऐश्वर्यापेक्षां–श्रेष्ठत्वापेक्षां–लोक जो त्याच्यावर विश्वास ठेवतात त्याचें महत्त्व व उद्देश यांचा च अधिक विचार केला पाहिजे.

मौल्यवान वस्त्रें परिधान करून बसायला मिळणारें सिंहासन, मस्तकावर झळकणारा राजमुकुट, हातांत असलेला राजदंड, हीं सर्व राजचिन्हें स्वतःसाठीं मिळाली नसून, राज्याच्या भल्यासाठीं–प्रजेच्या हिता-

साठीं—आहेत, हें त्यानें पक्कें लक्षांत ठेवावें. प्रजेचें कल्याण हें च राजाचें यश होय; कारण, त्याचा अधिकार व राज्यपद हीं प्रजेच्या च मर्जीवर अवलंबून असतात.

जो ह्या गोष्टी जाणतो तो थोर मनाचा होय. आपल्या पदाच्या ऐश्वर्यानें त्याचें अंतःकरण उदार होतें. तो मोठमोठाल्या गोष्टींचा विचार करून आपल्या अधिकारानुरूप कृत्यांच्या शोधांत असतो. आपल्या प्रजेच्या सुखाची वृद्धि व्हावी, आपल्या राष्ट्राचें महत्त्व वाढून त्याचा गौरव व्हावा, म्हणून तो आपल्या राज्यांतील सुज्ञांना एकत्र करतो आणि मोकळ्या मनानें त्यांच्याशीं खलबत करून सर्वांची सल्लामसलत ऐकून घेतो. तारतम्यानें व दूरदृष्टीनें मनुष्यांची योग्यता जाणून प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुरूप अधिकार देतो. म्हणून त्याचे न्यायाधीश न्यायी असतात, त्याचे अमात्य शहाणे असतात आणि त्याच्या प्रीतींतले लोक त्याला फसवीत नाहींत.

कलाकुशलतेची वृद्धि व्हावी, शास्त्रांची उन्नति व्हावी, म्हणून तो उदार अंतःकरणानें त्यांना आश्रय देतो. त्याला शहाण्या व कल्पक लोकांच्या संगतींत आनंद वाटतो. त्यायोगें त्याच्या अंतःकरणांत ईर्षा

उत्पन्न होते आणि मग त्या सर्वांच्या श्रमानें त्याच्या राज्यवैभवाला श्रेष्ठत्व येतें.

व्यापारवृद्धि करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या मेहनतीचा, मेहनत करून जमीन सुपीक करणाऱ्या शेतकऱ्यांचा, कल्पकांच्या कल्पकतेचा, विद्वानांनीं केलेल्या सुधारणांचा प्रेमानें गौरव करून, उदारपणानें त्यांना बक्षीस देऊन तो त्यांचा उत्साह वाढवितो. नव्या वसाहती वसविल्यानें, मजबूत गलबतें व बंदरें बांधल्यानें, लोकांच्या सोईसाठीं कालवे व इतर जलप्रवाह खुले ठेवल्यानें जर त्याची प्रजा संपत्तींत लोळूं लागली, त्याच्या राज्याचें सामर्थ्य वाढून त्याचा जगभर दरारा बसला, तर त्यांत नवल तें काय ?

विचारी राजा आपले कायदे न्यायानें व शहाणपणानें करतो, त्यामुळें त्याच्या प्रजेला आपल्या श्रमाचें व उद्योगाचें फळ शांततेनें भोगावयास मिळून कायद्यानें वागण्यांत च तिला सुख वाटतें. त्यानें आपली न्यायाची इमारत दयेच्या पायावर उभारलेली असल्यामुळें अपराध्यांना शिक्षा करतांना तो मागेंपुढें न पाहतां कडक व निःपक्षपाती असतो. आपल्या प्रजेच्या तक्रारी ऐकण्यास त्याचे कान नेहमीं तयार असतात.

तिच्यावर जुलूम करून पीडा देणाऱ्यांचा हात धरून त्यांच्या जांचांतून तो तिची मुक्तता करण्यांत दक्ष असतो; व म्हणून च त्याची प्रजा पूज्यबुद्धीनें व प्रेमानें त्याला पित्याप्रमाणें मानून, तो आपल्या सर्व सुखांचा रक्षक आहे असें समजते. तिचें प्रेम त्याच्या हृदयांत प्रजावात्सल्य उत्पन्न करितें; आणि मग तिच्या सुखाची शाश्वती हा च त्याच्या काळजीचा विषय होऊन बसतो. प्रजेच्या अंतःकरणांत त्याच्याबद्दलच्या कुरकुरीला मुळीं च जागा नसल्यानें राज्यांत तर स्वस्थता असते च; परंतु शत्रूंच्या कारस्थानांचा हि उपयोग न होऊन तीं निष्फळ होतात.

त्याच्या प्रजावात्सल्यानें त्याची प्रजा त्याच्या सर्व कृत्यांत प्रामाणिकपणानें व नेटानें साह्य करण्यास तत्पर असते. ती एखाद्या तटबंदीप्रमाणें त्याचें संरक्षण करते; आणि यामुळें परचक्राचा तिच्यापुढें टिकाव न लागून तें वाऱ्यापुढील भुसाप्रमाणें उडून जातें.

अशा राजाच्या प्रजेचीं निवासस्थानें सुरक्षिततेमुळें व शांततेमुळें कल्याणप्रद होतात, आणि मग त्याच्या सिंहासनापुढें यश व सामर्थ्य नेहमीं हात जोडून सिद्ध असल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ?

खण्ड सहावा.

सामाजिक कर्तव्यें.

प्रकरण पहिलें.

परहितबुद्धि.

जो आपल्या व्यंगांचा विचार करील व आपल्या अपूर्णत्वाकडे दृष्टि देईल, तो, ज्यानें आपल्याला बुद्धीची देणगी दिली आहे, वाचाशक्ति दिली आहे, आणि परस्पर साह्य व उपकाराची देवघेव करण्यास समाजांत जागा दिली आहे, त्या परमेश्वराच्या उपकाराबद्दल–चांगुलपणाबद्दल–त्याचे आभार मानण्यास कधीं हि चुकणार नाहीं.

आपलें अन्न, आपलें वस्त्र, आपल्या राहण्याची सोय, भीतीपासून आपलें रक्षण, व या जीवितांतील सुखाचा व चैनीचा उपभोग, हें सर्व आपल्याला दुसऱ्यांच्या च साह्यानें मिळतें. आपल्याला समाजाशिवाय अन्यत्र या सर्वांचा उपभोग घेतां च आला नसता. म्हणून मानवी जातीनें–समाजानें–आपल्याशीं स्नेह-

भावानें वागावें, एतदर्थ त्याच्याशीं स्नेहानें वागणें हें आपलें कर्तव्य होय.

पुष्पांचा आमोद जसा निसर्गतःच पसरतो, त्याचप्रमाणें परोपकारी माणसाचें मन हि नेहमीं सत्कृत्यांना च प्रसवतें. तो आपल्या अंतःकरणाच्या सुखाचा व शांतीचा अनुभव घेत असतो व आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या उत्कर्षानें त्याला आनंद होतो. तो निंदा श्रवण करीत नाहीं. मानवी चुका व व्यंगें पाहून त्याच्या अंतःकरणाला व्यथा होते.

जगाचें कल्याण करावें ही च त्याची इच्छा असते व तो अशा प्रसंगांना शोधीत असतो. दुसऱ्यांचें भलें करण्यांत–त्यांचें दुःख निवारण करण्यांत–तो स्वतःला सुख व शांति प्राप्त करून घेतो. त्याचें मन मोठें असल्यानें, आपल्या स्वतःच्या इच्छांवरून तो दुसऱ्याच्या सुखाचा अंदाज बांधतो व उदार अंतःकरणानें त्याची (परसुखाची) वृद्धि करतो.

प्रकरण दुसरें.

न्याय–नीति.

समाजाची शांतता न्यायावर अवलंबून असते, आणि व्यक्तीचें सुख आपल्या मालमत्तेचा निर्भयपणानें

-शांततेनें-उपभोग घेतां येण्यावर अवलंबून असतें; म्हणून आपल्या वासनांना मर्यादित ठेवून नीतीनें -न्यायानें-त्यांचें नियमन करावें.

आपल्या शेजाऱ्याच्या मालमत्तेकडे पापबुद्धीनें बघूं नये व जें कांहीं म्हणून त्याच्या मालकीचें असेल त्याला स्पर्श देखील करूं नये. कोणत्या हि आमिषाच्या लालचीनें अगर चीड येण्यासारख्या गोष्टीनें संतापून जाऊन त्याचा जीव धोक्यांत घालूं नये. त्याच्या वर्तणुकीचा दुर्लौकिक करूं नये, अगर त्याच्या विरुद्ध खोटी साक्ष देऊं नये. त्याच्या सेवकाचें मन भ्रष्ट करून त्यास त्याला फसविण्यास अगर सोडून जाण्यास लावूं नये. त्याच्या प्राणेश्वरीला पापाचें आमिष दाखवूं नये; कारण, त्यापासून त्याच्या अंतःकरणाला कधीं हि न भरून येणारी जखम होईल, आणि त्याच्या जीविताला कोणत्या हि मोबदल्यानें फेड न होणारा असा अपाय होईल.

दुसऱ्यांशीं आपला व्यवहार निःपक्षपाताचा व न्यायाचा असावा, व त्यांनीं जशा तऱ्हेनें आपल्याशीं वागावें अशी आपली इच्छा असेल, तशा च तऱ्हेनें आपण हि त्यांच्याशीं वागावें.

विश्वासाचा गैरविश्वास करूं नये; आपल्यावर भरंवसा ठेवणाऱ्यांना फसवूं नये. कारण, देवाच्या दृष्टीनें चोरी करण्यापेक्षां विश्वासघात करण्यांत अधिक पाप आहे.

गरिबांवर जुलुम करूं नये, व मजुराला मजुरी देण्यांत फसवूं नये. नफ्यासाठीं विक्रय करते वेळीं सदसद्विवेकबुद्धीचें सांगणें ऐकून थोडक्यांत संतोष मानावा, आणि गिऱ्हाइकाच्या अज्ञपणाचा फायदा घेऊन आपली पिशवी भरूं नये.

आपलें कर्ज फेडावें; कारण, जो आपल्याला कर्ज देतो, तो तें आपल्या अब्रूवर–सचोटीवर–विश्वास ठेवून देतो; तेव्हां त्याचा पैसा परत न देणें हें नीचपणाचें व विश्वासघाताचें नव्हे काय?

सारांश, प्रत्येक मनुष्य समाजाचा आहे, म्हणून त्यानें आपल्या मनाचें संशोधन करावें, आपल्या स्मरणशक्तीचें साह्य घ्यावें, आणि आपल्या हातून या वरील गोष्टींपैकीं एखादीचें हि उल्लंघन झालेलें दिसल्यास त्याबद्दल लज्जित व दुःखित होऊन शक्त्यनुसार शक्य तितकी लवकर सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा.

प्रकरण तिसरें.

परोपकार.

ज्याच्या हृदयांत परोपकारबुद्धीचें बीजारोपण झालें आहे तो धन्य होय; कारण, परोपकारबुद्धीपासून धर्म आणि प्रेम उत्पन्न होतें.

परोपकारी मनुष्याच्या हृदयसरोवरांतून त्याच्या चांगुलपणाचा प्रवाह निघून तो जनहिताकरतां उचंबळतो. गरिबांना तो संकटसमयीं मदत करतो, व समाजाचा उत्कर्ष करण्यांत त्याला हर्ष वाटतो.

तो आपल्या शेजाऱ्याची निंदा करीत नाहीं. दुष्टबुद्धीच्या व मत्सराच्या गोष्टींवर तो विश्वास ठेवीत नाहीं, व कोणाची चहाडी करीत नाहीं. दुसऱ्यांचे अपराध विसरून त्यांबद्दल तो क्षमा करतो. सूडाला व द्वेषाला त्याच्या हृदयांत जागा च नसते. वाइटाची फेड तो वाइटानें करीत नाहीं; तर, शत्रूचा देखील तिरस्कार न करतां त्याच्या अपराधाची आपल्या स्नेहभावानें फेड करतो.

दुसऱ्याचें दुःख व काळजी पाहून परोपकारी माणसाला दयेचा पाझर फुटतो. त्यांच्या दुःखाचा

भार हलका करण्याचा तो प्रयत्न करतो व त्यापासून होणाऱ्या आनंदाला च तो आपलें बक्षीस असें समजतो.

तो क्रोध आलेल्या माणसाच्या त्वेषाचें शमन करून त्याचे तंटे मोडतो, व भांडण आणि वैरभाव यांपासून होणाऱ्या अपायांचें निवारण करतो. तो आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांत शांतता व परस्परस्नेहभाव यांची वृद्धि करतो, आणि यामुळें लोक त्याची स्तुति करून त्याला आशीर्वाद देतात.

प्रकरण चवथें.

कृतज्ञता.

ज्याप्रमाणें झाडांच्या फांद्यांतील रस, तो ज्या मूळांपासून निघून फांद्यांचें पोषण होतें, त्या च मूळांकडे पुन्हा परत जातो, अथवा नदीचें पाणी ज्या समुद्रापासून तें नदीस मिळालें, त्या च समुद्रास परत जाऊन मिळतें, त्याचप्रमाणें कृतज्ञ मनुष्याचें अंतःकरण आपल्या उपकारकर्त्याकडे ओढ घेतें. केलेले उपकार स्मरून त्यांची फेड करण्यांत च तो आनंद मानतो व आपल्या कल्याणकर्त्याचा मान ठेवून त्याच्यावर प्रेम करतो, आणि उपकारांची फेड करणें जर त्याच्या शक्तीबाहेर

असेल, तर तो आपल्या हृदयांत निदान त्यांची आठवण तरी जागृत ठेवून जीवांत जीव आहे तों त्यांना कधीं हि विसरत नाहीं.

कृतज्ञ पुरुष आकाशांतील मेघाप्रमाणें होय. तो पृथ्वीवर फळें, फुलें व वनस्पति यांचा पाऊस पाडतो; परंतु कृतघ्न मनुष्याचें अंतःकरण एखाद्या वालुकामय आवरण्यासारखें असतें. तेथें पडलेल्या पावसाला तें एखाद्या अधाशाप्रमाणें गट्ट करून त्यापासून कांहीं च कार्य करीत नाहीं.

आपल्या कल्याणकर्त्याचा द्रोह करूं नये, अगर त्यानें केलेले उपकार लपविण्याचा प्रयत्न करूं नये. कारण, उपकारबद्ध होण्यापेक्षां दुसऱ्यावर उपकार करणें हें जरी अधिक चांगलें असलें—औदार्याची जरी वाहवा झाली—तरी कृतज्ञतेचा नम्रपणा हृदयास द्रव आणतो आणि कृतज्ञ पुरुष ईश्वराचा, तसा च मनुष्याचा हि आवडता होतो.

गर्विष्ठानें दिलेल्या देणगीचा कधीं हि स्वीकार करूं नये व आपमतलबी आणि लोभी जनांवर मुळीं च उपकार करूं नये; कारण, गर्विष्ठाची बडेजावी लाज

आणील व लोभी–मतलबी–पुरुषाची वखवख कधीं च शांत होणार नाहीं.

प्रकरण पांचवें.

खरेपणा–निष्कपटता.

मनुष्यप्राणी खरेपणाच्या सौंदर्यावर भुलून जातो, व त्यांतील गुणांच्या शुद्धपणाला–पवित्रपणाला–भाळतो. पण खरेपणाशीं जर खरेपणानें वागलें नाहीं, आणि त्याच्या सौंदर्याला–पावित्र्याला–वरवर पाहून च जर त्याचा त्याग केला, तर त्यांत काय हांशील? आपल्या आचरणांत–सदाचरणांत–सुसंबद्धता व स्थैर्य ठेवलें तर च मानमरातब राहील.

खरा मनुष्य अंतःकरणापासून बोलतो; त्याच्या शब्दांत ढोंग व दगलबाजी मुळीं च नसते. खोट्या गोष्टींची त्याला लाज वाटून तो तोंड खालीं घालतो; परंतु खरें बोलतांना त्याची दृष्टि स्थिर व निश्चळ असते.

त्याची वागणूक औदार्याची असते; ढोंग्याचे डावपेंच नुसते बघण्याचा हि त्याला तिटकारा असतो. त्याच्या आचरणांत सुसंबद्धता असल्यानें तो कधीं च घोंटाळत नाहीं. खरेपणानें वागण्याइतकें त्याच्यांत

धैर्य असतें; पण खोटें बोलण्याचें त्याला भय वाटतें. कपटाचा व्यवहार करण्याइतका तो हलकट नसतो. त्याचे शब्द म्हणजे त्याच्या मनांतील विचारांचें प्रतिबिंब च होय; परंतु तो दूरवर दृष्टि ठेवून सावधगिरीनें बोलतो. तो सत्याचा च विचार करीत असतो व सारासारविचार करून मग बोलतो. स्नेहभावानें तो उपदेश करतो. मनाचा मोकळा असल्यानें टपका ठेवण्यास तो चुकत नाहीं, आणि तो जें कांहीं करण्याचें वचन देतो तें खात्रीनें करतो.

परंतु ढोंगी—खोट्या—माणसाचे विचार त्याच्या हृदयांत खोल दडलेले असतात. तो आपलें बोलणें खरें भासविण्याचा डौल आणतो, पण सारा वेळ दुसऱ्यांना ठकविण्याचा च प्रयत्न करीत असतो. तो दुःखांत हंसतो, आनंदांत रडतो, व त्याच्या वागणुकींत मुळीं च मेळ नसतो. अंधारांत—गुपचुप—कांहीं हि केलें तरी कोणास कळणार नाहीं, अशी त्याची कल्पना असते; पण त्याचे प्रमाद उघडकीस आले म्हणजे मग त्याचा खोटेपणा त्याच्या शिरावर येऊन त्याचें तोंड काळें होतें.

पण ढोंगी मनुष्य आपण लोकांना चांगलें दिसावें म्हणून लबाडी करण्यांत जे श्रम घेतो ते खरोखर च चांगलें होण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या श्रमापेक्षां अधिक असतात. तेव्हां, जर थोडक्या श्रमांत कपट-व्यवहार टाळतां येतो, तर मग स्वत:ला लोकांच्या उपहासाला व तिरस्काराला काय म्हणून पात्र करून घ्यावें बरें ?

खण्ड सातवा.

धर्म.

ईश्वर एक च आहे. तो जगाचा कर्ता, स्रष्टा व नियंता असून सर्वशक्तिमान्, सनातन, अतर्क्य आणि अगम्य असा आहे.

सूर्य जरी ईश्वराचें विशुद्धतम प्रतिबिंब आहे, तरी तो कांहीं ईश्वर नव्हे. तो आपल्या तेजानें जगाला प्रकाश देतो; त्याच्या उष्णतेनें पृथ्वीवरील वनस्पति व तृणशस्यादिक यांना चैतन्य–जीवन–मिळतें. तो ईश्वरनिर्मित असून त्याचा कार्यसाधक आहे, म्हणून नित्य त्याची प्रशंसा करावी.

जो परब्रह्म, अतिप्रदीप्तप्रज्ञा, मेधावी व दयाशील आहे तो–केवळ तो च–उपासना, आराधना, कृतज्ञता व स्तुति यांना पात्र होय.

त्यानें आपल्या हातानें आकाशरूपी वितान पसरलें आहे, नक्षत्रताराग्रहांची गति निश्चित केली आहे, सागराला अलंघ्य मर्यादा घालून दिली आहे, व पंचमहाभूतांना आपल्या ताब्यांत ठेविलें आहे.

तो पृथ्वीला कांपवितो, आणि त्यायोगें मोठालीं राष्ट्रें त्रस्त होतात. तो विद्युदास्त्र सोडतो, व त्यामुळें पापात्मे संभ्रांतचित्त होतात. केवळ आपल्या इच्छामात्रेंकरून तो अनंतकोटि ब्रह्मांडें उत्पन्न करतो व वाटेल तेव्हां त्यांचा लय करतो; म्हणून सर्वशक्तिमान् परमेश्वराच्या प्रभावापुढें नम्र व्हावें, त्याला राग आणूं नये; नाहीं तर त्यामुळें समूळ नाश होईल.

त्यानें उत्पन्न केलेल्या सर्व वस्तूंवर त्याची दृष्टि असून, आपला अधिकार तो अपार चातुर्यानें चालवितो. त्यानें जगाच्या शासनासाठीं कायदे केले असून निरनिराळ्या प्राण्यांसाठीं ते निरनिराळे आहेत; आणि निसर्गतः च प्रत्येक प्राणी त्याच्या मर्जीप्रमाणें वागतो.

त्याच्या मनांत अखिल ज्ञानाचें परिभ्रमण होत असतें; भविष्यकाळाचें रहस्य त्याला ठाऊक असतें; प्रत्येकाच्या मनांतील विचार त्याला स्पष्ट समजतात; कोणता हि विचार कायम होण्यापूर्वीं च त्याला तो कळत असतो.

त्याच्या भविष्यज्ञानांत संदिग्ध असें कांहीं च नाहीं; त्याच्या पूर्वज्ञानांत आकस्मिक असें मुळीं च नाहीं. त्याची प्रत्येक पद्धति अद्भुत आहे; त्याचें अनुशासन अचिन्त्य आहे, व त्याचें ज्ञान कल्पनातीत आहे. म्हणून त्याच्या ज्ञानावर श्रद्धा ठेवून सादर व्हावें; आणि त्याच्या अतिश्रेष्ठ शासनांना सविनय होऊन प्रणाम करावा.

परमेश्वर दयाळु व दानशील आहे; त्यानें दयेनें व वात्सल्यानें च हें जग निर्माण केलें आहे. त्याचें सौजन्य त्याच्या प्रत्येक कृतींत दिसून येतें. तो संपदेचा झरा व पूर्णत्वाचा मध्यबिंदु आहे.

त्याची सृष्टि च त्याचें सौजन्य प्रगट करते, व तिचे सुखास्वाद त्याचे गुणानुवाद गातात. तो तिला सौंदर्यानें विभूषित करतो, अन्न देऊन तिचें पोषण करतो व आनंदानें तिची परंपरा कायम राखतो. आपण जर

आकाशाकडे दृष्टि फिरविली, तर तेथें त्याचें तेज प्रकाशमान झालेलें दिसतें; जरी खालीं पृथ्वीकडे पाहिलें तरी त्याच्या सौजन्यानें ती ओथंबलेली दिसते; पर्वत व गुहा आनंदानें त्याचें स्तुतिगीत गात असतात आणि शेतें, नद्या व वनें त्याच्या या स्तुतिगीताचा प्रतिध्वनि करतात.

परंतु मानवी प्राणी ईश्वराचें विशिष्ट प्रसादभाजन आहे; त्यानें त्याला सर्व प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ स्थान दिलें आहे. मानवाला आपली पदवी कायम राखतां यावी म्हणून ईश्वरानें त्याला बुद्धि दिली आहे; त्याला आपल्या समाजाची उन्नति करतां यावी, म्हणून त्याला वाणी दिली आहे; आणि आपल्या अनुपम पूर्णत्वाचें मनन करतां यावें म्हणून त्यानें त्याला विचारशक्ति हि दिली आहे.

त्यानें मानवी जीवनक्रमाचे कायदे करण्यांत त्याच्या कर्तव्याचा त्याच्या प्रकृतीशीं असा कांहीं मेळ घातला आहे कीं, त्या नियमांचें, त्या कायद्यांचें पालन करण्यांत च त्याला सुखप्राप्ति व्हावी. म्हणून अनन्य भक्तीनें त्याच्या सौजन्याचें गीत गावें; एकाग्र चित्तानें त्याच्या अद्‌भुत प्रेमाचें सेवन करावें; व कृतज्ञतेनें आपलें

अंतःकरण परिपूर्ण असूं द्यावें. आपल्या वाणीनें त्याचें स्तवन करावें आणि आपल्या जीवनक्रमानें त्याच्या नियमांबद्दल प्रेम व्यक्त करावें.

परमेश्वर न्यायपरायण व सात्विक आहे, म्हणून मर्त्यांचा न्याय तो सत्यतेनें व निःपक्षपातानें करील. त्यानें आपले कायदे दयेनें व सौजन्यानें केले असतां त्यांचें उल्लंघन करणाऱ्यांना तो शासन करणार नाहीं काय? आपल्याला शिक्षा मिळण्यास विलंब लागतो, म्हणून ईश्वराचा हात निर्बल झाला आहे असें मात्र समजूं नये; अगर आपल्या कृत्यांकडे तो कानाडोळा करील अशी पोकळ व व्यर्थ आशा बाळगूं नये. त्याची दृष्टि प्रत्येकाच्या अंतःकरणाला भेदून जाते, आणि त्याचें त्याला कधीं च विस्मरण होत नाहीं. मर्त्यांची अगर त्यांच्या पदव्यांची तो मुळीं च पर्वा करीत नाहीं.

या जड बंधनांतून आत्मा झडझडून बाहेर निघाल्यावर उच्च आणि नीच, श्रीमान् आणि दरिद्री शहाणा व मूर्ख या सगळ्यांना स्वकर्मानुसार ईश्वरापासून योग्य फलप्राप्ति होईल. त्या वेळीं दुरात्मे थर-

थरां कांपून भयाकुल होतील; परंतु साधूंच्या मनाला त्याच्या निर्णयानें हर्ष होईल.

म्हणून, सदासर्वदा ईश्वराचें भय बाळगून त्यानें घालून दिलेल्या मार्गानें जावें; विवेकाच्या बोधाकडे लक्ष द्यावें; नेमस्तपणास आपला निग्रह करूं द्यावा; न्यायाला आपला मार्गदर्शक करावा; अंतःकरणांत औदार्याला जागा द्यावी आणि कृतज्ञतेनें ईश्वराची भक्ति करावी. या गोष्टी इहलोकांत सुख देऊन निदानीला स्वर्गलोकाची प्राप्ति करून देतील.

उत्तरार्ध.

खण्ड पहिला.

सामान्यतः मानवी प्राण्याविषयीं.

प्रकरण पहिलें.

मानवी शरीर व त्याची रचना.

मानवी प्राणी निर्बल व अपूर्ण असल्यामुळें त्यानें नेहमीं नम्र असायला हवें. तो ज्याला ज्ञान म्हणून समजतो व ज्याच्याबद्दल तो गर्व वाहतो, तें कांहीं वास्तविक खरें ज्ञान नव्हे; त्याला जर खरें–सत्य–ज्ञान काय आहे हें जाणण्याची इच्छा असेल आणि कर्तुमकर्तुं शक्ति प्रगट झालेली बघावयाची असेल तर प्रथम त्यानें आपल्या शरीरयष्टीचें अवलोकन केलें पाहिजे.

मानवी उत्पत्ति अद्भुत व भयजनक आहे, म्हणून आपण आपल्या स्रष्ट्याचा दरारा बाळगून त्याची

स्तुति केली पाहिजे व त्याच्यावर दृढ विश्वास ठेवून आनंदानें राहिलें पाहिजे.

ईश्वराच्या कृति आपणांस पाहतां याव्या, म्हणून च ना त्यानें आपल्याला इतर सर्व प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ पदावर चढविलें आहे? त्याचें कौतुक करतां यावें —त्यापासून शिक्षण घेतां यावें—म्हणून आपण त्या बघायला नको का? आणि त्यांची व त्यांच्या कर्त्याची आपल्याला योग्य प्रकारें आराधना करतां यावी, म्हणून त्यांचें कौतुक करणें अवश्य आहे ना?

आपल्यांत च—मानवी प्राण्यांत च—अंतरंगाची सावधगिरी काय म्हणून आहे? आपल्यांत ती कोठून व कशी आली? विचार करणें हा कांहीं मांसाचा धर्म नव्हे, अथवा तर्कवाद करणें हें कांहीं हाडांचें सामर्थ्य नव्हे! कीटक आपणांस खाऊन टाकतील हें सिंहास कळत नाहीं; तसें च बळी देण्यासाठीं च आपण पोसले जात आहोंत, याची गंधवार्ता देखील टोणग्यास नसते.

यावरून मानवी, प्राण्यांत इतर प्राण्यांपेक्षां एका नवीन शक्तीची भर पडली आहे, व तीमुळें च तो आहे तसा दिसतो. ती शक्ति, त्याच्या इंद्रियगोचर ज्ञानापेक्षां वरिष्ठ अशा कांहीं एका उदात्त कल्पनेचा त्याच्या

मृण्मय शरिराशीं परिचय करून देते. तेव्हां अशी ती शक्ति आहे तरी काय, हें बघूं या.

ती निघून गेल्यावर हि शरीर पूर्णावस्थेंत असतें, तेव्हां ती कांहीं शरीराचा भाग नव्हे हें खास. यावरून ती अदेही, अमूर्त व निराकार आहे; आणि म्हणून च ती सनातन, अनादि व शाश्वत आहे हें ठरतें. ती कर्म करण्यास स्वतंत्र आहे, तेव्हां आपल्या कर्माबद्दल ती जबाबदार आहे हें हि सिद्ध होतें.

गाढव आपल्या दांतांनीं गवत किंवा झाडपाला खाऊन टाकतें, म्हणून त्याला अन्नाची रुचि कळली असें होतें काय? मगराच्या हि पाठीचा कणा सरळ असला म्हणून त्याला मनुष्याप्रमाणें ताठ उभें राहतां येतें काय? ईश्वरानें जसें यांना बनविलें तसें च मनुष्याला हि बनविलें; पण मनुष्याला सर्वांच्या मागून उत्पन्न करून इतर सर्व प्राण्यांवर त्याला श्रेष्ठत्व व स्वामित्व दिलें, आणि शिवाय वेदाचें तत्त्व विदित करून दिलें. तेव्हां, मानवी प्राणी हा ईश्वराच्या सृष्टींतील एक अभिमानाचा पदार्थ आहे, असें कां समजूं नये? ईश्वराचा आणि सर्व दृश्य व स्पृश्य वस्तूंचा संयोग करणारा तो एक दुवा आहे.

म्हणून, ईश्वर आपल्यांत अंशतः राहतो, हें लक्षांत आणावें, आपली थोर पदवी ध्यानांत ठेवावी, आणि कोणतें हि वाईट अथवा अकुलीन असें कर्म करण्याइतका नीचपणा मनुष्यानें स्वीकारूं नये.

प्रकरण दुसरें.

इंद्रियांचा उपयोग.

आमच्या शरिराची योग्यता श्रेष्ठ आहे म्हणून फुशारकी मिरवूं नये, अगर मेंदूमुळें च आमचें इतर प्राण्यांवर वर्चस्व आहे अशी बढाई सांगूं नये; कारण, घराच्या भिंतीपेक्षां त्याच्या मालकाची च योग्यता अधिक असते.

बीं पेरण्यापूर्वीं च जमीन तयार केली पाहिजे; मडकीं घडण्यापूर्वीं च कुंभाराला भट्टी तयार करायला हवी.

ज्याप्रमाणें ईश्वर पंचमहाभूतांना आपल्या दाबांत ठेवून त्यांच्याकडून योग्य प्रकारें कामें घेतो, त्याचप्रमाणें आपल्या उन्मादाला आपल्या आत्म्याकडून दडपून टाकवून, आपल्या शरिराला योग्य मार्गाला लावविलें पाहिजे.

मानवी शरीर भूगोलाप्रमाणें असून, अस्थिरूपी खांबांनीं त्याला नेटानें सांवरून धरलें आहे; आणि आत्मा हा ह्या पृथ्वीचा राजा आहे. म्हणून, त्याच्या प्रजाजनांनीं-इंद्रियांनीं-त्याच्या विरुद्ध बंड केलेलें कधीं हि सहन करूं नये.

ज्याप्रमाणें समुद्रापासून झरे उत्पन्न होतात व त्यांचें पाणी नद्यांस मिळतें, आणि नद्यांतून तें परत समुद्रांत जातें, त्याचप्रमाणें मानवी चैतन्य त्याच्या हृदयापासून निघून बाहेरच्या अवयवांपर्यंत जातें, आणि पुन्हां स्वस्थानीं परत येतें. हीं दोघें हि आपला क्रम नेहमीं चालवितात. कारण, दोघें हि एका च ईश्वराचा कायदा पाळणारीं आहेत.

नाक हें सुवास घेण्याचें साधन आहे. जिभेला पक्वान्नांची रुचि कळते. परंतु हें लक्षांत ठेवावें कीं, कालांतरानें सुवासिक द्रव्यांचा वीट येतो, आणि पक्वान्नें बेचव लागूं लागतात.

आपले डोळे हे आपल्यावर पहारा करणारे पहारेकरी आहेत ना? तरी देखील किती तरी वेळां सत्य कोणतें व असत्य कोणतें याचा निर्णय करण्यास ते असमर्थ होतात!

म्हणून, मनाचा निग्रह करावा, बुद्धीला स्वहिता-विषयीं सावध राहण्यास शिकवावें. म्हणजे त्यांचे हे (नेत्रादि अवयव) मंत्री आपल्याला नेहमीं सत्याकडे च नेतील.

मानवी हात हा एक लोकोत्तर चमत्कार नाहीं काय? सर्व सृष्टींत त्याच्या बरोबरीचें असें दुसरें काय आहे? आपल्या बांधवांना याच्या साह्यानें मदत करतां यावी म्हणून च ना तो आपल्याला प्राप्त झाला आहे?

सर्व सजीव सृष्टींत मनुष्याला च काय म्हणून लज्जायुक्त बनविलें? त्याला लाज वाटली तर त्याच्या तोंडावर लोकांना ती स्पष्टपणें दिसते; म्हणून त्यानें लज्जास्पद असें कांहीं च करूं नये.

भय उत्पन्न झालें असतां—उद्वेग प्राप्त झाला असतां—आपल्या मुखावरची टवटवी कोठें नाहींशी होते? तेव्हां, पापकर्म करण्याचें टाळलें म्हणजे भीतीचें कारण च उरणार नाहीं, आणि उद्वेग हा पौरुषहीन आहे हें हि कळून येईल.

झोंपेंत दिसणाऱ्या आकृति मानवी प्राण्याशीं च बोलतात, म्हणून त्यांची अवहेलना करूं नये; कारण, स्वप्नें ईश्वरप्रेरित आहेत हें लक्षांत बाळगावें.

एकट्या मानवी प्राण्याच्या च वांट्याला वाचाशक्ति आली आहे; म्हणून, स्वतः त्यानें आपल्या या उज्ज्वल विशिष्टाधिकाराचें कौतुक करून, तो देणाऱ्याचें यथोचित मंगल स्तवन करावें, व आपल्या मुलांना शहाणपणा शिकवून त्यांना ईश्वरभक्तिपरायण करावें.

प्रकरण तिसरें.

मानवी आत्मा, त्याची उत्पत्ति व धर्म.

आपण आपल्या या जड शरिराकडे पाहिलें तर त्याचें आरोग्य, बल व समिति हे ईश्वरी प्रसाद आहेत असें वाटल्यावांचून रहात नाहीं. या सर्वांत आरोग्याला श्रेष्ठ स्थान दिलें पाहिजे. कारण, सत्याचा व आत्म्याचा जो संबंध तो च शरिराचा व आरोग्याचा असल्यामुळें, आरोग्याशिवाय शरिराचे व्यापार सुरळीत चालूं शकत नाहींत. "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्" याचें तात्पर्य तरी हें च.

मानवी ज्ञान फार करून अपूर्ण असल्यानें त्यास फार थोड्या गोष्टींबद्दल निश्चयानें सांगतां येतें, हें खरें; परंतु आपल्याला आत्मा आहे हें ज्ञान इतर सर्व ज्ञानांपेक्षां अधिक निश्चित--सर्व सत्यांपेक्षां अधिक स्पष्ट--

असें आहे. म्हणून त्याबद्दल कृतज्ञपणानें नम्र व्हावें; परंतु त्याला पूर्णपणें जाणण्याचा प्रयत्न करूं नये. कारण, तें अतर्क्य असल्यानें त्याची पूर्ण माहिती होणें संभवनीय नाहीं.

विचारशक्ति, बुद्धि, तर्कपद्धति किंवा मन:संकल्प यांपैकीं कोणी च आत्मा नाहीं. हे सर्व केवळ त्याचे अंश होत; परंतु मूलतत्व नव्हत.

आपली अवज्ञा होऊं नये, एतदर्थ त्याला स्वर्गाकडे नेण्याची खटपट करूं नये. वर चढून मग खालीं आदळण्यांत काय फायदा? आणि पशूप्रमाणें बुद्धिहीन होऊन त्यांच्या नीचावस्थेंत हि त्यास नेऊं नये. परंतु त्याच्या च साहाय्यानें त्याला शोधून काढावें. त्याच्या च गुणांवरून त्याची ओळख करून घ्यावी. डोक्यावरील केसांपेक्षां हि त्या गुणांची संख्या अधिक आहे. आकाशस्थ ताऱ्यांपेक्षां हि ते अधिक भरतील, आणि म्हणून च त्यांची पूर्ण माहिती करून घेणें दुरापास्त आहे.

एक च आत्मा सर्व लोकांत विभागश: वांटला आहे, असें आरबी लोक समजतात, व प्रत्येक मनुष्याला अनेक आत्मे असतात, असें मिसर देशांतील लोक

मानतात; परंतु आपल्या हृदयाप्रमाणें आपला आत्मा हि एक च आहे हें लक्षांत ठेवावें. सूर्य ओल्या मातीला घट्ट करीत नाहीं काय? तो मेणाला पातळ करीत नाहीं का? ज्याप्रमाणें एक च सूर्य हीं दोन्हीं कामें करतो, त्याचप्रमाणें एक च आत्मा दोन विरुद्ध गोष्टींचा निश्चय करूं शकतो.

ज्याप्रमाणें अभ्रपटल आलें असतां हि चंद्र आपला धर्म सोडीत नाहीं, त्याचप्रमाणें मूर्खाच्या हृदयांत हि आत्मा निर्दोष–पूर्ण–स्वरूपानें राहतो. तो अमर आहे; अविकार्य आहे; सर्व प्राण्यांत तो सारखा च आहे. आरोग्यानें त्याचें सौंदर्य वाढतें; व्यासंगानें तो तरतरीत होतो. जरी तो आपल्या पश्चात् वांचला तरी तो आपल्या पूर्वीं जन्मास आला होता असें समजूं नये. आपल्या च शरिराबरोबर तो घडला गेला आणि आपल्या च मांसापासून तो उत्पन्न झाला आहे.

आपण सर्वगुणसंपन्न असलों म्हणून न्यायानें, अगर दुर्गुणांचें आगर असलों म्हणून दयेनें, तो आपणांस मिळणार नाहीं. न्याय व दया आपल्यावर च अवलंबून असून, आपण च त्यांबद्दल जबाबदार आहोंत हें विसरूं नये. मृत्यूमुळें आपण कृतकर्मांतून

वांचू असें समजूं नये, अगर शीलभ्रष्ट झालों असतां हि आपली चौकशी होणार नाहीं असें मानूं नये. ईश्वराची सत्ता अमर्याद आहे; त्याची लीला अगाध आहे; त्याला अशक्य असें कांहीं च नाहीं.

कोंबड्यास रात्र किती झाली हें समजतें; पहाट होतां च तो मोठ्यानें आरवतो. कुत्रा आपल्या धन्याच्या पावलांचा आवाज़ ओळखतो. जखम झाली असतां ती बरी करणाऱ्या वनस्पतीकडे बोकड धाऊन जातो; तथापि यांना मृत्यु आला असतां यांचे आत्मे पंचत्वाप्रत जातात. केवळ मानवी आत्मा च मागें राहतो.

या पशुपक्ष्यांचीं इंद्रियें आपल्यापेक्षां तीक्ष्ण व तरतरीत आहेत म्हणून त्यांचा हेवा करूं नये. कारण, चांगल्या गोष्टी नुसत्या जवळ असण्यांत मोठेपणा नसून, त्यांचा कसा उपयोग करावा याचें ज्ञान असण्यांत च खरें महत्त्व आहे. जर आपले कान काळविटाप्रमाणें असते किंवा गरुडाप्रमाणें तीक्ष्ण व पाणीदार डोळे असते, जरी आपलें घ्राणेंद्रिय कुत्र्याप्रमाणें असतें अगर कासवाप्रमाणें आपले मनोधर्म असते, तरी पण बुद्धीवांचून या सगळ्यांचा आपल्याला कांहीं तरी उपयोग झाला असता काय? हे प्राणी इतरांप्रमाणें

मरत नाहींत काय? यांपैकीं एकास तरी आपल्यासारखें मिष्ट व समयोचित भाषण करतां येतें काय?

ज्यानें आपल्याला आत्मा दिला आहे त्याची तो प्रतिमा असल्यामुळें, त्याचा आपल्याला सर्व बाजूंनीं विचार करतां येणें शक्य नाहीं, किंवा त्याची यथोचित स्तुति करणें संभवनीय नाहीं. म्हणून, सदासर्वकाळ त्याच्या माहात्म्याची आठवण ठेवावी; त्यानें आपल्यासाठीं केवढें थोरलें बुद्धिवैभव ठेवलें आहे याचा विसर पडूं देऊं नये. ज्यापासून चांगलें होतें त्याचपासून वाईट हि होण्याचा संभव आहे, म्हणून त्याला सन्मार्गाला लावण्याची खबरदारी घ्यावी.

गर्दींत तो हारवेल असें समजूं नये, किंवा त्याला आपल्या हृदयकपाटांत अडकवून ठेवतां येईल अशी वेडगळ आशा धरूं नये. कारण, क्रिया—कर्म—करण्यांत च त्याला आनंद वाटतो, आणि त्यापासून त्याला परावृत्त करतां येणार नाहीं.

आत्म्याची गति अविरत आहे; त्याचे प्रयत्न विश्वविस्तृत आहेत; त्याचें चापल्य दडपून टाकण्यासारखें नाहीं. एखादी वस्तु जरी अगदीं पृथ्वीच्या टोंकाला असली तरी देखील तो ती प्राप्त करून घेईल; जरी

ती नक्षत्रमंडळापलिकडे असेल तरी सुद्धां तो तिला हुडकून काढील. नवी माहिती—चौकशी—करण्यांत च त्याला आनंद होतो. पाण्याच्या शोधार्थ ज्याप्रमाणें मनुष्य प्रखर वालुकामय प्रदेश ओलांडून जातो, त्याचप्रमाणें ज्ञानतृष्णेनें आत्म्याची अवस्था होते.

तो साहसी आहे, म्हणून त्याला जपलें पाहिजे; तो अनियंत्रित आहे, म्हणून त्याला दाबांत ठेविलें पाहिजे; तो स्वैर आहे, म्हणून त्याचें शासन केलें पाहिजे. तो पाण्यापेक्षां पातळ व मेणापेक्षां मृदु आहे. तो वायूपेक्षां हि चपळ आहे, म्हणून त्याचें सौकर्यानें नियमन कसें करतां येईल?

ज्याला विवेक नाहीं त्याचा आत्मा एखाद्या भित्र्या माणसाच्या हातांतील तरवारीप्रमाणें होय.

सत्य हें आत्म्याचें उद्देश्य होय. अनुभव व बुद्धि हीं तें सत्य शोधून काढण्याचीं साधनें होत; पण हीं साधनें अक्षम, अनिश्चित व भ्रामक नाहींत काय? मग त्याला तें सत्य कसें मिळवितां येईल?

बहुमत हें कांहीं सत्याचें प्रमाण नव्हे; कारण, सामान्यतः जनता अज्ञ असते. आत्मपरीक्षण, आपल्या

उत्पत्तिकर्त्याविषयींचें ज्ञान व त्याचा जो संस्कार केला पाहिजे त्याबद्दलची जाणीव, हीं च खरें ज्ञान मिळविण्याचीं साधनें होत.

प्रकरण चवथें.

मानवी जीवित व त्याचा उपयोग.

ज्याप्रमाणें प्रभातकाल भारद्वाजपक्ष्यास सुख देतो, अथवा धूसरवर्ण सायंकाळ घुबडास आनंद देतो, ज्याप्रमाणें मधानें मधमाशी वेडावून जाते, प्रेतें अगर मढीं पाहून गिधाडास आल्हाद होतो, तसें च जीवन हें मानवी अंतःकरणास प्रिय वाटतें. तें मानवी जीवन जरी उज्ज्वल असलें तरी डोळे दिपवीत नाहीं, किंवा निस्तेज असलें तरी निराश करीत नाहीं. जरी तें गोड असलें तरी त्याचा वीट येत नाहीं अगर नासून बिघडलें असलें तरी टाकवत नाहीं. असें जरी आहे, तरी त्याची खरी किंमत फार च थोड्यांस कळते.

जीविताची योग्य तितकी च किंमत केली म्हणजे आपण शहाणे झालों म्हणून समजावें. जीवितापेक्षां अधिक मौल्यवान् कांहीं च नाहीं असें मूर्खाप्रमाणें समजूं नये, किंवा शहाणपणाचें ढोंग माजविणाऱ्या-

प्रमाणें त्याला निंद्य हि मानूं नये. केवळ स्वार्थासाठीं च त्यावर आसक्त होऊं नये, तर त्यापासून होणाऱ्या दुसऱ्याच्या हिताकडे हि आपलें लक्ष असूं द्यावें.

सोनें देऊन हि तें आपणास विकत मिळणार नाहीं, किंवा हिऱ्याच्या खाणीच्या खाणी खर्ची घालून हि त्यांतील निघून गेलेले क्षण आपल्याला परत आणतां येणार नाहींत. यासाठीं प्रत्येक क्षणाचा सद्गुण संपादण्याकडे उपयोग केला पाहिजे.

जन्माला आलों नसतों तर फार बरें झालें असतें असें म्हणूं नये, किंवा जर जन्मलों च आहों, त्याअर्थी मृत्यु आला तर फार बरें होईल असें हि समजूं नये; अगर "मला जर उत्पन्न केलें नसतें तर काय बिघडलें असतें?" अशा प्रकारचा देवास दोष देण्याचें हि धाडस हि करूं नये. परोपकार जर आपल्या स्वाधीन आहे, तर मग "देवा! मला कशाला रे जन्मास घातलेंस?" असा प्रश्न करणाऱ्याच्या च शिरावर खापर फुटणार नाहीं काय?

पिठाच्या गोळीच्या आंत अणकुचीदार आंकडा आहे, असें जर माशास समजलें तर तो ती गिळील काय? आपल्यासमोर जाळें पसरलें आहे हें समजून हि

सिंह त्यांत कसा शिरेल? म्हणून जर शरिराबरोबर च आत्म्याचा नाश होत असला तर मनुष्याला जगावेसें वाटणार नाहीं, आणि दयाळू ईश्वरानें हि पण त्याला उत्पन्न केलें नसतें. यावरून शरिराच्या पश्चात् हि आपण राहूं याबद्दल खात्री बाळगावी.

ज्याप्रमाणें न कळतां पिंजऱ्यांत अडकविलेला पक्षी पिंजऱ्यावर आपलें शरीर आपटून घेऊन जिवाला त्रास करून घेत नाहीं, त्याचप्रमाणें आपण आहों त्या स्थितींतून निसटण्यास फुकट श्रम करूं नयेत; तर, ती आपणाला नेमून दिली आहे—ती नियत आहे—असें समजून तींत च संतोष मानावा.

जरी त्या स्थितींतील मार्ग अवघड आहेत, तरी ते दुःखद नाहींत. आपण त्या सर्वांना आपल्या सोयीचे करून घ्यावे. आणि जेथें यत्किंचित् हि हानीचा संशय येईल तेथें फार सावधगिरीनें वागावें.

गवताच्या चटईवर निजणाऱ्याला निर्भयपणें झोंप येते; परंतु गुलाबपुष्पांच्या शय्येवर निजणाऱ्यांना त्यांच्या कांटयांची खबरदारी घ्यावी लागते.

कष्टमय जीवितापेक्षां सुखाचा मृत्यु बरा; म्हणून इष्ट तोंपर्यंत च जगण्याची इच्छा करावी; शक्य तितकें

अधिक दिवस जगण्याचा प्रयत्न करूं नये; तर, जोंपर्यंत आपल्या मृत्यूपेक्षां आपल्या जीविताची च लोकांना अधिक किंमत वाटत आहे, तोंपर्यंत त्याचें रक्षण करणें आपलें कर्तव्यकर्म होय.

आपलें जीवन अल्प आहे असें मूढाप्रमाणें समजूं नये; कारण, आयुष्याचे दिवस जों जों कमी होत आहेत तों तों आपल्या काळज्या हि कमी होत आहेत, हें ध्यानांत धरावें.

आयुष्यांतील निरुपयोगी भाग जर काढून टाकला तर मग शिल्लक काय राहिलें ? बाल्यावस्था, वृद्धापकाळ, झोंपेचा व रिकामटेकडा वेळ आणि आजारीपणांतील दिवस, हें सगळें जर आयुष्याच्या पूर्णांकांतून काढून टाकलें, तर बाकी किती तरी थोडी राहते!

मानवी जीवन हा ईश्वरी प्रसाद होय. तें जरी अल्प आहे, तरी त्यापासून सुख च होईल. दीर्घायुष्यापासून आपलें कोणतें कार्य शेवटास जातें? दीर्घकाल वांचून अधिक दुर्गुणांची जोड करून घ्यावीशी आपल्याला वाटेल काय? ज्यानें आपलें आयुष्य नेमून दिलें, तो आपल्या सत्कृत्यांचीं फळें पाहून संतुष्ट होणार नाहीं काय?

मनुष्यप्राणी खरोखर च वेडा—अगदीं वेडा—आहे ! कोणच्या हेतूनें तो दीर्घकालपर्यंत जगण्याची इच्छा करतो बरें? नुसता श्वासोच्छ्वास करण्याकरतां? का खाण्यापिण्याकरतां? कीं संसारसुख भोगण्याकरतां ? हें सर्व तर तो पूर्वीं च किती तरी वेळ करून चुकला आहे! तेव्हां तें च तें पुनःपुनः करणें त्रासाचें व वेडेपणाचें नाहीं काय?

मनुष्याला आपल्या शहाणपणांत व गुणांत भर घालावीशी वाटते. पण हाय! तो शिकणार तरी काय? आणि तें त्याला शिकवील तरी कोण? त्याच्याजवळ जें कांहीं अल्पस्वल्प आहे त्याचा च तो दुरुपयोग करतो; तेव्हां, अधिक कांहीं प्राप्त झालें नाहीं म्हणून त्यानें कुरकूर तरी कां करावी?

विद्येचा अभाव असला म्हणून शोक करण्याचें कारण नाहीं; कारण, तिचा आपल्याबरोबर च स्मशानांत अंत होतो. इहलोकीं नेकीनें वागलों तर मात्र आपण इतःपर शहाणे होऊं.

आमचें आयुष्य तर अगदीं थोडें, आणि यःकश्चित् कावळ्याचें व मृगपोताचें शेकडों वर्षें तें काय म्हणून, अशी कुरकूर करूं नये. कारण, आयुष्याचा दुरुपयोग

करणाऱ्या आपली व त्यांची तुलना कशी करतां येईल? मनुष्याप्रमाणें ते दंगेखोर आहेत काय? क्रूर आहेत काय? कृतघ्न आहेत काय? त्यांच्यापासून तरी मनुष्यानें निष्कपटपणा व वागणुकीचा सरळपणा शिकावा. सुखाचा वृद्धापकाळ प्राप्त करून घेण्याचे हे दोन मार्ग आहेत. त्यांच्यापेक्षां मनुष्याला आपल्या आयुष्याचा अधिक चांगला उपयोग करतां येईल काय? नाहींपेक्षां त्याला त्याचें अल्पायुष्य च पुरें आहे.

आपल्या जुलमी कारभाराचा आपणांस फार च थोडा वेळ उपभोग घेतां येईल, हें माहीत असून हि जो मनुष्य साऱ्या जगाला आपला गुलाम करून ठेवण्याचें धाडस करतो, त्याला जर अमरत्व प्राप्त झालें तर तो काय न करील?

मनुष्याला आयुष्य रगड आहे; पण त्याला हें कळत नाहीं. त्याला आयुष्याची वाण नाहीं; परंतु जवळ पुष्कळ असल्याप्रमाणें तो तें विनाकारण खर्च करतो. आणि इतकें करून हि तें थोडें आहे म्हणून शोक करतो. विपुलता असण्यांत कांहीं मातबरी नाहीं; तर, काटकसरीनें च मनुष्य श्रीमंत होतो, हें लक्षांत ठेवावें. सुज्ञ पहिल्यापासून च नीट राहून पुढें हि

तसा च वागतो; पण मूर्खाचा नेहमीं च 'श्रीगणेशाय नमः' असतो.

पुढें संपत्तीचा उपभोग घेऊं म्हणून आधीं ती मिळविण्याचे श्रम करूं नयेत; जो वर्तमानाकडे दुर्लक्ष करतो तो जवळचें सर्व गमावून बसतो. आपल्या समोरून बाण येत आहे हें वीराला कळण्यापूर्वीं च जसा तो येऊन त्याच्या हृदयांत शिरतो, तद्वत च आपल्याला आयुष्य आहे हें कळण्यापूर्वीं च काळ तें हिरावून नेतो.

तर मग, जीवनाची इतकी उत्कट इच्छा करण्यासारखें त्यांत काय आहे? नुसता श्वासोच्छ्वास करण्यासाठीं एवढा हव्यास कशाला पाहिजे? हा सारा व्यामोह—मतिविभ्रम—नाहीं काय? ही विपत्ति नव्हे काय? या सगळ्याचा आरंभ अज्ञानांत होतो, त्याच्या मध्यभागीं पीडा असते, व त्याचें पर्यवसान शोकांत होतें.

ज्याप्रमाणें एक लाट दुसरीला लोटते आणि मग दोन्ही मागून येणाऱ्या लाटेंत अंतर्भूत होतात, त्याचप्रमाणें एका संकटामागून दुसरें संकट धावत येतें; प्रस्तुतच्या मोठ्या दुःखांत पूर्वींचीं लहानसहान दुःखें लीन होतात. आमचें भय हें च आमचें खरें व्यसन होय,

आमच्या आकांक्षा नेहमीं असंभाव्याची आशा करीत असतात; परंतु हा मूर्खपणा—निव्वळ वेडेपणा—होय. मर्त्याप्रमाणें तर भय बाळगावयाचें व अमराप्रमाणें इच्छा करावयाची!

आपल्या आयुष्यांतील कोणचा भाग नेहमीं टिकावा असें आपल्याला वाटतें? तो भाग तारुण्य आहे काय? तर मग अत्याचार, साहस व दुर्वर्तन हीं आम्हांला प्रिय आहेत, असें म्हटलें पाहिजे. असें नाहीं, तर मग तो भाग वार्धक्य आहे काय? असला तर आम्हांला वीर्यहानि व जरा संमत आहे, असें ठरतें.

शुभ्र केसांना आदर मिळतो असें म्हणतात. पुरातनत्वाला मानमान्यता असते खरी; परंतु सद्गुण हा यौवनाच्या तजेल्याला सन्मानाची—सत्काराची—जोड देऊं शकतो, आणि त्यावांचून (सद्गुणावांचून) वार्धक्यांत आत्म्यापेक्षां शरिरावर च जरेचा परिणाम अधिक होऊन तें सुरकुतून जातें.

विशृंखळपणाचा तिरस्कार वाटतो म्हणून वार्धक्याला मान मिळतो, या म्हणण्यांत कांहीं खरेपणा नाही; हें म्हणणें उगी च आहे. कारण, वार्धक्यास वीट येतो म्हणून तें व्यसनांचा व विषयांचा तिरस्कार करतें

असें नसून, वास्तविक व्यसनें व विषय हे च वार्धक्याचा तिरस्कार करतात.

यौवनावस्थेंत सद्गुणांची जोड केली म्हणजे वार्धक्याला अवश्य सन्मान मिळेल.

खण्ड दुसरा.

मानवी दोष व त्याचे परिणाम.

प्रकरण पहिलें.

वृथाभिमान.

मनुष्याचें मन चंचल असतें. उच्छृंखळपणा त्याला हवें तें करायला लावतो. निराशा त्याला ग्रासून टाकते. भय म्हणतें कीं, त्यावर माझा ताबा आहे. परंतु वास्तविक पाहिलें असतां, या सर्वांपेक्षां अहंकाराची च सत्ता मनावर अधिक आहे. तस्मात्, मानवी दुःखाकडे बघून वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मात्र त्याच्या मूढतेकडे पाहून हंसायला हरकत नाहीं; कारण, अनियंत्रित अहंकारानें गुरफटलेल्या मानवाचें जीवित केवळ स्वप्नसृष्टींतील छायेप्रमाणें आहे.

मनुष्यांत नांवाजलेला, अगदीं मी मी म्हणणारा देखील ह्या दौर्बल्याचा—ह्या अहंकाराचा—एक नुसता बुडबुडा आहे. जनता ही अस्थिर व कृतघ्न असते; तेव्हां शहाण्यानें तिची काय म्हणून पर्वा करावी ?

जो मनुष्य आपला हल्लींचा कामधंदा सोडून पुढें मोठे झाल्यावर आपण कसें वागूं याविषयींच्या च विचारांत काळ घालवितो, त्याला बहुधा वायुभक्षणाचा च प्रसंग येतो; कारण, तो या विचारांत मग्न असतांना त्याच्या भाकरीवर दुसरा च ताव मारतो. म्हणून, हल्लीं शोभेल असें च वर्तन ठेविलें म्हणजे पुढें येणाऱ्या उच्चतर स्थितींत लज्जा वाटण्याचें कारण उरणार नाहीं.

अहंकार मनुष्याला आंधळा करतो, त्यामुळें आपल्या मनांतील विचार देखील त्याला नीट कळत नाहींत. अहंकारानें अंध झाल्यामुळें आपण दुसऱ्याला पाहूं शकत नाहीं; परंतु दुसरे मात्र आपल्याला उत्तम प्रकारें पाहूं शकतात.

वास नसून हि झेंडूचें फूल छानदार दिसतें आणि उपयोगाचें नसून हि उत्कृष्ट भासतें. अंगीं कांहीं गुण नसतांना डौल मिरविणाराची अशी च स्थिति असते.

त्याची काळजी स्मशानांत च नष्ट होत नाहीं; आपल्या जड शरिरापलिकडे तो आपल्या विचारांची मजल नेतो. मृत्यूनंतरच्या स्तुतिपाठाचा तो विचार करतो; परंतु जो त्याला या सगळ्यांचें अभिवचन देतो तो च अहंकार त्याला शेवटीं फशीं पाडतो.

आपल्या मरणानंतर आपली पत्नी वैधव्यांत राहिली असतां आपल्या आत्म्यास शांति मिळेल असें मानणारांची जी स्थिति असते, तशी च स्थिति आपल्या मरणानंतर लोकांनीं केलेल्या आपल्या स्तुतिपाठाचा ध्वनि कर्णरंध्रांत शिरून आपल्याला आनंद होईल असें समजणारांची असते.

जिवंत आहोंत तोंपर्यंत योग्य तें करावें; मग त्याबद्दल लोक काय म्हणतील याचा विचार करूं नये. आपण वास्तविक जेवढ्या स्तुतीस पात्र आहोंत तींत च संतोष मानावा, आणि ती च ऐकण्यांत आपल्या वंशजांना हि खरा आनंद होईल.

ज्याप्रमाणें पतंगाला आपल्या पंखांचा रंग दिसत नाहीं, अथवा आसपास दरवळणाऱ्या सुवासाचा गंध गुलाबपुष्पास घेतां येत नाहीं, त्याचप्रमाणें वरून दिसणारें आपलें रूप व गुण हे मानवी प्राण्यास दिसत

नाहींत. त्यांची त्याला इतरांकडून च परीक्षा करवून घ्यावी लागते.

मनुष्याला वाटतें कीं, आपल्या सोन्यारुप्याच्या भांड्यांचा, रत्नालंकारांचा, उत्तमोत्तम वस्तूंचा—त्यांना जर कोणीं बघितलें नाहीं—जगाला जर त्या माहीत झाल्या नाहींत—तर उपयोग काय? पण जगाला त्या ठाऊक व्हाव्या असें जर त्यास वाटत असेल, व ठाऊक होण्यांत च त्यांचा खरा उपयोग आहे अशी जर त्याची समजूत असेल, तर त्यानें उघड्यावाघड्यांना वस्त्र द्यावें, भुकेलेल्यांना अन्न द्यावें व अनाथांचा—निराश्रितांचा—प्रतिपाळ करावा. यायोगें लोक त्याचे गुण गातील, व आपण त्याला पात्र आहोंत असें त्याला हि पण आढळून येईल.

निरर्थक शब्दांनीं दुसऱ्याची खुशामत काय म्हणून करावी? आपल्याला ठाऊक च आहे कीं, दुसरे जेव्हां तसल्या च शब्दांनीं आपली हांजीहांजी करतात, तेव्हां आपण त्यांच्याकडे लक्ष देत नाहीं. खुशामत्या आपल्याशीं जाणूनबुजून खोटें बोलतो आणि त्याबद्दल आपण त्याचे आभार मानूं, हें हि त्याला ठाऊक

असतें च. सरळ व सत्य भाषण केलें तर दुसऱ्यांकडून आपल्याला साहजिक च मान मिळेल.

वृथाभिमानी मनुष्य आपल्याविषयीं च बोलण्यांत आनंद मानतो; पण आपलें बोलणें दुसऱ्यास आवडत नाहीं हें त्याला कळत नसतें. त्यानें खरोखर च एखादें वाखाणण्यासारखें कृत्य केलें असलें अथवा प्रशंसनीय अशी एखादी वस्तु त्याच्यापाशीं असली, तर त्याबद्दल आत्मश्लाघा करण्यांत च तो हर्ष मानतो; लोकांनीं त्याबद्दल गुण गाण्यांत च त्याला भूषण वाटतें. अशा माणसाच्या आशा आपोआप च भंग पावतात. कारण, 'त्यानें अमुक केलें, त्याच्यापाशीं अमुक आहे' असें लोक म्हणत नाहींत; पण उलट, 'पहा तो कसा गर्विष्ठ आहे!' असें च म्हणतात.

एकसमयावच्छेदेंकरून अनेक गोष्टींकडे मनुष्य लक्ष देऊं शकत नाहीं. म्हणून, जो आपलें लक्ष बाह्य सौंदर्यावर लावतो, तो अंतरंगांतील खऱ्या तत्त्वाला मुकतो. कधीं हि प्राप्त न होणाऱ्या बुडबुड्यामागें तो लागलेला असतो; परंतु ज्याबद्दल त्याचा गौरव होईल—त्याला मान मिळेल—अशाला तो पायाखालीं तुडवीत असतो.

प्रकरण दुसरें.

चंचलता.

निसर्गदेवता मनुष्याला नेहमीं चंचल बनण्याची प्रेरणा करीत असते, म्हणून त्यानें फार सावधगिरीनें वागलें पाहिजे.

गर्भावस्थेपासून च आपण चंचल व अस्थिर असतो. आपल्या पित्याचें चांचल्य आपल्यांत उतरतें. तर मग आपल्याला निश्चल व स्थिर कसें होतां येईल? ज्यांनीं आपल्याला शरीर दिलें त्यांनीं च कमकुवतपणा दिला; परंतु ज्यानें आपल्याला आत्मा दिला त्यानें च आपल्याला निश्चयाचें हत्यार दिलें आहे. त्याचा उपयोग केला तर आपण शहाणे होऊं व शहाणे झालों तर सुखी होऊं च होऊं.

जो मनुष्य एखादें चांगलें काम करतो, त्यानें त्याबद्दल प्रतिष्ठा मिरवितांना फार सावधपणानें विचार केला पाहिजे; कारण, तो तें आपखुषीनें क्वचित च करीत असतो. तें काम बहुधा बाह्य प्रोत्साहनाचा परिणाम, अनिश्चयाचें लेंकरूं, दैवयोगाची घटना अथवा परावलंबित्व असतें; तर मग या गोष्टी च स्तुतीला अधिक पात्र आहेत.

कर्तव्य गोष्टींचा विचार करतांना डळमळूं नये, व त्या करतांना अनिश्चितपणा असूं नये. यायोगानें आपल्या दोन मोठ्या स्वाभाविक दोषांवर आपल्याला जय संपादन करतां येईल.

विपरीत आचरण अत्यंत गर्ह्य होय, आणि मनाचा खंबीरपणा असल्याशिवाय तें टाळतां येणार नाहीं.

चलचित्त माणसाला आपण चंचल आहोंत असें वाटतें; पण या चांचल्याचें कारण काय हें त्याला कळत नाहीं. आपण स्वभ्रष्ट होतों हें त्याला दिसतें; पण ह्याचें कारण त्याला कळत नसतें. लोकांचा विश्वास बसण्यासाठीं न्याय्य गोष्टींत निश्चल झालें पाहिजे.

आपल्या आचरणाचे नियम निश्चित करावे व मग त्यांबरहुकूम वागण्याची खबरदारी घ्यावी. आपले नियम न्याय्य व योग्य आहेत याबद्दल प्रथम खात्री करून घ्यावी, आणि मग ते पाळतांना निश्चयी व्हावें. येणेंकरून आपल्यावर मनोविकारांचा पगडा बसणार नाहीं. आपला निश्चय आपल्या सद्गुणांना स्थिर करून आपत्तीला दूर हांकून लावील, आणि काळजी व निराशा यांचा आपल्यापावेतों प्रवेश हि होणार नाहीं.

प्रत्यक्ष दिसेपर्यंत दुसऱ्याच्या वाईटपणाविषयीं शंका घेऊं नये; पण एकदां आढळल्यावर मात्र त्याला विसरूं नये. ज्याच्याशीं शत्रुत्व आहे तो मित्र होऊं शकत नाहीं; कारण, मनुष्यप्राणी आपले दोष सुधारण्याचा क्वचित च प्रयत्न करतो.

ज्याच्या जीवनक्रमाचे नियम ठरलेले नाहींत, त्याचा व्यवहार तरी कसा योग्य असूं शकेल? कारण, ज्याचा उगम विचारशक्तीपासून नाहीं, तें योग्य असूं शकत नाहीं.

चंचल माणसाच्या अंतःकरणाला तर शांतता मिळत नाहीं च; पण ज्यांच्याशीं त्याचा संबध असतो त्यांला हि स्वास्थ्य लाभत नाहीं. त्याचें जीवन असदृश असतें, त्याचें आचरण अनियमित असतें, त्याचें चित्त वाऱ्याप्रमाणें चंचल असतें. आज जर एखाद्यावर त्याचें प्रेम असलें तर उद्यां तो त्याचा तिरस्कार करील; आणि कां? तर काल आपण प्रेम कां केलें व आज तिरस्कार कां करतो, हें च त्याला कळत नाहीं म्हणून. आज जर त्यानें एखाद्यावर जुलुम केला तर उद्यां तो त्याचा गुलामापेक्षां हि गुलाम बनेल. कां? तर अधि-कारावांचून जो आज उद्धत आहे तो अधीनते-

वांचून हि उद्यां दास बनेल. आज जर तो उधळपट्टी करील तर उद्यां आपल्या पोटाला पुरेसा खुराक देण्यास हि तो कुरकुर करील. ज्याला नियमितपणा ठाऊक नाहीं त्याची जर अशी अवस्था झाली तर त्यांत आश्चर्य काय?

सरड्याचा रंग सांगणें जसें कठिण, तसें च विसंगत पुरुषाच्या चित्तवृत्तीचा निर्णय करणें हि अत्यंत दुष्कर होय.

अशा माणसाचें जीवित स्वप्नाभासाप्रमाणें नव्हे तर काय? पहाटेस तो खुशाललेला उठतो; दोनप्रहरीं तो यातनायंत्रावर असतो. या घडीस तो ईश्वर असला तर घटकाभरानें तो कीटकापेक्षां हि क्षुद्र बनतो. आतां जर तो हसतमुख दिसला तर क्षणभरानें तो रडतांना दिसेल. सध्यां याची लहर लागते, निमिषमात्रानें ती लागेनाशी होते; व आणखी क्षणभरानें आपली लहर लागते किंवा नाहीं हें च त्याला कळत नाहीं. त्याच्यावर सुखाचा अगर दुःखाचा अंमल नसतो. तो मोठा होत नाहीं व क्षुद्र हि होत नाहीं. त्यांच्या हंसण्याप्रमाणें त्याच्या शोकाला हि कारण

नसतें. म्हणून च यांपैकीं कोणतें हि त्याच्यापाशीं टिकत नाहीं. क्षुल्लक कारणानें त्याची चलबिचल होते.

परंतु, निश्चयी मनुष्य आपल्या जीवनाचे नियम निश्चित करून त्याप्रमाणें वागतो. कशी हि आपत्ति आली तरी तो वांकत नाहीं. त्याच्या भालप्रदेशावर ऐश्वर्य विराजत असतें. त्याची गति गंभीर, अवक्र व अस्खलित असते व त्याच्या अंतःकरणांत शांततेचें साम्राज्य असतें. वाटेंत किती हि विघ्नें आलीं तरी त्यांकडे तो ढुंकून हि बघत नाहीं. जरी दैवी व मानवी शक्ति त्याच्या मार्गांत आडव्या आल्या तरी पण तो पुढें धसत च जातो.

हें सर्व एक न्याय्य पथ स्वीकारल्यानें साधतें, म्हणून न्याय्य तें करण्यांत कधीं हि माघार घेऊं नये; आणि निर्विकल्पता–निर्विकारता–हें च मनुष्याचें श्रेष्ठ ऐश्वर्य होय, हें पक्कें लक्षांत ठेवावें.

प्रकरण तिसरें.

दौर्बल्य.

मनुष्यप्राणी वृथाभिमानी व अस्थिर असल्यामुळें साहजिक च दुर्बल असतो. कारण, अस्थैर्य व नश्वरत्व

यांचा परस्पर संबंध आहे, आणि दौर्बल्यावांचून वृथाभिमान असूं शकत नाहीं; म्हणून, यांपैकीं एकापासून होणारी भिति जर टाळली तर दुसऱ्यामुळें होणाऱ्या हानीपासून बचावून राहतां येईल.

जेथें आपण आपल्याला फार सामर्थ्यवान् समजतों, जेथें आपल्याला अत्यंत प्रतिष्ठा वाटते, तेथें च आपण अत्यंत दुर्बल असतों. आपल्यापाशीं असलेल्या साधनांत देखील—आपल्यांत असलेल्या चांगल्या गोष्टींचा उपयोग करण्यांत सुद्धां—आपण दुर्बल आहोंत.

आपल्या इच्छा क्षणभंगुर नाहींत काय? अथवा आपल्याला कसली इच्छा होईल याची तरी आपल्याला कल्पना असते काय? इच्छित वस्तु एकदांची मिळाली तरी तीपासून आपलें समाधान होत नाहीं. वर्तमान गोष्टींतील आनंद कां मावळतो? भावी गोष्टी प्रियतर कां वाटतात? याचें कारण, वर्तमान गोष्टींतील आनंदाचा वीट येतो व ज्या गोष्टी आपल्याला प्राप्त झाल्या नाहींत त्यांतील दोष आपल्याला माहीत नसतात, हें होय. म्हणून, आहे त्या स्थितींत संतोष मानण्यांत च खरें सुख आहे, हें ध्यानांत ठेवावें.

आपल्याला जर स्वतःची आवडानिवड असली, ईश्वरानें जर आपल्या इच्छित वस्तु आपल्याला एकदम दिल्या तर त्यांपासून आपल्याला कायमचा आनंद मिळेल काय? शाश्वतचें सुख लाभेल काय? नाहीं. आपलें दौर्बल्य त्या सुखाच्या आड येतें. असामर्थ्य त्या आनंदाला आडवें फिरतें. कारण, वैचित्र्यांत च आपल्याला मौज वाटते. ज्यापासून स्थिर व नित्य सुख मिळावयाचें तें स्वतः नित्य व चिरस्थायी च असलें पाहिजे.

आपण जेव्हां एकाद्या सुखाचा अनुभव घेत असतों, तेव्हां आपल्याला त्याचा कंटाळा—वीट—येतो. परंतु तें सुख निघून गेल्यावर मात्र त्याबद्दल पश्चात्ताप होतो. बरें, त्यानंतरच्या सुखांत तरी आपल्याला समाधान वाटतें काय? नाहीं; उलट, आपण त्याची निवड केल्याबद्दल स्वतःशीं च असंतुष्ट असतो.

वस्तूंचा अभिलाष करण्यांत च, व त्या प्राप्त झाल्या असतां त्यांचा उपयोग करण्यांत च मानवी दौर्बल्य दिसून येतें. चांगल्या वस्तु—त्यांचा उपभोग घेतां घेतां च—चांगल्या वाटेनाशा होतात. ज्या गोष्टी निसर्गतः च शुद्ध व मधुर आहेत, त्या च आपणांस कडू वाटतात. आपल्या हर्षापासून च विषाद उद्भवतो, व

आपल्या आनंदाचें पर्यवसान दुःखांत होतें. ज्या वस्तूकरितां इतकी तळमळ होते, तिच्या उपभोगानंतर तिचा आपल्याला वीट येतो; ती मिळतां क्षणीं च दृष्टी-समोर हि नकोशी होते.

म्हणून, सुखास्वादांत परिमित राहिलें म्हणजे तें आपणांस सदैव लाधेल. आपला हर्ष विवेकाला धरून असला म्हणजे शेवटीं आपल्याला दुःख होणार नाहीं. आपल्या प्रशंसेंत आदर असला आणि प्रीतींत मित्रत्व असलें तर शेवटीं इतका संतोष वाटेल कीं, त्यापुढें आनंदातिरेक कांहीं च नाहीं. इतकी शांति मिळेल कीं, तीपुढें हर्षोन्मादाची हि किंमत कमी ठरेल.

ईश्वरानें आपल्याला प्रत्येक चांगली गोष्ट देतांना तिच्याबरोबर वाईट हि दिली आहे. तथापि तींतून वाईट भाग काढून टाकण्याची साधनें हि दिलीं आहेत. ज्याप्रमाणें आनंदांत दुःखाची छटा असते, त्याप्रमाणें दुःखांत हि आनंदाचा भाग असतो च. सुख व दुःख हीं जरी भिन्न असलीं तरी तीं एकवटून असतात, आणि केवळ आपल्या निवडीनें च एकाचा दुसऱ्याशिवाय अनुभव येऊं शकतो. औदासिन्यांत कधीं कधीं आपणांस आनंद होतो, व हर्षांचा अतिरेक झाला असतां अश्रू

वाहूं लागतात. मूर्खांच्या हातांतील चांगल्या वस्तू हि त्याच्या नाशास कारणीभूत होऊं शकतात, व अत्यंत वाईटांतून हि शहाणा मनुष्य चांगल्याचीं साधनें शोधून काढूं शकतो.

मनुष्यप्राणी जात्या च दुर्बल असल्यानें केवळ चांगला अगर केवळ वाईट होण्याची त्यांच्यांत वस्तुतः शक्ति नाहीं. म्हणून, आपल्याला सर्वस्वीं च वाईट होतां येत नाहीं याबद्दल आनंद मानून, मिळेल तेवढ्या चांगल्यांत च त्यानें संतोष मानावा. अशक्य गोष्टींकडे धांव घेऊं नये किंवा त्या सगळ्या मिळत नाहींत म्हणून विषाद हि मानूं नये.

निरनिराळ्या स्थितीसाठीं निरनिराळ्या सद्‌गुणांची योजना झाली आहे. श्रीमंतांचें औदार्य अगर गरिबांचा संतोष एकदम मिळेल काय? वैधव्यांतील सद्‌गुण तिला दाखवितां येत नाहींत म्हणून आपल्या प्राणेश्वरीचा तिरस्कार करावा काय? आपला पिता जर स्वदेशांतील क्रांतींत बुडत असला तर आपली नीति त्याचा नाश करूं देईल, अथवा आपली कर्तव्यबुद्धि त्याचा जीव वांचविण्यास सांगेल? आपला भाऊ मृत्यूच्या यातनांत खितपत पडला असतां त्याच्या

जीविताचा शेवट करणें, ही त्याच्यावर दया च होईल; तत्रापि त्याचा मारेकरी होण्यांत आपलें स्वतःचें च मरण नव्हे काय ?

सत्य हें एक च आहे. दोन परस्पर विरुद्ध गोष्टी खऱ्या असूं शकत नाहींत. आपण च आपल्या शंकांचे जनक आहोंत. ज्यानें सद्गुण उत्पन्न केले त्यानें च त्यांच्या श्रेष्ठत्वाचें ज्ञान आपल्याला दिलें; म्हणून, आपला आत्मा सांगेल त्याप्रमाणें वागलों तर परिणाम शुद्ध होईल.

प्रकरण चवथें.

ज्ञानाची अपूर्णता.

जर कांहीं सुंदर असेल, जर कांहीं स्पृहणीय असेल व प्रशंसनीय असें कांहीं मानवी शक्तीच्या आटो-क्यांत असेल तर तें ज्ञान च होय. असें असून हि तें पूर्णपणें कोणाला प्राप्त झालें आहे काय ?

मुत्सद्दी म्हणतो कीं, माझ्यांत तें ज्ञान आहे. लोकांचा शास्ता म्हणतो कीं, तें माझ्याजवळ असल्यानें मी स्तुतीस पात्र आहें. पण त्याच्यांत तें आहे असें प्रजेला आढळून येतें काय ?

मनुष्यास दुराचाराची कांहीं अवश्यकता नाहीं; दुर्गुणांला मोकळीक देण्याची हि गरज नाहीं; तथापि कायद्याच्या डोळेझांकीमुळें किती तरी दुराचारांना सवड मिळते! न्यायासनाच्या निवाड्यामुळें किती तरी गुन्हे घडतात!

परंतु जो शास्ता असेल त्यानें शहाणपणा शिकावा. जो अम्मल गाजविणारा असेल त्यानें हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, शिक्षेपासून दहा गुन्हेगार निसटण्यापेक्षां, आपल्या प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष अनुमतीनें घडलेला एक च गुन्हा अधिक वाईट आहे.

सैन्य पुष्कळ असलें, पैसा रगड असला म्हणजे राजांना लोभ सुटून ते दुर्बलांवर, निरपराध्यांवर कांहीं तरी कारण काढून खुशाल स्वाऱ्या करतात. त्या लोकांना मारणें, त्यांच्याकडून आपल्या फौजेची कत्तल करविणें म्हणजे निव्वळ खून करणें नव्हे काय? आपल्या इष्ट कार्याकरितां ते हजारों निरपराध्यांचे प्राण खर्चीं घालण्यास मागेंपुढें पाहत नाहींत; परंतु ज्यानें आपल्याला निर्माण केलें त्यानें च प्रजेला हि पण उत्पन्न केलें, आणि स्वतःच्या रक्ताइतकी च

तिच्या हि पण रक्ताची किंमत आहे, ह्याचा त्यांना अगदीं च विसर पडतो.

जुलमाशिवाय न्याय देतां येत नाहीं, असें ज्याचें म्हणणें असेल तो च दोषी ठरत नाहीं काय? आरोपीच्या मनाला–त्यानें अपराध कबूल करावा म्हणून–खोटी आशा लावणें म्हणजे त्याचा गुन्हा करणें नव्हे काय? किंवा त्याबद्दल तो बिचारा शिक्षा करूं शकत नाहीं, म्हणून त्याला आशा लावणाऱ्याचा अपराध सौम्य ठरतो काय? गुन्हा केल्याबद्दल ज्याचा नुसता संशय आहे अशाला यातना देण्याचा हुकूम करतांना, आपण एका निरपराध्याला तर क्लेश देत नाहीं ना, याची कितीकांना आठवण असते बरें?

परिणामानें उद्देश साध्य होईल काय? त्याच्या कबुलीजबाबानें कार्यभाग होईल काय? यातना त्याच्याकडून नाहीं तें आहे व आहे तें नाहीं सहज वदवील; पण तेवढ्यानें काय होणार? क्लेशांनीं–दुःसह यातनांनीं–लाखों निरपराध्यांस आपणांवर विनाकारण दोष लादून घेण्यास भाग पाडलें आहे! कारणाशिवाय त्याला मारूं नये म्हणून कांहीं तरी कारण दाखविणें, हें त्याचा प्राण घेण्यापेक्षां हि अधिक वाईट आहे. तो

अपराधी आहे हें सिद्ध करण्यासाठीं च त्या बिचाऱ्याचा नाश होतो!

कोण ही सत्याविषयीं डोळेझांक! कोण हें ज्ञात्यांच्या ज्ञानाचें अपूर्णत्व!! पण त्यांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें–ही अगदीं खात्री बाळगावी–कीं, एका निरपराध्यानें आपल्या विरुद्ध साक्ष देण्यापेक्षां हजारों अपराधी जरी साफ निसटले तरी बरें असें त्यांना वाटेल.

न्यायाचें पालन करण्यास मनुष्यप्राणी अक्षम असल्यामुळें त्याला सत्याचें ज्ञान कसें होईल? व नुसतें त्याच्याजवळ जाण्यास तरी तो कसा समर्थ होईल? ज्याप्रमाणें सूर्यप्रकाशानें घूकाला अंधत्व येतें, त्याप्रमाणें सत्याजवळ जातां च त्याच्या तेजानें बिचाऱ्या मानवाचे डोळे दिपून जातील. म्हणून जर सत्यापाशीं जावयाचें असेल, तर प्रथम त्याच्या पादपीठापाशीं आपलें मस्तक नम्र केलें पाहिजे; जर त्याची ओळख करून घ्यावयाची इच्छा असेल, तर आधीं स्वतःचें अज्ञान किती आहे हें जाणून घेतलें पाहिजे.

सत्याची किंमत मोत्यापेक्षां हि अधिक आहे; म्हणून, त्याचा फार काळजीपूर्वक शोध केला पाहिजे. पाचू, इंद्रनील, माणकें, हिरे हे सर्व त्याच्या पायांखालील

धुळीचे रज होत! म्हणून, मोठ्या मर्दुमकीनें त्याचा पाठलाग करायला हवा.

उद्योग करणें हा सत्याची प्राप्ति करून घेण्याचा एक मार्ग आहे. एकाग्रता ही त्याच्या मंदिराचा मार्ग दाखविणारी एक दासी आहे. पण वाटेंत च कचरूं नये. कारण, एकदां का आपण त्याच्यापाशीं गेलों म्हणजे आपले सारे श्रम—सारा थकवा—सुखदायक च होईल.

" सत्यामुळें जर दोष उत्पन्न होतात तर तें काय कामाचें? आणि कपटव्यवहारानें जर मित्र मिळवितां येतात तर त्याचा च अवलंब कां करूं नये?" असें चुकून देखील समजूं नये. कारण, सत्यामुळें झालेले शत्रू, व्याजस्तुति करून जोडलेल्या मित्रांपेक्षां, अधिक चांगले होत, हें ध्यानांत ठेवावें.

निसर्गतः च मनुष्यास सत्याची आवड असते. तरी पण तें समोर असून हि त्याला त्याची ओळख पटत नाहीं; आणि तें जर जबरीनें पुढें आलें तर उलट त्याला त्याचा राग येतो. यांत सत्याचा कांहीं च दोष नाहीं; कारण तें सुशील आहे. परंतु मानवी दौर्बल्य

त्याचें तेज सहन करूं शकत नाहीं एवढें च. यावरून मानवी प्राणी किती अपूर्ण आहे हें सहज दिसून येईल.

ईश्वरोपासनेच्या वेळीं आपल्या स्वतःचा नीट विचार करावा. आपल्या कमकुवतपणाची ओळख करून देण्यापलिकडे धर्मसंस्थापनेचा दुसरा कोणता च उद्देश नाहीं. ईश्वरापासून च आपल्याला जें चांगलें तें मिळण्याची आशा आहे, हें च धर्म आपल्याला सांगतो ना? आपण मृत्तिकेपेक्षां हि कुचकामाचे आहोंत—राखेपेक्षां आपली किंमत मुळीं च अधिक नाहीं—याची तो आपल्याला पदोपदीं आठवण देत नाहीं काय? आणि आपल्या पश्चात्तापाचा जर विचार केला, तर तो आपल्या दौर्बल्यापासून च उत्पन्न होतो अशी आपली खात्री पटेल.

जेव्हां आपण शपथ घेतों, जेव्हां आपण फसविणार नाहीं अशी आणभाक करतों, तेव्हां आपल्या तोंडावर लज्जा पसरलेली दिसते; आपण न्यायी होण्यास शिकलों म्हणजे पश्चात्तापाचा विसर पडला असतां चालेल, व प्रामाणिक होण्यास शिकलों तर शपथाआणांची गरज च पडणार नाहीं.

जो आपले दोष शांतपणानें ऐकून घेतो त्याला दुसऱ्यास धैर्यानें बोल लावतां येईल. जर आपला कोणास संशय आला तर स्पष्टपणानें जबाब द्यावा. जो अपराधी नाहीं त्याला संशयाचें भय काय?

जो मनाचा कोंवळा आहे तो, प्रार्थना केली तर, अंगीकृत कार्यापासून परावृत्त होईल; पण उद्धताचा दुराग्रह प्रार्थनेनें अधिक च बळावतो. आपल्या अज्ञ-पणाची–अपूर्णत्वाची–जाणीव ही आपणांस दुसऱ्याचें ऐकण्यास भाग पाडते; परंतु न्यायी होण्याची जर आपली इच्छा असेल तर आपले मनोविकार बाजूला ठेवून च आपल्याला दुसऱ्याचें ऐकलें पाहिजे.

प्रकरण पांचवें.

दुःख.

एकादें चांगलें काम करण्यांत मनुष्य कमकुवत व अपूर्ण असतो. सुखांत तो दुर्बल व अस्थिर बनतो; पण दुःखांत मात्र तो निश्चयी व अढळ असतो.

दुःख हें मानवी शरिराचा एक धर्म आहे, त्याच्या प्रकृतीचा एक विशेष अधिकार आहे. तें त्याच्या हृद-यांत च वास करतें; त्याच्याशिवाय तें असूं शकत

नाहीं, आणि मनुष्याच्या मनोविकारापासून च त्याची उत्पत्ति होते.

मनुष्यास ज्यानें मनोविकार दिले त्यानें च त्यांचें नियमन करण्याची बुद्धि हि दिली. तिचा उपयोग केला म्हणजे मनुष्याला मनोविकारांना आपल्या पायाखालीं तुडवितां येईल.

मानवी उत्पत्ति लज्जास्पद आहे ना? मग त्याचा नाश होणें श्रेयस्कर नाहीं का? काय गम्मत आहे! मनुष्यें मृत्यु देणाऱ्या हत्यारांना सोन्यामोत्यांनीं सुशोभित करून त्यांना आपल्या अंगावर धारण करतात!

जो पुष्कळशा मुलांना जन्म देतो त्याला लोक नांवें ठेवतात; परंतु जो हजारों मनुष्यांचे प्राण घेतो त्याला लोक मान देतात. पण हें सगळें चुकीचें आहे; कारण, रूढीनें सत्याचा धर्म बदलूं शकत नाहीं, अगर एका व्यक्तीच्या मतानें न्यायाचा नाश होऊं शकत नाहीं. कीर्तीची व लज्जेची मात्र अस्थानीं योजना होते एवढें च.

मनुष्य उत्पन्न होण्याचा एक च मार्ग आहे; पण त्याचा नाश मात्र नानाप्रकारांनीं होऊं शकतो. जो दुसऱ्या जीवाला जन्म देतो त्याची कोणी हि स्तुति

करीत नाहीं, अगर त्यास कोणी मान देत नाहीं; पण खुनाच्या मोबदल्यांत राज्यें मिळतात व विजयोत्सव करण्यांत येतो. एका माणसाला ठार मारणाऱ्यास लोक ' खुनी ' म्हणतात; पण हजारों–लाखों–लोकांचा जीव घेणारा ' वीर ' ' शूर ' म्हणून सर्वत्र गाजतो. तरी पण ज्याला पुष्कळशीं मुलें आहेत त्यावर ईश्वराची कृपा च समजली पाहिजे. जो दुसऱ्याचा जीव घेतो त्याच्या जीवाला मात्र सुख लागत नाहीं.

मानवी प्राण्याच्या वांट्याला आधींच पुष्कळसें दुःख आलें आहे; तथापि शोक करून तो त्याची आणखी वृद्धि करीत च असतो. शोक हा सर्व संकटांपेक्षां वाईट असून त्याचा बराचसा भाग मनुष्यास जन्मतः च मिळालेला असतो. मग हेकटपणा करून त्यांत आणखी भर घालणें मूर्खपणा नव्हे काय?

खेद करणें हा मनुष्याचा स्वभाव च आहे व तो त्याला नेहमीं चिकटून असतो. आनंद हा एक विदेशी पाहुणा असून तो कधीं कधीं भेटतो. म्हणून, आपल्या बुद्धीचा जर नीट उपयोग केला तर दुःखाला दूर लोटतां येईल, व जर समंजसपणानें वागलों तर आनंदाच्या भेटी दीर्घकालपर्यंत टिकतील. आपल्या शारि-

राच्या प्रत्येक अवयवामुळें दुःख होण्याचा संभव आहे; पण आनंद मिळण्याचे मार्ग फार च थोडे व संकुचित आहेत. सुखांचा व्यक्तिशः अनुभव मिळतो; पण दुःखें एकसमयावच्छेदेंकरून येऊन कोसळतात. गवताची काडी पेटतांक्षणीं च ती विझून हि जाते, त्याचप्रमाणें आनंदाचा तजेला तेव्हां च मावळतो व तो कोठें निवून जातो हें आपल्याला कळत हि नाहीं. दुःखें वारंवार प्राप्त होतात; पण सुख दुर्मिळ असतें. आपत्ति आपण होऊन च ओढवतात; पण सुख श्रमानें मिळवावें लागतें. दुःख निर्भेळ असतें; पण प्रत्येक सुखांत दुःखाच्या उग्रतेचे कण मिसळलेले असतात.

सुदृढ प्रकृति लवकर लक्षांत येत नाहीं; पण आजार मात्र तेव्हां च नजरेस पडतो. त्याचप्रमाणें आनंदाचा आपणांवर फार च थोडा परिणाम होतो. पण अत्यल्प दुःखानें मात्र हृदय भेदून जातें. पुष्कळदां आपण चिंतेला आमंत्रण करून सुखापासून दूर पळून जातो. तेव्हां सुख मोलानें विकत घेणें म्हणजे त्याची वाजवीपेक्षां फाजील किंमत देणें नाहीं काय ?

विचार करणें हें मनुष्यमात्राचें काम आहे. आपण कोण आहोंत हें ज्ञान मिळविणें आपलें कर्तव्य आहे.

पण आनंदांत–सुखांत–स्वतःची आठवण असते कोठें? मग आपल्या वांट्याला दुःख आलें आहे ही आपणांवर दया च नाहीं का?

भावी संकटाचा मनुष्य विचार करीत असतो. तें निघून गेल्यावर त्याला त्याची आठवण असते. पण मूळ दुःखापेक्षां–संकटापेक्षां–त्याच्या केवळ विचारानें च अधिक वेदना होतात हें त्याला कळत नाहीं. जेव्हां दुःख अगदीं येऊन च पडेल तेव्हां च काय तो त्याचा विचार केला तर त्यापेक्षां अधिक दुःख देणाऱ्या गोष्टींपासून बचावतां येईल. कारण नसतांना शोक करणें म्हणजे गरजेपेक्षां अधिक रडणें नव्हे काय?

जोंपर्यंत तीर अगदीं अंगांत घुसत नाहीं तोंपर्यंत हरणाला वाईट वाटत नाहीं; जोंपर्यंत शिकारी कुत्र्यानें अगदीं घेरलें नाहीं तोंपर्यंत ससा कधीं हि घाबरून जात नाहीं; पण मनुष्य मात्र मृत्यूच्या नुसत्या भयामुळें च तो आला असें समजतो, आणि मृत्यूपेक्षां ती भीति च त्याला अधिक दुःख देते.

आपल्या कृत्यांचा जाब देण्यास नेहमीं तयार असावें, व अगदीं अकल्पित आलेलं मरण सर्वोत्कृष्ट होय हें विसरूं नये.

प्रकरण सहावें.

निर्णय.

विवेक व इच्छाशक्ति या दोन फार मोठ्या देणग्या ईश्वरानें मनुष्यास दिल्या आहेत. यांचा जो दुरुपयोग करीत नाहीं त्याला च खरें सुख मिळतें.

ज्याप्रमाणें पर्वतावरील जलप्रवाह, ज्याला कांहीं चांगला बळकट आधार नाहीं असें जें जें म्हणून सांपडेल त्या सगळ्यांचा नाश करून टाकतो, त्याच-प्रमाणें कोणत्या हि गोष्टीचा नीट शोध केल्याशिवाय –तिला काय आधार आहे हें पाहिल्याशिवाय– तिच्या मागें लागणाऱ्या मनुष्याच्या बुद्धीला जनापवाद दडपून टाकतो.

आपण सत्य म्हणून ज्याचा स्वीकार करतों तें निव्वळ त्याची पडछाया नाहीं याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे; कारण, जें म्हणून आपल्याला खात्रीचें वाटतें, तें बहुधा नुसतें दिखाऊ असतें. निश्चयी झालों, अढळ झालों व काय करावयाचें तें स्वतः च ठरविलें तर मग आपल्या दौर्बल्याबद्दल च फार झालें तर आपण जबाबदार राहूं.

कार्य पाहून च –कारण पाहिल्याशिवाय– त्याच्या परिणामाविषयीं मत देण्याचें साहस करूं नये; कारण, मनुष्यप्राणी यदृच्छेच्या आटोक्याबाहेर नाहीं हें लक्षांत ठेवावें.

आपल्याशीं जुळत नाहींत एवढ्या च साठीं दुसऱ्याच्या विचारांची अवहेलना करूं नये; कारण, दोघे हि चुकण्याचा सारखा च संभव आहे.

जेव्हां एखाद्याच्या पदव्यांबद्दल त्याला आपण मान देतों व दुसऱ्याला त्या नाहींत म्हणून त्याचा तिरस्कार करतों, तेव्हां आपण वेसणीवरून उंटाची परीक्षा करतों असें च होत नाहीं काय?

आपल्या शत्रूचा प्राण घेतला म्हणजे आपण त्याचा सूड उगवला असें समजूं नये; कारण, यामुळें त्याला आपण आपल्या आटोक्याबाहेर करतो. त्याला आपण आयती च विश्रांति देऊन, त्याला इजा करण्याचें आपलें साधन गमावून बसतों.

आपली माता व्यभिचारी होती असें जर कोणीं आपणांस सांगितलें तर त्यासून आपल्याला दुःख होतें ना? आपली प्राणेश्वरी आपल्याशीं बेइमान झाली म्हणून जर आपल्याला कोणीं नांवें ठेवलीं तर त्यामुळें

आपल्या अंतःकरणाला व्यथा होत नाहीं काय ? मग याबद्दल जर कोणीं आपला तिरस्कार केला तर तो स्वतः च नीच ठरणार नाहीं काय? एकाच्या दोषाबद्दल दुसरा कधीं तरी जबाबदार होऊं शकेल काय ?

आपल्या स्वतःपाशीं आहे म्हणून एखाद्या रत्नाची अवहेलना करूं नये, किंवा एखादी वस्तु दुसऱ्याजवळ आहे म्हणून तिला बिनमोल मानूं नये; शहाण्याच्या संग्रहाला असल्यानें च वस्तूची किंमत वाढते हें लक्षांत ठेवावें.

आपल्या पत्नीला-ती आपल्या ताब्यांत आहे म्हणून-कमी मान देऊं नये, आणि "तिच्यावर तुझें फारसें प्रेम नाहीं ना? मग कर तिच्याशीं लग्न!" असें जो म्हणाला असेल, त्याचा तिरस्कार करावा. आपल्या सद्गुणांवर तिचा विश्वास होता म्हणून च ना ती आपल्या अधीन झाली? तिचे आपल्यावर फार उपकार आहेत म्हणून तिच्यावर कमी प्रेम करावें काय ?

विवाहार्थ तिची प्रार्थना करते वेळीं, तिचें अनुरंजन करते वेळीं जरी आपण न्यायपर असलों व ती प्राप्त झाल्यावर जरी आपण तिची हेळसांड केली

तरी तिच्या वियोगामुळें आपल्या अंतःकरणाला फार व्यथा होईल.

दुसऱ्याजवळ एखादी वस्तु आहे म्हणून च त्याची स्थिति उत्तम मानूं नये; कारण, यामुळें तो दुसरा जरी अधिक शहाणा नाहीं, तरी निदान अधिक सुखी तरी खास ठरतो.

एखाद्याच्या अश्रूंवरून च त्याच्या हानीची कल्पना करूं नये; कारण, मोठालीं दुःखें अशा व्यक्त चिन्हां-पलिकडे असतात.

कोणतें हि कृत्य मोठ्या डामडौलानें व धूमधडा-क्यानें झालें म्हणून त्याची प्रशंसा करूं नये. अ-विकारतेनें जे महत्कृत्यें करतात ते च महात्मे होत.

एखाद्याच्या कानांवर कोणाची कीर्ति गेली असतां तो आश्चर्यचकित होतो; परंतु ज्याच्या हृदयांत शांति आहे त्याला च तीपासून सुख होतें.

दुसऱ्यानें सत्कृत्यें केलीं तर तीं वाईट हेतूनें केलीं असें म्हणूं नये; कारण, त्याच्या मनांत काय आहे हें आपणांस ठाऊक नसतें. पण यामुळें आपलें अंतःकरण मत्सरपूर्ण आहे, असें मात्र साऱ्या जगाला कळून येईल.

दांभिकपणांत दुर्गुणांपेक्षां मूर्खपणा च अधिक आहे. खरोखर प्रामाणिक होणें, हें देखील प्रामाणिक दिसण्या-इतकें च सुलभ आहे.

अपकाराबद्दल सूड घेण्यापेक्षां उपकाराविषयीं कृतज्ञ बुद्धि बाळगण्यास च अधिक तत्पर असावें; यामुळें लोक आपल्यावर अपकारापेक्षां उपकार च अधिक करतील.

तिरस्कार करण्याऐवजीं प्रेम करण्यास च अधिक झटावें, म्हणजे आपल्यावर लोक तिरस्कारापेक्षां प्रेम च अधिक करतील.

प्रशंसा करण्यास तत्पर असावें व निषेध करण्यांत मंदगति ठेवावी. असें केल्यानें आपल्या गुणांची प्रशंसा होईल व आपल्या अहितांच्या डोळ्यांना आपले दोष दिसणार नाहींत.

जेव्हां आपण एखादें कृत्य करूं तेव्हां वास्तविक तें चांगलें आहे म्हणून च करावें; लोक त्याबद्दल आपली स्तुति करतील म्हणून करूं नये. जेव्हां आपण एखाद्या गोष्टीचा त्याग करूं तेव्हां ती खरोखर वाईट आहे म्हणून च तिचा त्याग करावा; केवळ लोक तिच्याविरुद्ध बोलतात म्हणून त्याग करूं नये. प्रामाणिकपणावर

प्रेम असल्यामुळें च जर आपण प्रामाणिक झालों तर नेहमीं तसे च राहूं; तत्त्वाशिवाय जो कोणतें हि कृत्य करतो तो नेहमीं चंचल च असतो.

ज्यांना कांहीं समज नाहीं अशांकडून स्तुति होण्यापेक्षां बुद्धिमान् लोकांकडून निर्भत्सना झालेली बरी, हें विसरूं नये; कारण, ते जेव्हां आपल्याला एखादा दोष दाखवितात, तेव्हां तो आपल्याला सुधारतां येईल अशी त्यांची समजूत असते. परंतु असमंजस लोक जेव्हां आपली स्तुति करतात, तेव्हां ते आपल्याला स्वतःप्रमाणें च समजतात.

ज्याला आपण योग्य नाहीं त्या पदाचा स्वीकार करूं नये; नाहीं तर, त्या पदास योग्य अशीं माणसें आपला तिरस्कार करतील.

ज्या गोष्टीचें आपल्याला ज्ञान नाहीं, ती दुसऱ्याला शिकवूं नये; कारण, त्याला जर हें कळलें तर तो आपली निर्भत्सना करील.

ज्यानें आपल्याला अपाय केला असेल त्याच्या स्नेहाची अपेक्षा करूं नये. ज्याला अपाय झाला तो कदाचित् क्षमा करील; पण ज्यानें तो केला तो कधीं हि भला ठरणार नाहीं.

ज्याच्याशीं आपली मैत्री असावी असें आपल्याला वाटत असेल त्याच्यावर उपकारांचें मोठें ओझें लादूं नये. कारण, त्या ओझ्याची जाणीव च त्याची आपली ताटातूट करील हें लक्षांत ठेवावें. अल्प उपकारानें स्नेहांत बिघाड होतो; थोर उपकारापासून शत्रू उत्पन्न होतात.

तत्रापि कृतघ्नता हा कांहीं मनुष्याचा स्वाभाविक गुण नाहीं; तसा च त्याचा क्रोध हि अशम्य नाहीं. जें ऋण आपणांस फेडतां येणार नाहीं, त्याची आठवण दिली असतां आपणांस खपत नाहीं. आपण ज्याला अपाय केला असेल त्याच्या समोर उभें राहाण्याची आपणांस लाज वाटते.

तिऱ्हाइताचें भलें झालें तर त्याचा खेद मानूं नये. लोकांनीं आपल्याशीं अशा रीतीनें वागलेलें आपल्याला आवडेल काय ?

सर्वांचें प्रेम संपादण्याची आपली इच्छा असेल तर आपली परोपकारबुद्धि सार्वत्रिक असूं द्यावी. जर यामुळें तें प्रेम आपल्याला प्राप्त झालें नाहीं, तर मग तें इतर कोणत्या हि उपायांनीं मिळणार नाहीं;

आणि जरी तें आपणांस मिळालें नाहीं तरी निदान त्यास पात्र असल्याबद्दल आपल्याला अधिक आनंद होईल याची पूर्ण खात्री बाळगावी.

प्रकरण सातवें.

अहंकार.

अहंकार व नीचपणा हे परस्परविरोधी दिसतात; तरी पण मनुष्यप्राणी या विपरीत भावांची एक-वाक्यता करतो. सर्व प्राण्यांत एका च वेळीं तो अत्यंत दुःखी व अहंकारयुक्त असतो.

अहंकार हा बुद्धीच्या क्षयाचें कारण आहे. तो प्रमादाचा पोषक आहे. तरी पण बुद्धीचें व त्याचें पटत नाहीं असें नाहीं.

ज्याला आपली च बडेजाव वाटत नाहीं अथवा जो दुसऱ्याला तुच्छ समजत नाहीं, असा कोणी तरी आहे काय ? आपल्या अहंकाराच्या तडाख्यांतून ईश्वर —आपला उत्पन्नकर्ता—देखील जर सुटत नाहीं, तर मग त्यापासून आपल्याला निर्भयपणें कसें राहतां येईल ?

मूढ विश्वासाचें मूळ काय ? खोटी उपासना तरी कोठून उद्भवली ? आपल्या आटोक्याच्या बाहेरील

गोष्टींची वाटाघाट करण्याचा आव घालण्यापासून आणि अतर्क्याचा तर्क करण्यापासून च ना ?

आपली बुद्धि मर्यादित व दुर्बल आहे, तरी देखील तिच्या या अल्पबळाचा पाहिजे त्याप्रमाणें आपण उपयोग करीत नाहीं. ईश्वराचें माहात्म्य जाणण्यासाठीं आपण हवी तेवढी उंच भरारी मारीत नाहीं. परमेश्वराची उपासना करतांना आपल्या विचारांना आपण जरूर तेवढा स्वैरपणा देत नाहीं.

भूलोकच्या सम्राटाविषयीं थोडें देखील वाईट बोलण्यास जे भितात त्यांना ईश्वरी व्यवस्थेंत जरा देखील दोष काढण्याची भीति वाटत नाहीं. ईश्वराच्या न्यायाचें त्यांना विस्मरण पडतें; त्याच्या न्यायाची ते फेरतपासणी करतात.

राजपुत्राचें नांव—त्याला योग्य पदव्यांची व मानांची जोड दिल्याखेरीज—उच्चारण्यास जो धजत नाहीं, त्याला च आपल्या खोट्या कृत्यांबद्दल साक्षी राहण्यास आपल्या स्रष्ट्याचें नांव उच्चारण्याची शरम वाटत नाहीं.

न्यायाध्यक्षानें केलेलें शासन मनुष्य मुकाट्यानें ऐकून घेतो; पण अनंत ईश्वराशीं कज्जा करण्यास

त्याला धैर्य येतें. त्याला शांत करण्याचा तो प्रयत्न करतो, वायदे करून त्याची खुशामत करण्यास बघतो, त्याचें ऐकण्याविषयीं त्याच्याशीं अटी करतो; पण जर का आपली विनंति मान्य झाली नाहीं, तर त्याबद्दल तो कुरकुरतो व त्याच्याशीं भांडतो.

आपण अधर्मी असून हि आपणांस शिक्षा कां होत नाहीं ? कारण, हा दिवस कांहीं प्रतिकाराचा नव्हे.

ईश्वर आपल्याला शिक्षा करतो म्हणून त्याची प्रार्थना करण्याचें टाकूं नये. कारण, अशानें आपल्या च माथीं वेडेपणा येईल. आपल्या अधर्मामुळें दुसऱ्यास थोडें च दुःख होणार आहे ?

मी ईश्वराचा लाडका, अशी मनुष्यप्राणी व्यर्थ बढाई कां मारतो ? आणि इतक्यावर हि तो त्याचे आभार मानीत नाहीं—त्याची आराधना करीत नाहीं! त्याच्या या उद्धत समजुतीचा त्याच्या या अशा वागणुकीशीं मेळ तरी कसा घालावा ?

खरोखर पाहिलें असतां मनुष्यप्राणी या अनंत विश्वांत एक परमाणु आहे; तरी पण ही सगळी पृथ्वी व आकाश आपल्याचसाठीं निमार्ण झालें आहे, असें

त्याला वाटतें. तो समजतो कीं, निसर्गदेवतेची प्रत्येक घटना माझ्याचसाठीं आहे.

ज्याप्रमाणें जलपृष्ठभागावर अफाट क्षितिज, झाडें व गांवें प्रतिबिंबित होऊन नृत्य करतांना दिसलीं म्हणजे मूर्खाला तीं आपल्या च सुखाकरितां असें करतात म्हणून वाटतें, तद्वत च निसर्गाच्या ठराविक घडामोडी होत असतां मनुष्यप्राणी त्या आपल्या च डोळ्यांना सुख देण्यासाठीं होतात म्हणून समजतो. जेव्हां तो मौजेनें उन्हांत बसतो, तेव्हां तें आपल्या च उपयोगासाठीं आहे असें त्याला वाटतें. रात्रीं निर्मल आकाशांत चंद्र आपल्या ग्रहगणांसह विराजत असतांना हें सर्व आपल्या च सुखाकरतां आहे असें तो मानतो.

पण हा फाजील गर्व वाहणाऱ्या माणसानें जरा नम्र असायला हवें. या जगांतील घडामोड, उन्हाळ्याचा व हिंवाळ्याचा अनुक्रम वगैरे आपल्यासाठीं नाहीं हें त्यानें पक्कें लक्षांत ठेवावें. एक हि मनुष्यप्राणी जरी अस्तित्वांत नसला तरी त्यामुळें जगांत कोणचा हि फरक होणार नाहीं. त्यांतील असंख्य जीवांपैकीं तो हि एक आहे, एवढें च.

आपल्याला आतां काय अगदीं स्वर्ग लाभला असें समजूं नये. कारण, असें पहा कीं, देवदूत आपल्या हि पेक्षां उच्च आहेत. आपल्याबरोबर च या मर्त्यलोकांत वास करणाऱ्यांचा हि–ते आपल्यापेक्षां कमी दर्जाचे आहेत म्हणून–तिरस्कार करूं नये. ज्यानें आपल्याला उत्पन्न केलें त्यानें च त्यांना हि पण केलें आहे ना?

ज्या स्रष्ट्याच्या दयेनें आपण सुखी आहोंत, त्याच्या च इतर प्राण्यांस उच्छृंखल होऊन त्रास देऊं नये. कारण, त्यापासून उलट आपल्याला च त्रास होईल. आपल्याप्रमाणें ते हि त्या सर्वव्यापी ईश्वराची सेवा करतात ना? त्यानें सर्वांना सारखे च कायदे घालून दिले आहेत ना? त्यांच्या हि रक्षणाची त्याला काळजी नाहीं काय? आणि त्यांत बिघाड पाडण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे काय?

आपलें मत साऱ्या जगाहून निराळें असूं देऊं नये. आपल्या मताशीं जुळत नाहीं तें मत अगदीं च खोटें समजून त्याचा अनादर करूं नये. दुसऱ्याविषयीं ठराव करण्याचा आपल्याला कोणीं अधिकार दिला? अथवा निवड करण्याचा लोकांचा अधिकार तरी कोणीं काढून घेतला आहे काय?

हल्लीं ज्या सत्य म्हणून मानल्या जातात, अशा कित्येक गोष्टींचा एके काळीं अनादर झाला होता. ज्या हल्लीं सत्य म्हणून ठरल्या आहेत त्यांचा हि पुढें कदाचित् अनादर होईल; तेव्हां मनुष्यानें निश्चित असें तरी काय समजावें?

आपल्याला जें चांगलें वाटेल तें च करावें, म्हणजे सुख आपल्यापाशीं आपोआप च येईल. शहाणे होण्यापेक्षां सद्गुणी होणें हें च मनुष्याचें आद्य कर्तव्य होय.

आपल्याला जें समजत नाहीं त्यांत खरें व खोटें हीं दोन्हीं सारखीं च दिसतात ना? तेव्हां त्यांना ओळखण्याचा दुसरा कोणचा मार्ग आहे?

जें आपल्या आकलनशक्तीच्या अगदीं बाहेर आहे, त्यावर आपण सहज विश्वास ठेवतों, अथवा तें समजून घेऊन मग त्यावर आपण विश्वास ठेवतों असें दुसऱ्यांस भासविण्यांत आपल्याला फार फुशारकी वाटते; पण वास्तविक पहातां असें करणें मूर्खपणाचें व अहंकाराचें नाहीं काय?

धिटाईनें व प्रतिज्ञापूर्वक कोण बोलतो? दुराग्रहानें आपलें च मत खरें म्हणून कोण बरें समजतो? ज्याला अगदीं च ज्ञान नाहीं तो, किंवा ज्याला अहंकार आहे तो.

एकदा एखादें मत ठरलें म्हणजे तें च पुढें कायम ठेवावें, अशी प्रत्येकाची इच्छा असते; पण ही इच्छा अहंकारी मनुष्यांत बलवत्तर असते. स्वतः च तसें समजून त्याचें समाधान होत नाहीं, तर दुसऱ्यांनीं हि आपल्याप्रमाणें च समजावें म्हणून तो त्यांना आग्रह करतो.

पुरातनत्वानें सत्य प्रस्थापित होतें असें समजूं नये, किंवा पुष्कळशा लोकांना ती अशी वाटते म्हणून च एखाद्या गोष्टीला विश्वसनीय मानूं नये.

जर बुद्धीनें दोन गोष्टींतली तफावत दाखविली नाहीं, तर मग एकाचें मत दुसऱ्याच्या मताइतकें च महत्त्वाचें समजलें पाहिजे.

खण्ड तिसरा.

स्वपरविघातक मानवी मनोधर्म.

प्रकरण पहिलें.

लोभ.

द्रव्यावर आसक्ति ठेवण्याइतक्या योग्यतेचें तें नाहीं, म्हणून त्याबद्दल अनन्यचित्त होणें अगदीं अयोग्य होय.

मनुष्य जें कांहीं चांगलें म्हणून म्हणतो तें मिळण्याची इच्छा आणि तें प्राप्त झालें असतां त्यापासून होणारा आनंद हीं केवळ कल्पनामय असतात. तेव्हां ग्राम्य व प्राकृत जनांचें मत स्वीकारूं नये. वस्तूच्या मोलाची परीक्षा स्वतः करीत जावी, म्हणजे मनुष्य सहसा लोभी होणार नाहीं.

अमर्याद लोभ आत्म्याच्या प्रत्येक सद्धर्माचा नाश करतो. लोभाचा प्रादुर्भाव होतां च सगळे सद्गुण, सर्व प्रामाणिकपणा व सगळे स्वाभाविक मनोधर्म दूर पळून जातात. लोभी मनुष्य पैशासाठीं आपल्या अपत्यांचा देखील विकरा करितो. मातापितरांचा प्राण गेला तरी

सुद्धां तो आपल्या पैशाच्या पिशवीचें तोंड मोकळें करीत नाहीं; इतकें च नव्हे, तर पैशापुढें त्याला आपल्या सुखाची हि परवा नसते. सुखाचा शोध करण्यांत तो स्वतःला दुःखी मात्र करून घेतो.

द्रव्य मिळाल्यावर त्याचा उपभोग घेण्यांत आनंद मिळेल या आशेनें तें संपादन करण्यांत मुळीं च विसावा न घेतां कष्ट करणें, म्हणजे दुसरें एक घर सजविण्यासाठीं सामानसुमान खरेदी करण्याकरितां स्वतःचें घर विकण्याप्रमाणें होय.

लोभी मनुष्याचा आत्मा कृपण असतो; परंतु धन हें च सुखाचें साधन आहे असें जो मानीत नाहीं, तो धनप्राप्तीस्तव इतर कल्याणप्रद गोष्टींना कधीं हि दूर लोटणार नाहीं; आणि दारिद्र्य ही स्वाभाविक आपत्ति आहे असें समजून जो तिला भीत नाहीं, तो तिला टाळण्यासाठीं नसतीं दुःखें आपल्यामागें कदापि लावून घेणार नाहीं.

धनापेक्षां सद्गुण अधिक मूल्यवान् नाहींत काय? दारिद्र्यापेक्षां पाप नीचतर नाहीं काय? आपल्या गरजा भागविण्यापुरतें धन मिळाल्यानें तृप्त राहिलें म्हणजे, जो

गरजेपेक्षां अधिक सांठविण्याच्या भरीस पडतो त्याच्या क्लेशांकडे बघून आपल्याला हंसू च येईल !

सोनें नुसतें बघण्याच्या देखील योग्यतेचें नाहीं, म्हणून निसर्गदेवीनें त्याला पृथ्वीच्या अगदीं पोटांत लपवून ठेविलें आहे ! आपण जी जागा पायानें तुडवितों तेथें च खालीं तिनें रुपें पुरून ठेविलें आहे ! यावरून च सुवर्ण आपल्या आदराच्या योग्य नाहीं, रुपें हें लक्ष देण्याच्या लायकीचें नाहीं, असें च आपल्याला सांगण्याचा निसर्गदेवी चा उद्देश नव्हे काय ?

लोभानें आजपर्यंत लक्षावधि दुर्दैवी प्राण्यांना जमीनदोस्त केलें आहे. धनाच्या मागें लागणें म्हणजे, गुलामापेक्षां हि अधिक क्लेश देऊन उलट अपाय करणाऱ्या कठोर धन्यासाठीं व्यर्थ श्रम करणें होय.

जेथें खालीं धन असतें तेथील जमीन कळाहीन असते. पृथ्वीच्या पोटांत जेथें सुवर्ण आहे तेथें कोणती हि वनस्पति उगवत नाहीं; तेथें जनावरांना चारा मिळत नाहीं; तेथें धान्यांनीं भरलेलीं शेतें डुलतांना दिसत नाहींत; वृक्षांची हिरवीगार छाया तेथें आढळत नाहीं अगर फळें व फुलें मिळत नाहींत. याच-

प्रमाणें ज्याच्या हृदयाला धनतृष्णा लागून राहिली आहे त्याच्यांत कोणता हि चांगला मनोधर्म–सद्‌गुण–आढळत नाहीं.

धन हें शहाण्याचा गुलाम असतें; परंतु मूर्खाच्या अंत:करणावर मात्र त्याचें फार जुलमी वर्चस्व असतें. लोभी आपल्या धनाची चाकरी करतो; धन त्याची चाकरी करीत नाहीं. आजारी मनुष्य जसा त्या आजाराच्या स्वाधीन असतो, तसा लोभी मनुष्य धनाधीन असतो; पण उलट तें च धन त्याची तृष्णा वाढवून त्याला क्लेश देत असतें व मरेपर्यंत त्याचा पिच्छा सोडीत नाहीं.

सुवर्णानें आतांपावेतों कोट्यवधि प्राण्यांचा नाश केला नाहीं काय? त्यानें कोणाच्या हि सद्‌गुणांत कधीं तरी भर घातली आहे काय? नीचांच्या जवळ त्याची लयलूट असते ना? तर मग तें प्राप्त होऊन आपलें नांव व्हावें अशी आपल्याला काय म्हणून इच्छा व्हावी? ज्यांच्यापाशीं धन अगदीं च थोडें होतें ते ज्ञानी नव्हते काय? आणि ज्ञान म्हणजे च सुख नव्हे काय? निकृष्टतम माणसांना धनाचा बरा च मोठा भाग मिळालेला आपल्या दिसतो ना? आणि

याचा शेवट दुःखकारक च होतो ना? तर मग त्याच्या मार्गें आपण लागावें असें त्यांत काय आहे?

दरिद्र्याला पुष्कळशा गोष्टींची गरज असते; परंतु लोभी प्रत्येक गोष्ट नाकारतो. लोभ्याच्या हातून कोणाचें हि भलें होत नाहीं आणि तो स्वतःइतका कोणाशीं च निर्दयपणानें वागत नाहीं.

म्हणून, उद्योगानें धन संपादन करावें व उदार अंतःकरणानें त्याचा व्यय करावा; [जोडूनियां धन उत्तम व्यवहारें। उदास विचारें वेंच करी-तुकाराम.] आणि दुसऱ्याला सुखी करितांना मनुष्याला जसें सुख होतें तसें इतर केव्हां हि होत नाहीं, हें पकें लक्षांत ठेवून वाटल्यास त्याचा अनुभव घेऊन पहावा.

प्रकरण दुसरें.

अतिव्यय-उधळेपणा.

द्रव्यसंचयापेक्षां मोठें असें जर दुसरें कोणचें व्यसन असेल तर तें निरर्थक गोष्टींत त्याचा व्यय करणें हें होय.

अवश्यक वस्तूंमधून हि जें शिल्लक ठेविलें पाहिजे तें जो ठेवीत नाहीं, तो गोरगरिबांच्या नैसर्गिक हक्काची

चोरी करतो असें म्हणायला कांहीं हि हरकत नाहीं. जो आपलें धन उधळून टाकतो तो परोपकाराच्या साधनांना दूर लोटतो, आणि त्या साधनांच्या हातांत ज्या सद्गुणांचें पोषण आहे त्यांना हि तो पाठमोरा होतो असें च म्हटलें पाहिजे. स्वतःला सुखी करण्यापलिकडे त्या साधनांचा तो उपयोग करून घेत नाहीं.

द्रव्याच्या अभावीं सुखांत राहण्यापेक्षां द्रव्याची विपुलता असून देखील आनंदांत राहणें अधिक कठिण आहे. वैपुल्यापेक्षां दारिद्र्यांत च मनुष्यास अधिक सौकर्यानें आत्मसंयमन करतां येतें. दारिद्र्यांत धीर देण्यासाठीं सहिष्णुता या एका च गुणाची अवश्यकता असते; पण श्रीमंतींत दानधर्म, परिमितता, परोपकार, दूरदर्शीपणा वगैरे अनेक गुण नसले तर तो मनुष्य दोषी ठरतो. गरिबाला आपल्या स्वतःच्या च भल्याची काळजी असते; पण श्रीमंताला हजारों लोकांच्या सुखाकडे बघावें लागतें.

जो आपल्या पैशाचा शहाणपणानें व्यय करतो तो आपल्यावरील अनर्थांचा हि क्षय करतो; पण जो त्याचा नुसता संचय च करतो तो दुःखांचा हि पण सांठा करीत असतो.

अतिथि जें मागेल तें देण्याला अनमान करूं नये. आपल्याला ज्या वस्तूंची गरज लागते त्या आपल्या मानवी बंधूंनीं मागितल्या असतां 'नाहीं' म्हणूं नये. तसें च, ज्यांचा उपयोग करण्याचें आपल्याला ज्ञान नाहीं अशा लक्षावधि वस्तू जवळ असण्यापेक्षां, त्या दुसऱ्याला देऊन जवळ कांहीं नसण्यांत च विशेष सुख व थोरवी आहे हें विसरूं नये.

प्रकरण तिसरें.

सूड अथवा प्रत्यपकारबुद्धि.

सूडाचें मूळ आपल्या दौर्बल्यांत च असतें. जे अतिशय नीच व भित्रे असतात त्यांची च त्याकडे अधिक प्रवृत्ति असते. आपल्याला ज्यांचा तिरस्कार वाटतो अशांचा भेंकडाशिवाय कोण छळ करील? ज्यांना आपण लुबाडतो त्यांचा नामर्दावांचून कोण खून करील?

अपायाचा—इजेचा—अनुभव आल्यावर च मग सूडाची इच्छा उत्पन्न होते; परंतु जे महानुभाव आहेत ते 'मला अमक्यापासून पीडा होते,' असें कधीं हि म्हणत नाहींत, आणि म्हणून च त्यांना सूडाची इच्छा होत नाहीं.

जर दुसऱ्यानें दिलेली पीडा दुर्लक्ष करण्याजोगी असली तर मग तो पीडा देणारा च स्वतः दुर्लक्ष करण्यायोग्य ठरतो. आपल्यापेक्षां हलक्या दर्जाच्या माणसाबरोबर द्वंद्वयुद्ध करण्यास आपली तयारी असते काय ?

जो आपल्याला पीडा देण्याचा प्रयत्न करतो त्याची अवज्ञा करावी. जो आपल्या ठिकाणीं उद्वेग उत्पन्न करील त्याचा अवमान करावा. अशानें आपली शांति कायम राहील एवढें च नव्हे, तर कोणता हि विशेष उपाय न योजतां आपण त्याला शिक्षा केली असें होईल.

ज्याप्रमाणें वावटळीचा व मेघगर्जनेचा सूर्यमंडळावर अथवा नक्षत्रसमूहावर कांहीं च परिणाम होत नाहीं, पण त्यांचा सगळा क्षोभ खालीं असलेल्या खडकावर व वृक्षांवर आदळून नाहींसा होतो, त्याचप्रमाणें अपकार–पीडा–नरश्रेष्ठांच्या आत्म्यापर्यंत पोहोंचत नाहीं. परंतु जे अपकार–पीडा–करतात त्यांच्यावर च उलट आदळून त्यांचा लय होतो.

क्षुद्र चित्त सूडाची प्रेरणा करतें; पण उन्नत्त चित्त अपकारांचा तिरस्कार करतें; इतकें च नव्हे, तर जो त्याची शांतता भ्रष्ट करण्याचा विचार करतो त्याचें च तें उलट कल्याण करतें.

आपण सूडाची काय म्हणून इच्छा करतों? कोणत्या उद्देशानें आपण त्याला अनुसरतों? त्यामुळें आपल्या शत्रूला दुःख देण्याचा आपला विचार असतो काय? तर मग हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, त्याच्या तीव्र तापाचा आपल्याला च अनुभव येईल.

ज्याच्या अंतःकरणावर सूडानें आपला पगडा बसविला, त्याच्या अंतःकरणाला तो सारखा टोंचीत असतो; पण ज्याच्यासाठीं त्या सूडाची तयारी असते तो मात्र निश्चिंत असतो.

सूडाच्या इच्छेपासून च हृद्रोग लागतो, आणि म्हणून च तो अयोग्य होय. एवढ्याचसाठीं मनुष्यप्राण्यानें त्याचा उपयोग करावा–त्याची इच्छा करावी–अशी सृष्टिदेवीची मुळीं च इच्छा नाहीं. ज्याला आधीं च पीडा–अपाय–झाला आहे, त्याला अधिक क्लेशांची काय गरज? अथवा दुसऱ्यानें जे क्लेश त्याच्यावर लादले आहेत, त्यांत आपण आपल्या मूर्खपणानें आणखी भर घालावी काय?

स्वतःला जी आधीं च पीडा झाली आहे, तितक्यांत जो तृप्त नसेल तो च सूडाची इच्छा धरील. यामुळें जी शिक्षा दुसऱ्याला झाली पाहिजे तिची तो

आपल्या क्लेशांत भर घालतो; पण ज्याला अपाय करण्याची–ज्याचा सूड घेण्याची–त्याची इच्छा असते तो मात्र खुशाल चैनींत असतो; व उलट त्याच्या दुःखांत ही एक भर च पडली म्हणून आनंद मानतो.

आधीं सूडाचा नुसता विचार च फार क्लेशकारक असतो आणि मग तो अंमलांत आणतांना तर फार च भयंकर बनतो. मारणाऱ्याच्या विचाराप्रमाणें कुऱ्हाडीचा घाव नेमक्या जागीं क्वचित च बसतो; आणि मौज ही आहे कीं, ती कुऱ्हाड कदाचित् आपल्यावर च उलटेल हें त्या बिचाऱ्याच्या ध्यानांत येत नाहीं.

सूडाची इच्छा करणारा मनुष्य आपल्या शत्रूला अपाय करतांना कित्येक वेळां आपल्या स्वतःचा च नाश करून घेतो. आपल्या वैऱ्याचा एक डोळा फोडण्याचा बेत करीत असतां तो आपले दोन्ही डोळे फोडून घेतो. जर त्याला आपला सूड उगवितां आला तर मागून तो पश्चात्ताप पावतो.

आपल्या शत्रूच्या मृत्यूनें आपला द्वेष शांत होईल काय ? त्याला शांत केल्यानें आपल्याला शांति मिळेल काय ? आपल्याबद्दल शत्रूला दुःख द्यावें असें जर आपल्याला वाटलें, तर त्याचा पराजय करून त्याच्या-

वर दया करावी. कारण, मरणकाळीं तो आपली श्रेष्ठता मानीत नाहीं, अगर आपल्या क्रोधाचा प्रभाव हि अनुभवीत नाहीं.

सूड घ्यावयाचा च झाला तर सूड घेणाऱ्याचा विजय झाला पाहिजे, व ज्यानें अपाय केला असेल त्याला त्या सूड घेणाऱ्याच्या इतराजीची तीव्रता भासली पाहिजे; त्याला त्याबद्दल दुःख झालें पाहिजे—पश्चात्ताप वाटला पाहिजे. पण अशा प्रकारचा सूड क्रोधानें प्रेरित केलेला होय. त्यांत कांहीं मोठेपणा नाहीं. मनुष्याला जो अत्यंत श्रेष्ठ बनवील अशा प्रकारचा सूड म्हटला म्हणजे, तो ज्याचा घ्यावयाचा त्याच्याकडे दुर्लक्ष करणें हा च होय.

भेंकडपणामुळें च अपायाबद्दल खून पडतात. कारण, जो असा खून करतो त्याला अशी भीति वाटते कीं, आपला शत्रु जिवंत राहिला तर तो आपला सूड घेईल. मृत्यु हा भांडणाचा निकाल लावतो खरा; पण कीर्तीला कांहीं परत आणीत नाहीं. खून करणें हें खबरदारीचें कृत्य होय, शूरपणाचें नव्हे. तें निर्भयपणाचें असेल; परंतु यशस्कर खास नाहीं.

अपराधाबद्दल सूड घेण्याइतकें कांहीं च सोपें नाहीं; पण त्याबद्दल क्षमा करण्याइतकें आदरणीय हि दुसरें कृत्य नाहीं.

मनुष्याचा अत्यंत श्रेष्ठ विजय म्हटला म्हणजे स्वतः-वर मिळविलेला होय. अपराधाची अवहेलना करणें म्हणजे च अपराध्याचा सूड घेणें होय.

आपण सूडाचा विचार करतों तेव्हां दुसऱ्यानें केलेल्या पीडेबद्दल आपल्याला वाईट वाटतें, असें आपण एका प्रकारें कबूल करतो. जेव्हां आपण त्या-बद्दल कुरकुर करतों, तेव्हां तीमुळें आपल्याला इजा झाली हें आपण दाखवितों; पण अशानें आपल्या शत्रूच्या गर्वाला या जयाची जोड मात्र मिळते.

जिच्याबद्दल कांहीं वाटत नाहीं ती पीडा च नव्हे. तर मग जो त्या पीडेचा तिरस्कार करील तो सूड घेण्यास कधीं तरी प्रवृत्त होईल काय? जर पीडा सहन करणें अपमानाचें वाटत असेल तर त्यासाठीं अन्य उपाय आहे; आणि तो तिच्यावर जय संपा-दन करणें हा च होय.

उपकार करणाऱ्याशीं वैर करण्याची कोणाला हि लाज वाटेल. त्याच्या आत्म्याचें औन्नत्य—त्याच्या

मनाचा मोठेपणा—पाहून त्याला पीडा करण्याचे विचार जागच्या जागीं च विरघळून जातील.

अपराध जितका मोठा असेल, तितकें च त्याबद्दल क्षमा करण्यांत अधिक भूषण आहे; आणि सूड उगवणें जितकें न्याय्य असेल तितकें च त्याबद्दल दया दाखविणें अधिक गौरवार्ह होईल.

आपल्या स्वतःच्या बाबतींत न्यायाधीश होण्याचा आपल्याला हक्क आहे काय? खटल्यांत स्वतः पक्षकार असून त्याचा निकाल देण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. तेव्हां, आपलें कृत्य न्याय्य अथवा अन्याय्य, वाजवी अगर गैरवाजवी आहे हें प्रथम दुसऱ्यांनीं च ठरविलें पाहिजे.

प्रत्यपकारपरायणाचें भय वाटतें, आणि म्हणून च लोक त्याचा तिरस्कार करतात; परंतु ज्याच्या अंतःकरणांत दया व क्षमा आहे त्याला ते पूज्य मानतात. त्याच्या कृत्यांची स्तुति शाश्वत टिकते व सारें जग त्याच्यावर प्रेम करतें. म्हणून, सूडाची इच्छा सोडून अपकाराबद्दल क्षमा करण्यास च नेहमीं तयार असावें.

प्रकरण चवथें.

क्रूरता, द्वेष आणि मत्सर.

प्रत्यपकार तर गर्ह्य आहे च; पण क्रूरता ही त्याहून हि वाईट होय. तिच्यांत प्रत्यपकारांतील दोष आहेत; पण त्यांतील प्रकोपाची नुसती छाया देखील नाहीं. क्रूरता आपला स्वाभाविक धर्म नाहीं, म्हणून लोक तिचा त्याग करतात; त्यांना तिची लाज वाटते व तिला ते 'अमानुष' म्हणतात. तर मग ती कशी उत्पन्न होते? कोणत्या गोष्टीपासून तिचें अस्तित्व संभवतें? दरारा हा क्रूरतेचा पिता होय, व निराशा तिची आई होय.

वीर पुरुष आपल्या आड येणाऱ्यांवर तरवार उपसतो; पण तो शरण येतांक्षणीं च शांत होतो. शरणागताला लाथेखालीं तुडविण्यांत कांहीं मोठेपणा नाहीं. हलक्या प्राण्यांचा अवमान करणें हें सद्गुणाला संमत नाहीं. उद्धटाची रग जिरवून जे नम्र असतील त्यांच्यावर दया केली म्हणजे आपण जयाच्या शिखरावर आरूढ झालों च म्हणून समजावें.

हें ध्येय मिळविण्यास ज्याच्यापाशीं सद्गुण नसतात, इतक्या उच्च पदवीवर चढण्याचें ज्याच्यांत धैर्य नसतें,

तो च खुनाचा अवलंब करून विजय मिळवितो; कत्तल करून च तो राज्यपद मिळवितो. ज्याला सर्वां-ची च भिती वाटते, तो सर्वांवर च उलटतो. नेहमीं भय बाळगल्यामुळें च जुलमी लोक क्रूर असतात ना? जिवंत असतांना ज्याकडे नुसतें बघण्याचें हि ज्या कुत्र्याला धैर्य नसतें तो च त्याच्या शवाला खुशाल फाडून खातो! परंतु शिकारी कुत्रा ठार करीपर्यंत ज्याचा पाठलाग करतो, त्याला तो मेल्यानंतर मग फाडून खात नाहीं.

देशांतल्या देशांत होणाऱ्या लढायांत फार रक्त-पात होतो. कारण, त्यांत लढणारे लोक भित्रे असतात. गुप्त कट करणारे लोक खुनी असतात. कारण, मृत्यूंत सर्व मौन असतें. आपलें कृत्य उघडकीस येईल असें भयामुळें च त्यांना वाटतें ना?

आपण क्रूर नसावें असें ज्याला वाटत असेल त्यानें मत्सराचा आपल्याला स्पर्श देखील होऊं न देण्याची खबरदारी बाळगली पाहिजे.

प्रत्येक मनुष्याकडे दोन निराळ्या दृष्टींनीं बघतां येतें. एका दृष्टीनें तो आपल्याला त्रासदायक वाटेल, व दुसरीनें कमी कोपजनक भासेल. ज्यायोगें तो आप-

त्याला अगदीं च कमी त्रासदायक होईल अशा च दृष्टीनें त्याला बघावें, म्हणजे आपल्यापासून त्याला हि इजा होणार नाहीं.

आपल्या कल्याणाकडे जिचा उपयोग करून घेतां येणार नाहीं अशी एखादी तरी गोष्ट आहे काय? जी गोष्ट आपणाला अतिशय राग आणते, तिच्यांत मत्सरापेक्षां कुरकुरीचा च भाग अधिक असतो. आपण ज्याच्याबद्दल कुरकूर करतों, त्याच्याशीं आपला एकवेळ समेट होईल; परंतु ज्याचा आपण तिरस्कार करतों त्याचा प्राण घेतल्यावांचून आपलें समाधान होत नाहीं.

जर आपल्या फायद्याच्या आड कोणीं आलें तर एकदम रागानें लाल होऊं नये. आपल्या बुद्धीला भ्रंश झाला म्हणजे त्या फायद्यापेक्षां अधिक मोठ्या फायद्याला आपण मुकतों. आपलें उपरणें कोणीं चोरलें म्हणून रागानें आपला अंगरखा हि आपण फाडून टाकावा काय?

जेव्हां एखाद्याच्या मानसन्मानाचा आपल्याला हेवा वाटतो, जेव्हां त्याच्या पदव्या व वैभव आपल्याला कोप आणतात, तेव्हां, या गोष्टी त्याला कशा मिळाल्या याचा प्रथम शोध करावा; म्हणजे मग

आपल्या क्रोधाचें पर्यवसान दयेंत होईल. जर कोणी तें वैभव आपल्याला तितक्या च किंमतींत देऊं लागला, आणि जर आपणांत शहाणपणा असला तर आपण तें खात्रीनें नाकारूं.

पदव्यांचा मोबदला काय आर्जव च ना? मनुष्याला सत्ता तरी कशी मिळते? जो त्याच्या हातीं सत्ता देतो त्याचा गुलाम होऊन च ना? दुसऱ्याचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचें सामर्थ्य संपादण्यांत आपलें स्वतःचें स्वातंत्र्य गमवावें काय? अथवा असें जर कोणीं केलें तर त्याचा हेवा करावा काय? आपल्या वरिष्ठांपासून मोबदल्याशिवाय मनुष्याला कांहीं च मिळत नाहीं; आणि बहुधा तो मोबदला हि वाजवीपेक्षां अधिक नसतो काय? जगाची रूढि आपल्याला फिरवितां येईल काय? वस्तु व तिची किंमत हीं दोन्ही हि एकदम कधीं तरी मिळतील काय?

आपण जें स्वीकारणार नाहीं अशाचा ज्या अर्थीं आपल्याला हेवा वाटत नाहीं, त्या अर्थीं मत्सराचें—हेव्याचें—जें मूळ त्याचा च त्याग करावा; आणि क्रूरता-जनक जो हा प्रसंग त्याला आपल्या हृदयांत जागा च देऊं नये.

जर आपल्याला मानसन्मान मिळाला तर तो मिळविण्यासाठीं लागलेल्या किंमतीचा आपल्याला मत्सर वाटेल काय? सद्गुणांची किंमत काय आहे हें जर आपल्याला कळलें तर त्याचा मोबदला इतक्या नीचपणानें देणाऱ्याची आपल्याला कींव येणार नाहीं काय?

मनस्तापाशिवाय जेव्हां दुसऱ्याचें भलें सोसण्यास आपण शिकूं, तेव्हां त्यांना सुख झालेलें ऐकून आपल्याला खरा आनंद होईल. योग्य व पात्र माणसांना चांगल्या गोष्टी मिळालेल्या बघून आपल्याला संतोष वाटेल. कारण, गुणी जनांचा उत्कर्ष झाला असतां सद्गुणी माणसांना सुख होतें.

ज्याला दुसऱ्याचें सुख बघून संतोष वाटतो तो त्यामुळें आपल्या स्वतःच्या हि सुखांत भर घालतो.

प्रकरण पांचवें.

हृदयक्षोभ व विषण्णता.

आनंदी जीव बघून च दुःखी प्राण्याच्या चेहऱ्यावर स्मित पसरतें; पण उदासीनाची विषण्णता पाहून आनंदी माणसाचा हि तजेला लोपून जातो.

औदासीन्याचें–विषण्णतेचें–मूळ आत्म्याच्या क्षीणतेंत च सांपडेल. अंगांत हिंमत असल्यामुळें च औदासीन्याला बळ येतें. नेटानें झुंजण्यास तयार झालों तर तिला वार करण्यापूर्वीं च विषण्णता आपल्यापासून दूर पळून जाईल. आपल्या मानवी बंधूंची ती वैरीण आहे, म्हणून तिला आपल्या अंतःकरणांतून घालवून लावावें; आपल्या संसारसुखांत ती विष कालविते, म्हणून आपल्या राहण्याच्या जागीं तिला येऊं देऊं नये.

एका काडीचें जरी नुकसान झालें, तरी सर्व ऐश्वर्याचा नाश झाला असें ती आपल्याला भासविते. महत्त्वाच्या गोष्टींकडून आपलें लक्ष ओढून अगदीं क्षुल्लक बाबतीबद्दल ती आपल्या आत्म्याला पीडा देते. गाफलपणाच्या पडद्यानें आपल्या सद्गुणांना ती झांकून टाकते. आपल्या सद्गुणांमुळें जे आपला गौरव करतील अशांपासून ती त्या सद्गुणांना लपवून ठेवते; आणि जेव्हां त्यांचा उपयोग करण्याची आपल्याला गरज असते, तेव्हां त्यांच्यांत घोंटाळा माजवून त्यांना वर डोकें करूं देत नाहीं. अरिष्टांना आमंत्रण करून ती आपल्याला जाच करते, व त्यांना दूर झुगारून

देण्याचा जर आपण विचार केला तर आपले हात ती बांधून टाकते.

जें कांहीं नीच आहे त्याला टाळा द्यावा, जें नामर्दपणाचें आहे त्याचा तिरस्कार करावा, व जें अन्यायाचें आहे त्याला आपल्या हृदयांतून घालवून द्यावें, असें ज्याला वाटत असेल, त्यानें विषण्णतेला आपल्या अंतःकरणावर पगडा बसवूं देऊं नये. औदासीन्याला पुण्यशीलतेचें रूप धारण करूं देऊं नये. त्यानें आणलेल्या शहाणपणाच्या सोंगाला भुलूं नये. धर्म आपल्या स्रष्ट्याची स्तुति करतो, म्हणून त्या धर्माला औदासीन्याच्या छायेनें व्याप्त करूं नये.

क्लेशावांचून मनुष्यानें काय म्हणून उदास रहावें? आनंदाचीं कारणें नाहींशीं झाल्याशिवाय मनुष्यानें आनंदाचा काय म्हणून त्याग करावा? दुःखी होण्यासाठीं च हें असें करणें नव्हे काय?

मोलानें रडावयास लावलेला जसा उदास दिसतो, किंवा पैसे मिळतात म्हणून जसा एखादा अश्रू ढाळतो, तद्वत च आपल्या अंतःकरणाला उदास होऊं देणाऱ्याची स्थिति असते. त्याला कांहीं होत

असतें म्हणून तो दुःखी असतो असें नाहीं, तर तो उदास असतो म्हणून च दुःखी असतो !

एखाद्या विवक्षित कारणामुळें च दुःख होतें असें नाहीं. ज्या गोष्टीपासून एकाला दुःख होतें, त्या च गोष्टीपासून दुसऱ्याला आनंद होतो.

शोक करून कांहीं वस्तुस्थिति बदलत नाहीं; तेव्हां, शोक करणें हें मूर्खपणाचें आहे असें च सगळे-जण म्हणतात. जो शांतपणानें आपल्यावरील अरिष्ट सोसतो, त्याची लोक स्तुति करतात; धैर्यानें जो संक-टांस तोंड देतो, त्याची ते प्रशंसा करतात. पण त्यांत काय अर्थ ? नुसत्या शब्दांनीं नव्हे, तर अनुकरणानें च स्तुति–प्रशंसा–केली पाहिजे.

शोक करणें निसर्गविरुद्ध आहे. कारण, त्यामुळें नैसर्गिक व्यवहारांत बाध येतो. जात्या च जें चांगलें आहे, तें हि त्यामुळें नीरस होतें.

ज्याप्रमाणें झंझावातानें वृक्ष उन्मूळून पडतो व पुन्हां आपलें डोकें वर करीत नाहीं, त्याचप्रमाणें औदासीन्याच्या जोरानें अंतःकरण दडपून जातें, व पुन्हां त्याचें बळ त्यांत परत येत नाहीं. पर्वताच्या

बाजूवर पर्जन्यधारा पडल्या असतां ज्याप्रमाणें त्यावरील बर्फ वितळून जातें, त्याचप्रमाणें अश्रुधारांनीं गालांवरील सौंदर्य धुऊन जातें; आणि या दोहोंपैकीं कोणी हि कधीं च आपल्या पूर्वस्थानाप्रत पावत नाहीं. ज्याप्रमाणें आसवांत मोतीं टाकलें म्हणजे प्रथम तें नुसतें झांकून जातें, आणि नंतर विरघळून नाहींसें होतें, त्याचप्रमाणें आपल्या सौख्याची व्यवस्था होते. अंतःकरणाच्या विषण्णतेखालीं जरी तें प्रथम झांकून गेल्यासारखें दिसतें, तरी शेवटीं ती विषण्णता त्याला गिळून टाकते.

कोठें हि उदास माणसाकडे पहा! भर रस्त्यांत पहा, विश्रांतीच्या जागीं पहा. तो सर्वांना टाळा देतो व त्याच्याकडे हि कोणी बघत नाहीं. देंठ तोडलेल्या फुलाप्रमाणें त्याचें तोंड खालीं असतें. त्याच्या तोंडून शब्द देखील निघत नाहीं. समाजाविषयीं त्याच्या मनांत प्रेम वसत नाहीं, आणि त्याला त्याचें कारण विचारलें तर तें त्याला ठाऊक नसतें. आपल्याला काय होतें हें च त्याला कळत नाहीं. त्याच्या बलाचा क्षय होऊन तो नाश पावतो, व मग "त्याचें काय झालें हो?" असें सुद्धां कोणी विचारीत नाहीं.

ईश्वरानें मनुष्यप्राण्याला दयेनें उत्पन्न केलें आहे. तो सुखी नसावा अशी जर त्याची इच्छा असती तर त्यानें त्याला उत्पन्न च केलें नसतें. तेव्हां, त्या सर्व-शक्तिमान् प्रभूच्या इच्छेआड येण्याचें मनुष्याला धैर्य तरी कसें होतें?

जेव्हां तूं स्वतः निर्दोषी असून सुख भोगीत किंवा मानीत असतोस तेव्हां च तूं ईश्वराला बहुमान देतोस. असंतुष्ट रहाण्यानें त्याच्यासंबंधीं केवळ तक्रारखोर-पणाच्या दोषाशिवाय तुझ्या पदरीं काय पडणार?

ईश्वरानें सर्व वस्तू परिवर्तनशील बनविल्या आहेत. मग त्यांत परिवर्तन झालें असतां काय म्हणून शोक करावा? जर निसर्गदेवीचे कायदे आपणांस माहीत आहेत, तर त्यांबद्दल कुरकूर कां करावी? पळघडी आपली खात्री पटत असून हि जें आपणांस दिसत नाहीं, त्याबद्दल आपल्या स्वतःच्या आंधळेपणाखेरीज दुसऱ्या कोणास दोष देतां येईल काय?

आपण कांहीं जगाला कायदे घालून देणारे नाहीं! ते जसे असतील त्याप्रमाणें च आपल्याला वागलें पाहिजे. तेव्हां त्यांबद्दल निराश होऊन शोक करणें, म्हणजे आपल्या च दुःखांत भर घालणें होय.

वरवरच्या डामडौलाला फसूं नये; अगर शोक केल्यानें दुर्दैवाचे घाव भरून निघतील असें मानूं नये. शोक हें एक उपायाचें पांघरूण घेतलेलें विष होय. वरून तो आपल्या हृदयांतील दुःखाचें शल्य उपटून काढतांना दिसतो खरा; परंतु वास्तविक तो त्याला अधिकाधिक खोल रुतवीत च असतो.

खेदामुळें जेव्हां आपण आपल्या आप्तमित्रांपासून दूर राहतों, तेव्हां त्यांच्याशीं बोलण्यास आपण लायक नाहीं असें च ठरतें. शोकामुळें आपण जेव्हां एकांतवास पत्करतो, तेव्हां आपल्याला च तोंड दाखवावयाची लाज वाटते, असें च होत नाहीं काय?

दुर्दैवाचे घाव सहन करणें हा आपला स्वाभाविक धर्म नाहीं; म्हणून, मर्दपणानें संकटांना तोंड देणें हें च आपलें कर्तव्य होय. परंतु आपल्यांत मर्दुमकी आहे, हें आपल्याला प्रथम कळलें पाहिजे.

आपल्या सद्गुणांचा नाश झाला नाहीं तरी आपल्या नेत्रांतून क्वचित् अश्रू बाहेर निघतील; परंतु ते योग्य कारणाशिवाय व वाजवीपेक्षां अधिक न निघतील याबद्दल काळजी घेतली पाहिजे.

अश्रुप्रवाहावरून दुःखाचें प्रमाण ठरवितां येत नाहीं. ज्याप्रमाणें आनंदातिशय झाला असतां तोंडांतून शब्द निघत नाहींत, त्याचप्रमाणें दुःखातिरेकाचें चिन्ह हि स्पष्टपणें दिसून येत नाहीं.

आपल्याला दुर्बल करणारें दुःखाप्रमाणें दुसरें कांहीं च नाहीं. आपणाला खेदाइतका कोण विषण्ण करील ? दुःखी मनुष्य महत्कार्य करण्यास तयार असतो काय ? किंवा सद्गुणाची बाजू राखण्यासाठीं तो सज्ज होईल काय ? म्हणून ज्यापासून कांहींएक फायदा होणार नाहीं अशा संकटांत पडूं नये, व जें मूळांत च वाईट आहे, त्यासाठीं चांगल्याचीं साधनें खर्चीं घालूं नयेत.

खण्ड चवथा.

मनुष्यास स्वजातीयांवर मिळवितां येण्याजोगे लाभ.

प्रकरण पहिलें.

प्रतिष्ठा.

औदार्य हें आत्म्याशिवाय इतरत्र वास करीत नाहीं. खरी प्रतिष्ठा सद्गुणाखेरीज अन्यत्र कोठें हि सांपडणार नाहीं.

दुर्गुणानें बऱ्या लोकांची मर्जी संपादतां येईल, व द्रव्याच्या साहाय्यानें अधिकार व पदव्या मिळवितां येतील; परंतु त्यांत कांहीं खरी प्रतिष्ठा नाहीं. पापकर्मांनीं मनुष्य कांहीं खऱ्या वैभवाला चढत नाहीं. तसें च मनुष्याला उदार करण्याची सुवर्णाच्या हि अंगीं शक्ति नाहीं.

जेव्हां सद्गुणांसाठीं पदव्या मिळतात, जेव्हां देशभक्तांचा गौरव होतो, तेव्हां ज्यांचा गौरव झाला आहे त्यांच्याप्रमाणें च गौरव करणाऱ्यास हि भूषण प्राप्त होतें; आणि यामुळें सर्व जगताचें कल्याण होतें.

ज्याचें कारण लोकांस माहीत नाहीं अशासाठीं आपला गौरव व्हावा, किंवा आपला मोठेपणा पाहून मग " याचें कारण काय ? " असें लोकांनीं विचारावें असें आपल्याला वाटतें काय ?

जेव्हां पराक्रमी लोकांचे गुण त्यांच्या संततींत उतरतात तेव्हां च त्यांच्या पदव्या तीस शोभतात. परंतु ज्यांना पदव्या प्राप्त झाल्या आहेत ते—ज्यांना त्या वस्तुतः योग्य आहेत—त्यांच्यासारखे नसतात, तेव्हां लोक त्यांना परिभ्रष्ट—क्षीणपुण्य—म्हणत नाहींत काय ? परंपरागत प्रतिष्ठा लोकांत अत्यंत श्रेष्ठ मानतात; परंतु ज्ञाते ज्यानें ती मिळविली त्याची च स्तुति करतात.

जो स्वतःच्या अंगीं पात्रता नसतां आपला मोठेपणा दाखविण्यासाठीं पूर्वजांच्या कृतीचा आश्रय करतो, तो चोरी केल्यावर रक्षणासाठीं देवालयाचा आश्रय घेणाऱ्या चोराप्रमाणें होय. पितरांना दिसत होतें, याचा या आंधळ्याला काय फायदा ? पितामह मोठा वक्ता होता, म्हणून त्यांत मुक्या नातवाला काय लाभ ? त्याचप्रमाणें पूर्वज थोर होते याचें, जो नीच आहे त्याला काय भूषण ?

सद्गुणाकडे प्रवृत्ति असली तर मनुष्याला थोरवी

मिळते, व पदव्यांशिवाय हि तो प्राकृतांपेक्षां अधिक गौरवार्ह बनतो. तो स्वतः प्रतिष्ठा संपादन करतो; पण कित्येकांना ती आयती च मिळते. अशांना "ज्यांच्या कुलांत उत्पन्न झाल्यामुळें तुम्ही अनायासें च प्रतिष्ठित बनलांत ते पुरुष माझ्याचसारखे होते" असें तो म्हणणार नाहीं काय?

जशी वस्तूमागें छाया असते, तद्वत च खरी प्रतिष्ठा सद्गुणाला अनुसरते. प्रतिष्ठा साहसानें लाभते, जीव धोक्यांत घालून च ती मिळवावी लागते, असें समजूं नये. जीवितांचें साफल्य कर्मावर नसून त्याच्या प्रकारावर अवलंबून असतें.

राष्ट्ररूपी जहाजाचें सुकाणूं सांभाळण्याची पाळी सर्वांवर च येत नाहीं; तसें च त्याच्या सैन्याचें आधिपत्य हि प्रत्येकाला मिळत नाहीं. म्हणून, जें काम आपल्या वांट्यास येईल तें नीट रीतीनें बजाविलें म्हणजे आपली सहज च प्रशंसा होईल.

कीर्ति मिळविण्यासाठीं विघ्नांवर जय मिळविणें अगर कष्ट सोसणें व संकटांना तोंड देणें अवश्यक च आहे असें समजूं नये. पवित्र पतिव्रतेची स्तुति होत नाहीं काय? प्रामाणिक मनुष्य गौरवार्ह नाहीं काय?

कीर्तीची तृषा प्रबळ असते; प्रतिष्ठेची इच्छा बलवत्तर असते. ज्यानें त्या आपणांस दिल्या त्यानें त्या फार महत्त्वाच्या उद्देशानें दिल्या आहेत. जेव्हां समाजहितासाठीं धाडसाचीं कृत्यें अवश्यक असतील, जेव्हां स्वदेशाच्या कल्याणार्थ आपला जीव धोक्यांत घालण्याची पाळी येईल, त्या वेळीं महत्त्वाकांक्षेखेरीज सद्गुणांना कोण उत्तेजित करील?

थोर मनाच्या मनुष्याला गौरव झाल्याचा आनंद होत नाहीं; पण त्या गौरवाला आपण योग्य आहोंत याचा च त्याला मोठा अभिमान वाटतो.

" अमक्या मनुष्याचा पुतळा कां केला?" असें लोकांनीं म्हणण्यापेक्षां " अमक्याचा कां केला नाहीं?" असें म्हणणें अधिक बरें नव्हे काय?

महत्त्वाकांक्षी मनुष्य गर्दींत अगोदर शिरतो, धक्काबुक्की करीत तो पुढें घसतो, मागें बघत देखील नाहीं. आपल्या मागें हजारों लोक राहिले आहेत या गोष्टीपासून होणाऱ्या आनंदापेक्षां आपल्यापुढें जर एखादा मनुष्य दिसला तर त्यापासून त्याला फार दुःख होतें.

महत्त्वाकांक्षेचें मूळ प्रत्येकांत असतें; पण सर्व च ठिकाणीं तें व्यक्त होत नाहीं. कांहीं जागीं त्याला भय

दडपून टाकतें व कित्येक ठिकाणीं त्याला विनय वर डोकें करूं देत नाहीं. महत्त्वाकांक्षा आत्म्याचें अंतर्वस्त्र होय. जडदेहाशीं संबंध होण्याबरोबर तो तें धारण करतो व त्याचा संबंध सुटण्याचे वेळीं—अगदीं शेवटीं—तें उतरतो. जर महत्त्वाकांक्षेचा योग्य उपयोग केला तर ती आपल्या प्रकृतीला भूषणास्पद होईल, व जर तिचा दुरुपयोग केला तर ती अपकीर्ति करून शिवाय आपला नाश करील.

विश्वासघातक्याच्या हृदयांत महत्त्वाकांक्षा लपून असते; तिच्या पदराखालीं दांभिकता आपलें तोंड झांकते, व मायावीपणा बुद्धिपुरःसर त्याला गोड भाषण शिकवितो. तरी पण अखेर खरें काय हें जगांत कळून येतें च येतें.

जो खरा सद्गुणी आहे तो केवळ सद्गुणासाठीं च म्हणून सद्गुणावर प्रेम करतो; व महत्त्वाकांक्षा जिच्यामागें लागली आहे अशा प्रशंसेचा त्याला तिटकारा असतो. जर दुसऱ्याच्या प्रशंसेखेरीज सद्गुणी माणसाला सुखी होतां आलें नसतें तर त्याची किती तरी शोचनीय स्थिति झाली असती ? पण छे! त्याचें मन इतकें थोर असतें कीं, तो फळाची इच्छा करीत

नाहीं; व जेवढें मिळूं शकेल त्याहून अधिकाची हाव धरीत नाहीं.

सूर्य जसा वर चढत जातो तसतशी सावली लहान-लहान होत जाते, त्याचप्रमाणें सद्गुण जितका श्रेष्ठ तितका सद्गुणी मनुष्य प्रशंसेबद्दल उदास असतो! तथापि गौरवामुळें मिळणारें बक्षीस कांहीं त्याला टाकतां येत नाहीं.

छायेप्रमाणें कीर्ति पाठलाग करणाऱ्यापुढें धांवते; परंतु जो तिच्यापासून दूर पळूं पाहील त्याच्या ती मागें लागते. जर पात्रतेंवांचून तिला मिळविण्याचा प्रयत्न केला, तर ती कदापि प्राप्त होणार नाहीं. पण अंगीं योग्यता असल्यावर आपण जरी लपूं लागलों तरी देखील ती आपला पिच्छा सोडणार नाहीं.

म्हणून, जें कीर्तिप्रद असेल त्याच्या मागें लागावें, जें न्याय्य असेल तें करावें. आणि मग आपली योग्यता न जाणणाऱ्या कोट्यवधि लोकांच्या जयघोषा-पेक्षां आपली सदसद्विवेकबुद्धि ज्याचें अभिनंदन करील त्यापासून च आपल्याला अधिक हर्ष होईल.

प्रकरण दुसरें.

ज्ञान व विज्ञान.

ईश्वरानें निर्माण केलेल्या सर्व वस्तूंचा अभ्यास करणें हें एक महत्कृत्य होय. सृष्ट वस्तूंच्या ज्ञानानें ज्याला हर्ष होतो, त्याला प्रत्येक वस्तु ईश्वराची साक्ष पटवीत असते; व ही साक्ष पटविणारी प्रत्येक वस्तु त्याचे ठिकाणीं भक्ति उत्पन्न करते.

मग पळ-घडी त्याचें मन स्वर्गीय गोष्टींचा विचार करीत असतें; आणि त्याचें सगळें जीवित भक्तिपूर्ण होतें. त्यानें जर आकाशाकडे पाहिलें, तर तेथें अनंत चमत्कार भरले आहेत असें त्याला आढळून येतें. पृथ्वीवरील अगदीं क्षुद्र कीटकाकडे पाहिलें तरी ईश्वरावांचून कोणास हि याला बनवितां आलें नसतें, याबद्दल त्याची बालंबाल खात्री होते.

ग्रहगण आपापल्या कक्षेंत नियमित गतीनें फिरतो, सूर्य आपल्या स्थानीं स्थिर असतो, धूमकेतु पातळ वातावरणांतून भ्रमण करून पुन्हां आपल्या मार्गावर येतो. तेव्हां या सगळ्यांना ईश्वराशिवाय कोणीं बनविलें असेल ? त्यांना कायदे घालून देण्यास अनंत ज्ञाना-

शिवाय काय समर्थ आहे? कोण भयंकर हें त्यांचें तेज! तरी हि त्यांचा कधीं च क्षय होत नाहीं. त्यांची गति तरी किती वेगयुक्त आहे! तरी सुद्धां परस्परांची कधीं हि टक्कर होत नाहीं!

पृथ्वीकडे पहा, आणि तिच्यापासून काय काय उत्पन्न होतें ह्याचा विचार करा. तिच्या उदरांत अंमळ डोकावून काय आहे तें पहा. त्यांत चातुर्य व सामर्थ्य दिसून येत नाहीं काय? गवताला उगवण्याची आज्ञा कोण करतो? योग्य वेळीं त्याला पाणी कोण देतो? बैल तें खातो, व घोडे आणि मेंढरें त्यांवर उपजीविका करतात. त्यांच्यासाठीं कोण बरें तें उत्पन्न करतो? पेरलेलें धान्य अनेकपट कोण करतो? मूठभराच्या मोबदल्यांत खंडोगणती कोण देतो? आपल्याकरितां प्रत्येक ऋतूंत निरनिराळीं फळें व फुलें कोण निर्माण करतो?

क्षुद्र माशीस तरी आपल्या स्वतःस उत्पन्न करतां येईल काय? अथवा ईश्वरापेक्षां आपण किंचित् जरी कमी असतों, तरी देखील ती आपल्याला बनवितां आली असती काय?

पशूंस आपण जिवंत आहोंत हें कळतें; पण त्यांना याचें आश्चर्य वाटत नाहीं. त्यांना जिवंत राहण्यांत

मौज वाटते; पण त्या जीविताचा कधींकाळीं अंत होईल हें त्यांना कळत नाहीं. परंपरेनें सर्व प्राणी आपापला मार्ग आक्रमण करितात, व हजारों पिढ्या झाल्या तरी सुद्धां एक हि जाति नामशेष होत नाहीं.

प्रत्येक भागाप्रमाणें च सर्व जग ज्याला प्रशंसनीय दिसतें, त्याला प्रत्येक गोष्टींत विधात्याचें ऐश्वर्य शोधून काढण्यापलीकडे आपल्या दृष्टीचा अधिक चांगला उपयोग करितां येईल काय ?

प्रत्येक वस्तूच्या घटनेंत विधात्याचें सामर्थ्य व दया हीं दिसून येतात. तिच्यासाठीं घालून दिलेल्या कायद्यांत नीति व सौजन्य भासमान होतें. प्रत्येकीस निरनिराळ्या रीतीनें सुख मिळतें, व एक दुसरीचा हेवा करीत नाहीं.

याच्यापुढें भाषेच्या अभ्यासाची थोरवी कितीशी आहे ? सृष्टींतील वस्तूंचा अभ्यास करण्यापेक्षां दुसऱ्या कोणत्या शास्त्रांत जास्त ज्ञान आहे ?

आधीं या घटनेचें कौतुक केल्यावर मग तिच्या उपयोगाचा शोध करावा. जिच्यापासून आपलें भलें होणार नाहीं अशी एक हि वस्तु ह्या पृथ्वीवर नाहीं हें लक्षांत ठेवावें. अन्न, वस्त्र व रोग बरे करण्याचीं

साधनें हीं सगळीं पृथ्वीपासून च उत्पन्न होतात ना?

हें जाणणाऱ्यापरता दुसरा कोण शहाणा आहे? जो याबद्दलचा विचार करतो त्याला बुद्धि आहे असें म्हणावें. ज्या शास्त्रांचा अतिशय उपयोग आहे, ज्या ज्ञानांत गर्वाला फार च थोडा अवकाश आहे, त्यांची च आधीं निवड करावी; व आपल्या जातिबांधवांच्या हिताकडे त्यांचा उपयोग करावा.

जगणें व मरणें, हुकूम करणें आणि आज्ञा पाळणें, कृति करणें व परिणाम सोसणें—याची च काय ती काळजी आहे ना? नीति हें सर्व शिकवील. **संसार-शास्त्र** हें सगळें दाखवील.

हें सर्व प्रत्येकाच्या हृत्पटलावर लिहिलेलें आहे. त्याला फक्त त्याची आठवण च काय ती द्यायला हवी. तें ध्यानांत राखणें सोपें आहे; सावधगिरी ठेविली म्हणजे त्याला राखून ठेवितां येईल.

इतर सर्व शास्त्रें व्यर्थ आहेत. इतर सगळें ज्ञान केवळ वल्गना होय. मानवी जीवितांत त्यांची जरूर नाहीं, व त्यांत त्यांचा उपयोग हि नाहीं. त्यांपासून मनुष्याचें कांहीं अधिक भलें होत नाहीं, अगर तो अधिक प्रामाणिक हि बनत नाहीं.

ईश्वराची भक्ति व सजातीय प्राण्यांविषयीं परोपकारबुद्धि हीं च आपलीं मुख्य कर्तव्यें नाहींत काय? त्यानें निर्माण केलेल्या वस्तूंच्या अभ्यासावांचून दुसरें कोण बरें ती भक्ति आपल्याला शिकवील? आपल्या पराधीनतेच्या ज्ञानावांचून इतर कोण आपल्याला परोपकाराचा धडा देईल?

खण्ड पांचवा.

स्वाभाविक योगायोग.

प्रकरण पहिलें.

संपत्काल व विपत्काल.

उत्कर्ष झाला असतां आपल्या हृदयास हर्षानें फुगूं देऊं नये; किंवा दैव अनुकूल नाहीं म्हणून आपल्या जीवास शोकगर्तेत ढकलूं नये. संपत्कालाचें सुख शाश्वतचें नसतें, म्हणून त्यावर आपली भिस्त ठेवूं नये. व विपत्कालाची वांकडी नजर नेहमीं च कांहीं टिकत नाहीं, म्हणून आशेपासून सोशीकपणाचा धडा घ्यावा.

विपत्ति धैर्यानें सहन करणें कठिण आहे हें खरें; परंतु भरभराटींत नेमस्तपणा राखणें ही शहाणपणाची अत्युच्च पायरी होय.

कल्याण व अकल्याण हीं स्थैर्याच्या परीक्षेचीं साधनें होत. यांच्याशिवाय आपल्या आत्म्याचें सामर्थ्य इतर कशानें हि कळून येत नाहीं. म्हणून, हीं प्राप्त झालीं असतां फार सावधागिरीनें वागलें पाहिजे.

भाग्यदशेकडे पाहिलें तर ती आपल्याशीं अगदीं गोडीगुलाबी करितांना दिसेल. आपली शक्ति व जोम ती किती न कळत चोरून नेते! दुःस्थितींत जरी आपण अचल असलों, आपत्कालीं जरी आपण अजिंक्य असलों, तरी हि आपण भाग्यदशेला हार जातों च जातों; आणि आपली शक्ति पुन्हां परत येणार नाहीं, तथापि तिची आपल्याला पुन्हां केव्हां तरी गरज लागेल, हें आपल्या ध्यानांत रहात नाहीं.

आपत्कालीं आपल्या शत्रूच्या हृदयाला देखील पाझर फुटतो. आपलें सुख व विजय हीं आपल्या मित्रांत देखील हेवा उत्पन्न करितात.

सत्कृत्यांचें मूळ आपत्तींत आहे असें च नाहीं. तथापि आपत्ति ही शौर्याची व धैर्याची धात्री होय.

आपल्यापाशीं पुरेसें असल्यावर अधिक मिळविण्या-साठीं आपल्यावर संकट कोण ओढून आणील? सुखांत असून हि आपला जीव धोक्यांत कोण घालील?

खरा सद्गुणी मनुष्य वाटेल ती परिस्थिति असली तरी देखील आपलें कर्तव्य करीत राहतो. परंतु योगा-योग जुळून आल्यावांचून लोकांना त्याचे परिणाम कळून येत नाहींत.

आपत्कालीं दुसऱ्यांनीं आपला त्याग केला आहे असें मनुष्याला आढळून येतें. आपली सारी भिस्त स्वतःवर च आहे हें त्यास तेव्हां च कळतें, आणि मग तो जागृत होऊन संकटांना धैर्यानें तोंड देऊन दूर करितो.

भरभराट असली म्हणजे आपण सुरक्षित आहों असें मनुष्य समजतो. आपल्या भोंवतीं असणाऱ्या साऱ्याजणांचे आपण आवडते आहोंत असें त्याला वाटतें, त्यामुळें तो निष्काळजी व ढिला बनतो. आपल्या-पुढील संकट त्याला दिसत नाहीं. तो दुसऱ्यांवर विश्वसून राहतो, आणि शेवटीं ते च त्याला दगा देतात.

आपत्कालीं प्रत्येक मनुष्यास बुद्धिवाद सांगतां येतो; परंतु भाग्यदशा त्याच्या डोळ्यांत धूळ टाकून, त्याला

खरें काय हें देखील कळूं देत नाहीं. म्हणून, कष्ट सोसण्यास प्रथम नालायख बनवून मागून त्यांत च ढकलून देणाऱ्या संपत्कालापेक्षां तृप्ति देणारा आपत्काल च बरा.

कोणत्या हि गोष्टीचा अतिरेक झाला असतां आमचे मनोविकार आमच्यावर हुकूम चालवितात. परंतु नेमस्तपणा हा शहाणपणाचा च परिणाम होय.

आपल्या सर्व आयुष्यक्रमांत सरळपणानें वागावें. परिस्थितींत कसा हि बदल झाला तरी समाधानवृत्ति ठेवावी. यामुळें प्रत्येक गोष्टीपासून आपला फायदा करून घेतां येईल; आणि आपल्यावर येणाऱ्या प्रत्येक प्रसंगामुळें आपली प्रशंसा च होत राहील.

शहाणा मनुष्य प्रत्येक गोष्टीपासून आपला फायदा शोधीत असतो, व दैवयोगाच्या प्रत्येक लहरीकडे समान दृष्टीनें बघतो. प्रत्येक चांगल्या गोष्टींवर तो अंमल गाजवून वाइटांना जिंकतो. आणि यामुळें सर्व काळीं व सर्व प्रसंगीं तो अढळ असतो.

संपत्कालांत आढ्यता बाळगूं नये, अगर विपत्कालीं निराश होऊं नये. संकटांना आमंत्रण करूं नये, आणि त्यांना पाठ दाखवून पळून हि जाऊं नये.

जें आपल्यापाशीं टिकणारें नाहीं त्याला तुच्छ समजण्याची हिंमत ठेवावी.

आपत्तींत आशेला दूर लोटूं नये, किंवा समृद्धींत शहाणपणाकडे डोळेझांक करूं नये. कारण, परिणामाविषयीं जो निराश होईल तो तेथपर्यंत कधीं च पोंहोचणार नाहीं. जो पुढें असलेल्या खळग्याकडे लक्ष देणार नाहीं, तो त्यांत पडून खात्रीनें नाश पावेल.

समृद्धींत आपलें कल्याण आहे, व तिच्याचमुळें आपणास सुख मिळेल असें मानणें, म्हणजे भरतीनें वाहून जाणाऱ्या वाळवंटांत आपलें गलबत नांगरणें च होय!

ज्याप्रमाणें पर्वतावरून वाहणारा व समुद्रास जाऊन मिळणारा जलप्रवाह मार्गांतील प्रत्येक क्षेत्रांतून जातो, परंतु थांबत असा कोठें च नाहीं, त्याचप्रमाणें दैव प्रत्येकाला भेटतें; त्याची गति अव्याहत–अविरत–आहे. तें कधीं च थांबत नाहीं. वायूप्रमाणें तें चंचल आहे. तर मग आपल्याला तें कसें धरतां येईल? जेव्हां त्याची आपल्यावर कृपादृष्टि होते, तेव्हां आपल्याला सुख वाटतें; पण चमत्कार हा कीं, आपण त्याबद्दल कृतज्ञ राहण्याच्या विचारांत आहोंत तों च तें दुसरीकडे पार निघून हि जातें!

प्रकरण दुसरें.

क्लेश आणि व्याधि.

शरीरव्याधींचा आत्म्यावर हि परिणाम होतो. एकाशिवाय दुसऱ्याला आरोग्य असूं शकत नाहीं.

सर्व वाईट गोष्टींत क्लेश च अधिक जाणवतात; व ते असे आहेत कीं, त्यांच्यासाठीं सृष्टींत फार च थोडे उपाय आहेत. जेव्हां आपलें स्थैर्य ढळेल तेव्हां बुद्धीला पाचारण करावें. जेव्हां सोशीकपणा आपल्याला सोडून जाईल, तेव्हां आशेचा आश्रय करावा.

कटु अनुभव हा मनुष्याचा प्रकृतिधर्म होय. तो सर्वांच्या च वांट्याला येत असल्यानें त्याबद्दल काय म्हणून शोक करावा? ज्यासाठीं आपला जन्म झाला आहे, त्यापासून मुक्त होण्याची आशा बाळगणें हें अन्यायाचें —मूर्खपणाचें—आहे. म्हणून आपल्या प्रकृतिधर्माला मुकाट्यानें वश व्हावें.

"ऋतूंनो! तुम्ही भरभर जाऊं नका; नाहींतर मी म्हातारा होईन" असें म्हणण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? जें आपल्याला टाळतां येण्याजोगें नाहीं, तें धैर्यानें सोसणें च बरें नव्हे काय?

फार दिवस टिकणारे क्लेश तीव्र नसतात, म्हणून

त्यांबद्दल कुरकूर करतांना आपल्याला लाज वाटायला हवी. जें तीव्र असतें तें अल्पकालपर्यंत च टिकतें म्हणून शेवटपर्यंत त्याचा पिच्छा पुरवावा.

शरीरानें जीवाच्या अधीन असावें अशी च ईश्वरी योजना आहे. तेव्हां शरीरसुखासाठीं जीवाला दुःख देणें, म्हणजे जीवापेक्षां शरीराची च किंमत अधिक ठरविणें होय.

ज्याप्रमाणें कांट्यानें वस्त्र फाटलें असतां शहाणा खेद करीत नाहीं, त्याचप्रमाणें वरील शरीररूपी कोशास इजा झाली असतां धीर पुरुष आपल्या जीवास कष्ट देत नाहीं.

प्रकरण तिसरें.

मृत्यु.

ज्याप्रमाणें हलक्या धातूपासून सोनें तयार झालें म्हणजे रसशास्त्रज्ञाची करामत कळते, त्याचप्रमाणें मृत्यूनें आपल्या जीविताची परीक्षा होऊन आपल्या सर्व कृत्यांचें प्रमाण ठरतें.

जर एखाद्याच्या जीविताची परीक्षा करावयाची असेल तर त्याच्या कालमर्यादेकडे नजर फेंकावी;

तिचा शेवट पाहिला म्हणजे आपला कार्यभाग होईल. जेथें लबाडीचा व्यापार नाहीं, तेथें सत्य लागली च प्रकाशमान होतें.

उत्तम प्रकारें कसें मरावें हें ज्याला माहीत आहे त्यानें आपल्या जीविताचा अपव्यय केला नाहीं, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. तसेंच ज्याचा अंतकाळ कीर्तिप्रद होईल, त्यानें आपलें आयुष्य फुकट घालविलें असें म्हणतां येणार नाहीं. योग्य प्रकारें जो मरेल तो व्यर्थ जन्मास आला असें होणार नाहीं; आणि जो सुखानें मरेल त्याचें जीवित निरर्थक ठरणार नाहीं.

आपल्याला कधीं तरी मरणें आहे हें जो समजतो, तो जिवंतपणीं समाधानवृत्ति राखतो; पण जो हें विसरण्याचा प्रयत्न करतो त्याला कशांत च सुख मिळत नाहीं; त्याला आनंद म्हणजे एखाद्या ठेव्याप्रमाणें वाटतो; आणि तो आपल्यापासून जाईल कीं काय याचा त्याला प्रतिक्षणीं धाक वाटत असतो.

तेव्हां मर्दाप्रमाणें मरण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें दुर्गुणांना आपल्यापूर्वीं मरूं द्यावें. मरणापूर्वीं जो आपलें जीवनकार्य आटोपतो, व ज्याला अंतकाळीं

मरणाशिवाय दुसरें कांहीं च कर्तव्य नसतें, तसेंच जीविताची इतिकर्तव्यता झाल्यामुळें अधिक जगण्याची जो इच्छा करीत नाहीं, तो च खरा सुखी होय.

मृत्यूला चुकवूं नये; कारण त्यांत आपलें दौर्बल्य दिसून येतें. त्याला भिऊं नये; कारण तो काय आहे हें आपल्याला माहीत नाहीं. आपल्या सर्व दुःखांचा तो शेवट करतो, एवढी च काय ती त्याच्याबद्दल आपल्याला माहिती आहे.

दीर्घायुष्यांत फार सौख्य आहे असें समजूं नये. ज्या जीविताचा उत्तम प्रकारें उपयोग होतो, त्याच्याचपासून मनुष्याला अत्यंत श्रेष्ठ प्रतिष्ठा प्राप्त होते; आणि तिच्यामुळें च मरणानंतर त्याच्या आत्म्याला शांति मिळते.

हें

संपूर्ण

संसारशास्त्र

होय

ॐ शांतिः शांतिः शांतिः

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४७	४	कल्याण करील,	कल्याण करील अगर
४७	५	लावील अगर तें	लावील, हें
५६	१२	घेतें.	घेतात.
६०	२०	त्यायोगें त्यांच्या अंतःकरणांत ईर्षा उत्पन्न होते	त्यांच्या अंतःकरणांत तो ईर्षा उत्पन्न करतो
६१	४	शेतकऱ्यांचा,	शेतकऱ्यांच्या चातुर्याचा,
६६	१४	समाजाचा	समाजाचा घटकावयव
६९	७	आवरण्यासारखें	अरण्यासारखें
७२	१८	नित्य त्याची प्रशंसा करावी.	हवी तर त्याची प्रशंसा करावी, पण उपासना कधीं हि करूं नये.
७३	१	अतिप्रदीप्तप्रज्ञा, मेधावी	अतिप्रदीप्तप्रज्ञामेधावी
७३	९	त्रस्त	उत्रस्त
७५	२०	सेवन	मनन
७९	५	त्याचें	त्यांचें
७९	६	त्यापासून	त्यांपासून
७९	१७	मानवी, प्राण्यांत	मानवी प्राण्यांत
९०	१	संस्कार	सत्कार
१०३	१७	परावलंबित्व	परावलंबित
१०६	१९	त्यांच्या हंसण्याप्रमाणें	त्याच्या हंसण्याप्रमाणें
११५	५	कीं, एका	कीं ज्या वेळीं त्यांचा न्यायकर्ता याबद्दल त्यांचा जाब मागेल, तेव्हां एका
१३९	९	निसर्गदेवी चा उदेश	निसर्गदेवीचा उद्देश
१४४	१७	उन्नत्त	उन्नत
१५५	२	असल्यामुळें	नसल्यामुळें
१६७	१७	ज्याचें	जें

श्रीतुलसीरामायण

(मराठी भाषांतरासहित)

सर्व जगतांत मनुष्यसमाजावर अद्भुत सत्ता चालविणारे जे कित्येक दिव्य ग्रंथ आहेत त्यांत गोसाँई श्रीतुलसीदासजी यांचा **श्रीरामचरित-मानस** अथवा **श्रीतुलसीरामायण** " हा ग्रंथ अग्रगण्य होय. अशा ह्या ग्रंथाचा मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांना परिचय घडावा ह्या हेतूनें नागपूरचे जहागीरदार श्री. यादव शंकर जामदार यांनीं त्याचें मराठी भाषांतर केलें आहे. वर मूळ व खालीं भाषांतर अशी रचना आहे. श्रीगोसाँइजींच्या प्रेमळ वर्णनौघांत हिंदी वाचक जसे वाहून जातात, तशीच मराठी वाचकांची हि स्थिति होईल इतकें भाषांतर रम्य झालें आहे. डेमी सांच्याची एक हजारावर पृष्ठसंख्या असून ग्रंथाचें बाह्यांग इंग्रजी नमुनेदार ग्रंथांप्रमाणें मनोहर केलें आहे. किंमत पांच रुपये.

परमार्थविचारमाला

लेखकः—गोविंदसुत

हा वेदान्तविषयावरील दृष्टान्तपूर्ण व चटकदार भाषेंत लिहिलेला एक ग्रंथ असून त्याची महाराष्ट्रांतील बहुतेक पत्रकर्ते व अनेक विद्वान् लोक ह्यांनीं फार वाखाणणी केली आहे. वेदान्तविषयक चर्चा ही रुक्ष असते हा समज ह्या ग्रंथानें खात्रीनें दूर होईल. ह्या ग्रंथांत परमार्थाचें प्रमेय, कर्माचें श्रेय, उपासनेचें ध्येय, ज्ञानाचें ज्ञेय, कालचक्रांतील विश्वाकार कर्म व कर्माकार विश्व, प्रारब्ध व प्रयत्न, संत व त्यांचे ग्रंथ, पुस्तकज्ञानी व आत्मज्ञानी वगैरे वगैरे २७ प्रकरणें आहे. ह्या चालू टाइपाची सव्वा पांचशें पृष्ठें असून बांधणी कापडी आहे व इतकें हि असून किंमत अवघी दीड रुपया आहे.

रा. रा. न. चिं. केळकर केसरीकर्ते
ह्यांनीं लिहिलेले ग्रंथ

आयर्लंदचा इतिहास

ह्या ग्रंथांत आयर्लंदचा प्राचीन व आर्वाचीन इतिहास तहत होमरूलच्या चळवळीसह अगदीं पद्धतशीर दिलेला आहे. शिवाय आरंभीं पूर्वइतिहासांतील ठळक ठळक गोष्टी, त्यांचा संक्षेप काल व जंत्री दिलेली आहे. शिवाय आयर्लंद व स्कॉटलंद, आयर्लंद व हिंदुस्थान, वगैरे देशांची तुलनात्मक माहिती दिली असल्यामुळें हा इतिहास हिंदुस्थानवासीयांना **वाचण्यास** व **मनन करण्यास** फार **उपयुक्त** व **मनोरंजक** असा झाला आहे. पुस्तकाचे शेवटच्या म्हणजे १० व्या भागांत आठ ऐयरीश **देशभक्तांचीं चरित्रें दिलीं** असून तीं अत्यंत **नमुनेदार** व **अनुकरणीय** अशीं आहेत, व त्यावरून **स्वतंत्र राष्ट्रांत कर्ते पुरुष** राष्ट्रीय रंगभूमीवर काय कर्तबगारी करूं शकतात याचें दिग्दर्शन चांगलें होतें. पुस्तकांत जागजागीं **सुंदर चित्रें** दिलीं असून **मुखपृष्ठावर आयर्लंदचा रंगीत नकाशा** दिला आहे. पुस्तकाचीं पानें क्राऊन षोडशपत्री ग्लेज कागदाचीं सुमारें ४२५ आहेत. किंमत सव्वा रुपया.

सुभाषित आणि विनोद

सुभाषित, विनोद, हास्यरस, वगैरे गोष्टींचें शास्त्रीय व तात्त्विक विवेचन करणारा मराठी भाषेंतील हा पहिलाच अपूर्व ग्रंथ होय.

हा ग्रंथ खरोखरच किती अपूर्व आहे हें त्याजवरील डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटींतील परीक्षकांचे पुढील अभिप्राय वाचल्यानें कळून येईल:—

(१) सदर निबंधांतील विषयाचें प्रतिपादन रा० केळकर यांनीं फारच विद्वत्तापूर्ण रीतीनें केलेलें आहे. अनेक टीकाकारांच्या मतांचा आधार देऊन त्यांनीं आपले सिद्धान्त सिद्ध केले आहेत; व या कामीं

संस्कृत कवि, ग्रंथकार, तसेंच प्रख्यात इंग्रजी कवि, नाटककार, कादंबरीकार, वगैरेंच्या ग्रंथांतील उतारे व अवतरणें यांचाहि उपयोग केला आहे. विषयाची मांडणी शास्त्रीय तत्त्वज्ञानपद्धतीस अनुसरून आहे.

(२) सदरहू निबंध लिहून रा. केळकर यांनीं मराठी भाषामंदिराचें एक अगदीं नवीन व पूर्वीं न पाहिलेलें असें दालनच केलें व मराठी वाचकवर्ग आणि ग्रंथकार या उभयतांवरहि मोठाच उपकार केला.

(३) ज्यांकरितां हा निबंध लिहिला आहे, म्हणजे विनोदी लेख लिहिण्यास जास्त स्फूर्ति अथवा इच्छा आहे, त्यांनीं तो अवश्य वाचण्याजोगा आहे.

तोतयाचें बंड

पानिपतच्या लढाईत सदाशिवरावभाऊ पेशवे हे नाहींसे झाले; त्यांचें काय झालें हें निश्चितपणें कोणास कळलें नाहीं. या संशयाचा फायदा घेऊन एका कनोजी ब्राह्मणानें भाऊसाहेबांचा तोतया बनून पेशवाई मिळविण्याचा यत्न केला; पण नाना फडणविसांच्या चातुर्यामुळें तोतयाचें कारस्थान बाहेर पडून अखेर त्याचें पारिपत्य झालें. काव्याच्या दृष्टीनें अत्यंत रमणीय अशा ह्या प्रसंगावर रा. केळकर ह्यांनीं हें गद्य नाटक लिहिलें आहे. विषयास अनुरूप अशीं अनेक सुंदर चित्रें घातलीं आहेत. किं. तूर्त बारा आणे.

चंद्रगुप्त

या नवीन नाटकांत राजभक्तीच्या उदात्त मनोभावनेचा उत्कर्ष, प्रेमी प्रमदेचें स्वाभिमानी आत्मसंयमन, पुरुष-भाग्याचे अद्भुत विलास, त्रिगुणात्मक प्रकृतींच्या बालमित्रांचा संयोग, दुर्दैवी राजपुत्रांची दुःखपरंपरा व तिचा आनंददायक शेवट, खलचरित्राचें वैचित्र्य, अभिमानी मनुष्यांच्या दारुण प्रतिज्ञा विफल करण्याचें परमेश्वराचें लीलाकौतुक वगैरे जगांतील अनुभवाचे दाखले अद्भुत व रम्य अशा प्रसंगांनीं दाखविलेले असल्यामुळें चंद्रगुप्त, चाणक्य, वगैरे प्राचीन ऐतिहासिक भूमिका अभिनवकौतु-

कानें या नाटकांत फार खुलून दिसतात; तसेंच ठिकठिकाणीं मार्मिक व चटकदार विनोद आणि मन थरारून सोडणारे प्रसंग यांची परंपरा साधल्या-मुळें अखंड चित्ताकर्षण होतें. किं. बारा आणे.

कृष्णार्जुनयुद्ध

[आहे छापत]

श्रीकृष्ण व अर्जुन यांचें मित्रत्व तर जगभर प्रसिद्धच आहे. पण त्यांच्या शत्रुत्वाचा जो एकच प्रसंग गालवाख्यानांत वर्णिला आहे, तो आधारभूत घेऊन, आत्मप्रीति व भक्तप्रीति यांच्या अत्यंत कठिण अशा विरोधाचें नाट्यपद्धतीनें हृदयंगम असें वर्णन या नाटकांत केलें आहे. नारदाची कलहप्रियता जगविख्यात असून तिचाच या कामीं उपयोग करून घेतलेला आहे. यामुळें हास्य व करुण या दोनहि रसांना नाटकांत भरतें आलेलें आढळतें. गंधर्वांची मद्यासक्ति, इंद्रप्रसादामुळें त्यांना आलेला उन्मत्तपणा, गालवाचा क्रोध व शांति, श्रीकृष्णाची चिंता, द्रौपदीचा उदारपणा, व सर्वांत अधिक नारदाचा गंभीर विनोद हे या नाटकांत उत्कृष्ट साधले आहेत. किं. बारा आणे.

श्रीसंतभानुदास

[आहे छापत]

श्रीएकनाथ महाराज यांचे पणजे श्रीसंत भानुदास हे महान् भगवद्भक्त असून, त्यांच्या काळीं अनागोंदीचा राजा कृष्णदेवराय यानें पंढरी येथील श्रीविठ्ठलरुक्मिणींच्या मूर्ति आपल्या राजधानीस नेल्या, त्या श्रीभानुदास यांनीं आपल्या भक्तीच्या जोरावर पंढरीस परत आणल्या. या कथानकाचा आधार घेऊन, क्षेत्रवासी लोकांचा लोभी स्वभाव, ग्रामस्थ अधिकारी व ग्रामकंटक यांचा गावगुंडपणा, राजाचें महानुभावित्व, भक्ताचा सत्याग्रह, वगैरे मनुष्यस्वभावाचे मासले हास्यरसपूर्ण रीतीनें ह्या संगीत नाटकांत दाखविले आहेत. किं. बारा आणे.

पत्ताः—धि प्रिंटिंग एजन्सी, बुधवार पेठ, पुणें.

राष्ट्रीयशिक्षणमाला

१ **संस्कृतप्रवेश**—मराठींतून संस्कृत शिकण्यास अत्यंत उपयोगी. सुभाषितें व मराठींत व्याकरणाचे सामान्य नियम. किं. ८८.

२ **इंग्रजी प्रवेश**—संभाषणपद्धतीनें कसें शिकवावें याबद्दल सविस्तर माहिती व नमुन्याचे धडे. **शिक्षकांस मार्गदर्शक.** किं. ८८.

३ **प्रथमगुच्छ**—संस्कृत वाचनपुस्तक. रामायण, भारत, पंचतंत्र व हितोपदेश या ग्रंथांतील सुंदर, उदात्त व बोधपर वेंचे घेतले असून कठिण स्थलीं मराठींत टीपा जोडल्या आहेत. अवघड शब्दांचा एक कोशहि दिला आहे. खाजगी रीतीनें संस्कृत वाचणारास फार उपयोग होईल. किं. १ रु.

४ **बीजगणित**—(दुसरी दिढीनें वाढविलेली आवृत्ति. लवकरच प्रसिद्ध होईल) मराठी ट्रेनिंग कॉलेजें, युनिव्हर्सिटीची प्रवेशपरीक्षा, व औद्योगिक शिक्षणाला जरूर असा सर्व भाग यांत येईल. रँग्लर परांजपे वगैरेंचे उत्तम अभिप्राय. विवेचन अत्यंत सुलभ केलें आहे. परिभाषा सुंदर व ध्यानांत राहण्यास फार सुलभ अशी रचिली आहे. विद्यार्थ्यांस कोणाच्याहि मदतीशिवाय विषय शिकतां येईल. **मुंबई व मध्यप्रांत अशा दोन्ही विद्याखात्यांनीं मंजूर केलें आहे.**

५ **मुलांचा महाराष्ट्र**—मराठ्यांच्या मर्दुमकीचें वर्णन. (लवकरच प्रसिद्ध होईल) पृ० ३०० वर. किं. १ रु.

६ **गीर्वाणलघुकोश**—(संस्कृत-मराठी) ग्रंथ छापत आहे.

रसायनशास्त्राचीं मूलतत्त्वें

मराठीमध्यें व्यावहारिक दृष्टान्त देऊन व सोपी भाषा वापरून प्रो. ल. ग. साठे, एम्. ए. यांनीं विषय सुबोध केला आहे. किं. ८७.

पत्ताः—'**लोकशिक्षण**' कचेरी, तळेगांव दाभाडें (पुणें)

श्री स्वामी रामतीर्थ यांचे समग्र ग्रंथ

—संपादक—

भास्कर विष्णु फडके, बी. ए.; **रामकृष्ण वासुदेव बर्वे,** बी. ए.

श्रीमत् परमहंस **स्वामी रामतीर्थ** हे विसाव्या शतकांतील अवतारी पुरुष होत. स्वामींनीं आपल्या ग्रंथांत अर्वाचीन भौतिक शास्त्रांच्या प्रकाशांत वेदान्ताच्या सिद्धान्तांचें श्रेष्ठत्व सर्व जगाच्या निदर्शनास आणलें आहे. धार्मिक, सामाजिक, नैतिक, अशा अनेक प्रचलित प्रश्नांवर स्वामींनीं अगदीं नवा प्रकाश पाडला असून समाजाच्या विचाराला अत्यंत श्रेयस्कर असें नवीन वळण लावलें आहे. अशा ह्या प्रासादिक ग्रंथांचा महाराष्ट्रीय बन्धुभागिनींस लाभ घडावा म्हणून स्वामींचीं समग्र व्याख्यानें, लेख, कविता, संवाद, वगैरे ग्रंथ मराठींत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. क्राऊन सोळा पेजी सांच्याच्या दीडशें पृष्ठांचा एक भाग, असे सुमारें नऊ दहा भाग काढून स्वामींचे समग्र ग्रंथ पुरे करावयाचे आहेत. समग्र ग्रंथांपैकीं सहा भाग प्रसिद्ध झाले असून, सातवा भाग लौकरच प्रसिद्ध होईल; व पुढील प्रत्येक भाग दर तीन महिन्यांनीं निघत जाईल. प्रसिद्ध झालेल्या सहा भागांची किंमत प्रत्येकीं कागदी बांधणीस बारा आणे, व कापडी बांधणीस एक रुपया. (शिवाय टपालखर्च.) प्रसिद्ध झालेले सहा भाग वरील किंमतीनें म्हणजे कापडी बांधणीच्या प्रती साडे सहा रुपयांच्या किंवा कागदी बांधणीच्या प्रती चार रुपये चौदा आण्याच्या व्ही. पी. नें मागवून पुढें प्रसिद्ध होणारे सर्व भाग घेण्याचें आगाऊ कळविणारांसच सातव्या व त्यापुढील प्रत्येक भागास कागदी बांधणीस आठ आणे व कापडी बांधणीस बारा आणे.

पत्ता:—**भास्कर विष्णु फडके,** हीरजी आसूची वाडी,
पोष्ट माटुंगा, मुंबई.

The Printing Agency

POONA.

थि प्रिंटिंग एजन्सी

पुणें

कोणत्याहि प्रकारच्या छपाईच्या कामाविषयीं सल्लामसलत देणें किंवा जबाबदारी घेऊन तें छापवून देणें, लोकोपयुक्त विषयांवरील विद्वान् लेखकांनीं लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध करणें किंवा त्यांची विक्री करणें, आणि सर्व प्रकारचीं पुस्तकें कसोशीनें व शोधपूर्वक खरेदी करून पाठविणें इत्यादि कामें ह्या एजन्सींत चालूं असतात. विशेष माहितीसाठीं म्यानेजर ह्यांस समक्ष भेटावें अथवा पत्रव्यवहार करावा.